साप्ताहिक

१९ एप्रिल ८६/२ रुपये

# माणूस

## कळाहांडी... जेथे राजीव गांधी एकदा जाऊन आले!



## बाबा आमटेंबरोबर पंजाबात

साप्ताहिक

# माणूस

□

वर्ष : पंचविसावे

अंक : सत्तेचाळिसावा

□

१९ एप्रिल १९८६

किंमत : दोन रुपये

□

संपादक

श्री. ग. माजगावकर

□

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

□

वार्षिक वर्गणी

साठ रुपये

□

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही

□

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

□

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ४११०३०

दूरध्वनी : ४४३४५९

□

मुखपृष्ठ—श्याम देशपांडे



# मुंबापुरी

## □ पुनर्वसन कोठे हवे ?

शबाना आझमी, विजय तेंडुलकर, गोविंद निहलानी वगैरे प्रभृतींनी संजय गांधी नगर ही झोपडपट्टी हलविण्याच्या विरोधात गेल्या आठवड्यात मोर्चा काढला. त्यांच्या सामाजिक बांधिलकीबद्दल आम्हाला कधीच शंका नव्हती. आता तर पहिल्या पानावर त्यांचे छायाचित्र पाहिल्यावर आमची उरलीसुरली शंकाही नष्ट झाली आहे.

मुंबापुरीतील झोपडपट्टी ह्या विषयावर आम्ही पूर्वीही लिहिले आहे. शहरातील झोपडपट्टी हा कधीही न सुटणारा प्रश्न आहे. मागे सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर मोठ्या प्रमाणावर झोपड्या हलविण्याचा कार्यक्रम हाती घेतला जाईल अशी वदंता उठली होती. त्यावेळी थोर नेते सुनिल दत्त झोपडपट्टीवासियांचा प्रचंड मोर्चा घेऊन महापालिकेवर आले होते. सध्या ते बहुधा दिल्लीलाच असतात. आम्हीही झोपडपट्ट्यांच्या विरोधात नाही. परंतु ह्या प्रश्नाकडे पाहताना जी सवंग भूमिका घेतली जाते तिला मात्र आमचा विरोध आहे.

संजयनगर ही झोपडपट्टी संपूर्णपणे अनधिकृतच झोपडपट्टी होती. हे तुम्हाला नावावरूनही लक्षात आले असेल. ह्यातले बरेचसे लोक नव्या विधानभवनाचे बांधकाम सुरू झाले त्या काळात बांधकाम मजूर म्हणून मुंबापुरीत आले. विधानभवनाचे बांधकाम पूर्ण झाल्यावर त्यांनी नरीमन पॉईंटवरील इतर इमारतींवर काम सुरू केले.

ह्या लोकांना मुंबापुरीतून पार हाकलून द्यावे असे कोणीही म्हणणार नाही. परंतु ज्या जागेवर संपूर्ण शहराच्या सोयीसाठी महापालिकेच्या पाणीखात्याला बांधकाम करावयाचे आहे, ते ह्या अनधिकृत झोपड्यांमुळे खोळंबून राहावे असे म्हणणेही चुकीचे आहे.

झोपडपट्ट्यांचा प्रश्न हा पुनर्वसनाच्या प्रयत्नांतूनच सुटू शकेल. परंतु हे पुनर्वसन केवळ शहरातच करण्याचा आग्रह धरणे मात्र चुकीचे आहे. शहरात येणाऱ्या प्रत्येक माणसाचे पुनर्वसन करण्याचा मक्ता जर महापालिकेने घेतला तर शहराकडे येणारा लोंढा वाढतच राहील.

ज्या भागांतून ही माणसे मुंबापुरीत आली त्या ठिकाणीही त्यांच्या पुनर्वसनाचे प्रयत्न व्हायला हवेत. नरीमन पॉइंटवरील झोपडपट्टीवासियांना बोरीवली – मालवणी येथे जागा पुरविणे म्हणजे काही पुनर्वसन नव्हे. जे मूळचे ठिकाण बायकामुलांसकट पोटापाण्यासाठी माणसाला सोडण्याची इच्छा होते, तेथेच जगण्याची साधने निर्माण करणे, ह्यासाठी कल्पकता–संघटना तर लागतेच पण त्याहीपेक्षा वर्षानुवर्षांच्या जाणीवपूर्वक प्रयत्नांचे सातत्यही आवश्यक असते. अशा स्वरूपाचे काम करणे म्हणजे ते आयुष्याचे ध्येय म्हणूनच करावे लागते. परंतु दुर्दैवाने त्यात फारशी प्रसिद्धी नसते.

शबाना आझमी, विजय तेंडुलकर काय किंवा गोविंद निहलानी काय ह्यांच्या सामाजिक बांधिलकी विषयी आम्हाला शंका कधीच नव्हती. प्रश्न एवढाच आहे की त्यांच्या ह्या प्रयत्नात प्रश्न सोडविण्याचा जिव्हाळा कितपत आहे आणि सवंग प्रसिद्धीचा लोभ कितपत आहे ?

## □ सेवाधर्मो परमगहनः !

परवा मदर तेरेसा ह्यांचे भाषण ऐकण्याचा आम्हाला योग आला. गरिबांची सेवा करत करत जे उच्च पदाला पोहोचले त्या सर्वांबद्दलच आमच्या मनात एक कायम स्वरूपाची शंका आहे. ‘ गाप ’ अशा स्वरूपाचा संदेश बाबा आमटे ‘ भारत जोडो ’ यात्रेत तरुणांना देत आहेत असे आम्ही ऐकले आहे.

ह्याचा संपूर्ण लाँग फॉर्म ‘तरुणानी गरिबाचे अश्रू पुसावेत’ ( T. G. A. P. ह्यात T सायलेंट आहे) असा होतो. असो. बाबांना असली कोड्यातली भाषा वापरायची सवय आहे. (वाचा : महाराष्ट्र टाइम्स) त्यांनी दिल्लीत पतप्रधानाना देखील अशी वेगवेगळ्या प्रकारची चमत्कृतीपूर्ण वाक्ये ऐकवल्याचे आम्ही ऐकले आहे.

बाबा आमटयांबद्दल आम्हाला आदर आहे. आमचा आक्षेप आहे तो दारिद्र्याचे उदात्तीकरण करण्याच्या प्रयत्नाला–भोवताली नवश्रीमताचा गोतावळा जमा करण्याच्या पद्धतीला. आज ह्या स्थितीतही बाबाना प्रसिद्धीची गरज भासावी आणि त्यासाठी त्यानी प्रयत्न करावे ही खरोखरच केविलवाणी गोष्ट आहे. ज्यावेळी सेवा हा तुमच्या स्वभावधर्माचाच अविभाज्य भाग असतो आणि मदत देणारा व घेणारा ह्यात पातळीचा फरक आपण ठेवत नाही, तेव्हाच विभूतीपदाकडे होणारी वाटचाल आपण रोखू शकतो.

मदर तेरेसाचे बोलणे मात्र साधे सरळ असते. अगदी थोडयाफार इंग्रजी जाणणाऱ्यालाही कळावे इतक्या सोप्या इंग्रजीत त्या बोलतात. त्यांच्या बोलण्यात त्यांच्या कर्तृत्वाची जाणीव कोठेही डोकावत नाही. अशा व्यक्तींना एखाद्या विशिष्ट धर्माचे अधिष्ठान देणे मात्र आम्हाला पसंत नाही. त्यामुळे उलट त्यांच्या कार्याला कमीपणा येतो. मदर तेरेसा याचे कार्य जर अखिल मानव जातीला उपकारक आहे तर त्यानी सभोवताली सतत चर्चच्या धर्मगुरूंचा गोतावळा ठेवू नये. त्यामुळे उलट यांचा आपल्या धर्मातील लोकांशी काही सबंध नाही असा लोकांचा समज होतो. सेवेला धर्माची प्रेरणा असू शकेल, परंतु खरी सेवा ही धर्मातीतच असायला हवी

बोलताना मदर तेरेसा ह्यांनी त्यांच्या चीन भेटीबद्दलचा किस्सा सांगितला. तो ऐकण्यासारखा आहे त्या पेकींगमध्ये असताना पोलिटब्युरोच्या एका सदस्याने त्याना विचारले–

‘What do you feel when you meet a communist?’

त्यांचे उत्तर होते. ‘I treat him as a child of God and my brother.’

## □ एक नाटुकले......

( विजय तेंडुलकरांच घर. माधव मनोहरना मेजवानी आहे. वेळ सध्याकाळची. वातावरण मगल, सोज्वळ. तेंडुलकर तलम धोतरात. अगात कुर्ता. माधव मनोहर घरात ‘विठ्ठला विठ्ठला’ असा गजर करत प्रवेश करतात. त्यांच्या वलात, घामान डबडबलेल्या चेहऱ्याकडे पाहून तेंडुलकर आपल्या कन्येस उद्देशून ) :

तेंडुलकर : जा, जा, जा– वाळयाचा घेऊनि ये पखा... जा जा जा...

मा. म : ब्रेव्हो सुरेख कीप इट अप (पक्षी : ते वर ठेवा.)

तेंडुलकर : कसच कसच ..

मा. म : तेंडुलकर, तुम्हाला एक ठाऊकेय का? ‘शारदे’ तलं हे पद एका इंग्रजी गाण्यावरून बेतलय ?

तेंडुलकर : वा: वा: छान, म्हणजे देवलांनी उचलेगिरी केली.

मा. म : ऑफ कोर्स हरिपुरात त्याकाळी एक इंग्रज अधिकारी आला होता त्यानी देवलमास्तराना हे मूळ पद शिकवलं. म्हणून दाखवतो तुम्हाला. ( गातात ) गो. गो. गो. गेट मी वन वाळयाज पर्यंन

तेंडुलकर : (शून्यात बघत, उदास) मला मात्र विनाकारण तुम्ही छळलंत.

मा. म : खत करू नका विजयपत. मी लिहिलं असेल. पण म्हणून मी काही तुमच्या क्रियेटिविटीवर सशय नाही हो घेतला. (पाईपचा एक दीर्घ झुरका घेऊन गातात) ‘सशय का मनी आला ’

तेंडुलकर : ( तत्परतेने ) हेसुद्धा एका इंग्रजी गाण्यावरून उचललंय अस ऐकतोय.

मा. म : बरोबर ऐका : व्हाय डाऊट केम टू युअर माइन्ड...

तेंडुलकर : त्या कानेटकरानी शेक्स्पियरची एक नाही, दोन नाही चागली चार नाटकं मोडतोडून आपलं ‘गगनभेदी’ बेतल.

मा म : पण त्यांनी तस जाहीर कबूल केल तुम्हीही करा...

(आत प्रिया आडारकर, गौरी देशपांडे, प्रिया तेंडुलकर प्रभृती मडळी ‘वदनि कवळ घेता नाम घ्या श्रीहरीचे’ चक्क इंग्रजीत गातायेत. जेवणाची सूचना आतून येते )

तेंडुलकर : चला माधवराव. पान वाढलीयेत. आपण आलात मला फार बरं वाटलं. (लगेच ‘धन्य आनद दिन, पूर्ण मम कामना’ गातात ) पण माधवराव, हे प्रीतीभोजन म्हणजे आपली दिलजमाई नव्हे हं. उगीच गैरसमज नको म्हणून मी ‘म. टा.’ ला तसं खुलाशाच पत्रही आजच पाठवून दिलं.

मा. म : ( सद्गदित होऊन ) अरेरे, विजयपत, हे काय केलत हो. घात केलात. ( एवढ म्हणून विषण्ण सुरात गाऊ लागतात.) ‘विलोपले मधुमीलनात या....’

– ‘अर्वाचीन मराठी नाटुकल्या’ या आगामी प्रकाशनातून साभार.

–विष्णू जयदेव

# सांस्कृतिक नागपूर

## □ श्रीराम लागूंचा आवाज !

येथल्या धरम पेठ शिक्षण संस्थेतर्फे दरवर्षी श्रीमती मनोरमाबाई मुडले व्याख्यानमाला गुफली जाते. ह्याच महाविद्यालयात माझे नाटककार मित्र श्री. महेश एलकुंचवार इंग्रजीचे प्राध्यापक आहेत. त्यानी जो पुढाकार घेतला त्यामुळे ह्या वर्षी ह्या व्याख्यानमालेत डॉ. श्रीराम लागू ह्याना खास बोलाविण्यात आले होते. दिनाक ४ आणि ५ एप्रिल रोजी त्यानी दोन व्याख्याने दिलीत पहिल्या व्याख्यानाचा विषय होता ‘मराठी रंगभूमीवरील प्रायोगिकता’ आणि दुसऱ्या व्याख्यानाचा विषय होता ‘मराठी रंगभूमीवरील व्यावसायिकता.’ डॉक्टरांच्या ह्या दोन्ही व्याख्यानात त्यांची निष्ठा, कळकळ आणि रगभूमीविषयीचे प्रेम दिसून येत होते. त्यानी सध्याच्या मराठी रंगभूमीविषयी जे विचार माडले ते खरोखरीच मननीय होते प्रायोगिक रगभूमीकडे निर्मात्यानी सतत लक्ष ठेवले पाहिजे आणि प्रायोगिक नाटकाना त्यानी व्यावसायिक रगभूमीकडे वळविले पाहिजे असा विचार त्यानी सतत माडला. निर्मात्याना रगभूमीविषयी खरे प्रेम नाही व पैसा हाच त्यांचा सर्वश्रेष्ठ देव बनला आहे अशी खत त्यानी व्यक्त केली. ‘उद्या जर एखाद्या रावणाला जास्त पैसे मिळतात असे आढळून आले तर

पृष्ठ ३१ वर

# भारत जोडो : चंडीगड व्हाया चंद्रपूर!

जगदीश गोडबोले

काही माणस वादळी असतात. काही माणसाना वादळाचा शाप असतो तर काहीना वादळाच वरदान. काहीजण सर्वकाही असतात. श्री. बाबा आमटे अशा माणसापैकी असावेत!

२४ डिसेंबर रोजी कन्याकुमारीहून बाबानी आपल्या 'भारत जोडो' यात्रेला प्रस्थान ठेवण्यापूर्वीच बाबाचे भाविक आणि विरोधक याच्यामध्ये यात्रेच्या निमित्ताने एक नवीन वादळ घोघावू लागले.

सर्वसाधारण जनता नेहमीप्रमाणे खरीखुरी भारावली आपल्याला जमत नाही, पण कोणीतरी चागले काम करतो आहे ना, करू द्यात. समजा नाही जोडला गेला भारत तरी यात्रेमुळे तोडला तर जात नाही ना– अशी साधी-सरळ भूमिका तिने घेतली पण भाविक आणि विरोधक– विशेषत. सामाजिक-राजकीय क्षेत्रातील, इतकी साधी सरळ भूमिका घेणे शक्य नव्हते सभोवार दाटून आलेल्या घनघोर अधारातील एकुलता एक प्रकाश किरण म्हणून एकाने भारत–जोडो यात्रेची भलावण करावी तर लगेच दुसऱ्याने, वास्तवाचे भान सोडून केलेला मृगजळी पाठलाग म्हणून यात्रेची वासलात लावावी; तिसऱ्याने यात्रेला माओच्या लॉंग मार्च वा महात्माजीच्या दाडी यात्रेच्या पातळीवर नेऊन ठेवावे तर चौथ्याने आमटे 'परिवारा'ची भारत–दर्शन यात्रा कपनी करून यात्रेच्या टायरला टाचणी लावावी, असा प्रकार चालू होता. डाव्या विचारसरणीच्या तरुण कार्यकर्त्यांची प्रतिक्रिया तर आणखीनच जहाल होती. एका कार्यकर्त्या मित्राला 'भारत जोडो' ला जाणार का म्हणून सहज विचारलं, तर तो माझ्याच अगावर येत म्हणाला, मग आमच आता काय भारत तोडो चाललं आहे काय? जात–पात–वर्ण–वर्ग यापैकी कोणत्याही प्रश्नाच्या गाभ्याला हात न घालता हे अस तकलादू जोडकाम किती दिवस करणार? आणखी एका कार्यकर्त्या मित्राने तर भारत जोडोच्या निमित्ताने आनंदवनहून प्रकाशित झालेल पत्रकच माझ्या तोडावर फेकलं.

भारत–जोडो यात्रेमध्ये दिवसभरात करायच्या कामकाजामध्ये गावातून मिरवणुका, वृक्षारोपण, राष्ट्रीय ऐक्य, विषमता निर्मूलन, स्त्री–मुक्ती, अध श्रद्धेचा नि.पात, दलिताच्या समस्या, पर्यावरण, सार्वजनिक आरोग्य शिक्षण... इत्यादी गोष्टीची भली-मोठी यादी इमानाने केली आहे. प्रत्येक दिवशी हे जर सर्वकाही करणार असतील तर त्याला जोडून 'कुक्कुट–पालन, कुटुब–नियोजन, मलेरिया–निर्मूलन वगैरेही करावे' असे माझ्या ह्या मित्राचे स्पष्ट आणि प्राजळ (पुण्याचा असल्याने!) मत होते.

सर्वांच्याच प्रतिक्रिया इतक्या टोकाच्या नसल्या तरी बाबानी या वयात आणि आजारी अवस्थेत अशा प्रतिकात्मक(Token) कार्यक्रमासाठी इतका खडतर प्रवास अगिकारू नये असे त्याच्या हितचितकाचेही अंतस्थ मत होते. विशेषतः महारोग्याच्या सेवेसारख्या एकसुरी कामामध्ये वर्षानुवर्षे गाडून घेतल्यामुळे बाबाच्या उन्मुक्त कवि–मनाला दरवर्षी फुटणारे गोकुळ–उत्तरायण इत्यादी धुमारे ही मडळी जाणून होती. तरीही . त्यातील काहीजणाना बाबानी सोमनाथच्या आतरभारती श्रम–सस्कार छावण्यासारखे खरेखुरे 'भारत –जोडो' कार्यक्रम दुर्लक्षून या यात्रेच्या नादाला लागावे याचे मनस्वी दुख होते मता–मताच्या या गलबल्यात यात्रा सुरू झाली आणि निम्मा 'भारत–जोडो'ही झाला तरी काय करावे हे माझ्यासारख्या भटक्या माणसाला कळत नव्हते. मुख्यत: भटकण्यात 'वेळ काढणारा' माझ्यासारखा भटक्या जमातीचा माणूस अजून गप्प कसा याचे माझ्या मित्राना आश्चर्य वाटत होते

आणखी काही सागायच्या अगोदर ही 'वेळ काढायची' भानगड सागून टाकायला पाहिजे माझा परममित्र पापा पाटील याची ती परमप्रिय थेअरी आहे. पापाच्या मते (तो सागलीचा असल्याने–नुसतच मते!) 'आयुष्य हे एक प्रचड वेळ काढणे' असते आणि अशा या प्रचड वेळ काढू आयुष्यात प्रत्येकजण आपल्यापरीने कुठेतरी वेळ काढीत असतो कोणी नोकरी–धद्यात वा व्यापारा–उदीमात, तर कोणी समाज–कार्यात वेळ काढत असतो पण ही भानगड एवढी सोपी नाही. त्यातही प्रकार आहेत. उदाहरणार्थ समाजकार्यातले काहीजण बालकात नाहीतर पालकात, मजुरात नाहीतर मालकात, आदिवासी नाहीतर दलितात वेळ काढीत असतात. प्रत्येकजण आपापली वेळकाढू सीमा–रेषा इच–इच लढवत असतो आणि एकजण दुसऱ्या हद्दीत शिरला तर उत्पात होतात. शिवाय त्यामधून त्या त्या लोकाच जे काय भल–बुर होन ते दुय्यम असत. (साला, हा एवढा जिवाचा आटापिटा करतो तरीही अजून हे आदिवासी आनदी कसे हे पापाला आणि मलाही कायम पडलेले कोडे! ते असो. भल–बुर पापा जाणे आणि भोगे तेही असो.) सागण्याचा मतितार्थ एवढाच, 'वेळ काढण्या'ची एवढी प्रचड संधी उपलब्ध असताना मी गप्पगार बसावे हे माझ्या मित्राना (आणि घरच्यानाही) मानवण्यासारखे नव्हते.

## इंडियासह भारत

अर्थात् मलाही मानवण्यासारखे नव्हते. पण मुख्य अडचण या 'भारत' (शे. स. शरद जोशीचा नव्हे, तर आपला सीधा-साधा इडियासह भारत) आणि 'जोडो'ची होती. म्हणजे भाषा–प्रात–धर्म आदि भेदामुळे विछिन्न झालेला मूळचा आसेतु भारत परत एकसंध जोडायचा की आधीच छिन्न-विछिन्न असलेला भारत एका नव्या धाग्यात गोवायचा? मुबई–पुणे–नागपूर वा कोण-

त्याही शहरातील गाडी–घोडे–रिक्षा–टॅक्सी–सायकली–गायी–कुत्रे आदी झमेल्यातून मार्ग काढताना प्रत्येक क्षणी आपल्याला वाटत रहाते, आपण अजून हाती–पायी 'एकसंध' कसे? तसेच या भारत नावाच्या अफलातून गोष्टीबाबत होते. पावला-पावलाला जात-पात–प्रांताच्या ठेचा. बरं, तुम्ही महाराष्ट्राची अस्मिता म्हणून भागत नाही तर विदर्भाची अस्मिता अलग, मराठवाड्याची अलग, कोकणाची अलग, (आम्हाला आपली खानदेशची अ-स्मिता ठाऊक!) निदान आतापर्यंत शीख धर्म तरी भला वाटायचा. डोक्याला फेटा बांधला की भानगड नाही. पण त्यातही भेद. निरंकारी आणि प्रलयकारी. या प्रलयकारीमध्येही पाठभेद महा-प्रलयकारी आणि मवाळ प्रलयकारी. आता माझ्यासारख्या जन्मजात सरदारजीची (शब्दशः जन्मजात नसलो, तरी वडील लुधियानाला असताना नेमाने तिथे येत-जात होतो) बुद्धी कधी, कशी आणि कुठे चालवायची?

पण असले गहन प्रश्न मला फारसे त्रास देत नाही. कारण 'जे तुटत नाही म्हणून जुळते आणि जुळत नाही म्हणून तुटते' या पापाच्या दुसऱ्या एका थिअरीमध्ये माझा विश्वास आहे. खरी अडचण वेगळीच होती. मित्राचा घनघोर आग्रह असला तरी अकार्यबाहुल्यामुळे 'एवढा वेळ काढायला' मला खरोखरच फुरसद नव्हती आणि मुख्य म्हणजे चंद्रपूर–आलापल्लीला 'इचमपल्ली–भोपाळपटनम्' घटनासबंधीच्या एका परिसंवादाची तयारी करायची होती. प्रत्यक्ष हजर रहायचे होते.

आता चंद्रपूर जिल्ह्यातील (आताचा गड-चिरोली जिल्हा) नागेपल्ली या छोटे-खानी गावात बसूनच या अडी-अडचणी-विषयी सांगतो आहे इंचमपल्ली-भोपाळ-पटनम् या महाकाय धरणाखाली चाळीस हजार हेक्टर जंगल आणि दीडशे आदिवासी गावं जाणार आहेत धरणांना विरोधासाठी आमचा विरोध नाही; पण धरणामुळे होणारे नफे-तोटे आम्हाला तपासून पहायचे आहेत. पवना धरणाच्या 'विकासा'तून भकास झालेली गावे मी पाहिली आहेत. माझ्यासारखाच कटु अनुभव असलेले मित्र मध्यप्रदेश–बिहार–ओरिसा–आंध्र–गुजराथ राज्यातूनही आहेत. आम्हाला अनुभवाची–विचाराची देवाण-घेवाण करायची आहे. आमचा अनुभव बुडू घातलेल्या स्थानिक माडिया गोंड आदिवासींना सांगायचा आहे.

आणि या महाघोर पातकासाठी आमच्या बैठकीच्या जागेला चारही बाजूनी पोलिसाचा वेढा पडला आहे. जागोजाग सशस्त्र पोलिसांचा पहारा आहे. आपल्या भविष्यात काय वाढून ठेवले आहे हे केवळ जाणून घेयासाठी, पायी – बैलगाडीतून – ट्रकमधून येणाऱ्या जनतेला दंडुक्याच्या जोरावर हाकलून लावण्यात येत आहे. गावा-गावात पोलीस घुसत आहेत.

चलो, पंजाबकी झलक यहीसे चालू हो गयी! की फरक पेंदा! चंद्रपूर या चंडीगड. जाता तो है.

बोलो सत् श्री अकाल की ऽ

सो ते हाल की –

¤

---

## राजधानी देहली

---

चंद्रपूरहून निघताना मित्राचा निरोप घेता. घेता मित्राला सहज म्हटलं 'अब पूना कब आ रहे हो–'

'अबे पहले जिंदा वापस तो आ, बादमे पूना–बिनाका सोचेंगे–'

'चला शुभ मुहूर्तालाच नाऱ्या भेटला!'

मद्रासहून दिल्लीला जाणारी आमची जी टी. तुफान धावत होती. भारत नावाच्या माझ्या देशाचे वैभव आसमंतात बहरले होते. पळस पाकळी–पाकळीने पेटला होता. इंग्रजीमध्ये त्याला किती सुंदर नाव आहे. Flame of the forest त्याची भडकती लाल–भगवी ज्वाला विस्तीर्ण रानाच्या पार्श्वभूमीवर खुलून उठत होती. मी वेड्यासारखा खिडकीमध्ये तोंड घालून बसलो होतो; पण माझा हा सखा–सुखा रंगास्वाद कोणातरी शौकिनाला आवडला नसावा. उघड्या खिडकीतून फवारा आत आला आणि खाड्कन् लक्षात आलं आज धुळवड. आज तो कायदेसे ये काम होगा. काय मजा आहे. पूर्वीचे शूर शिलेदार शिलंगणाला सोनं लुटायला बाहेर पडायचे और हम होळीला बोंब ठोकायला नियमाने बाहेर. धनबाद–अदवानी, आलापल्ली-आमचे असेच रंगिले स्वागत होणार!

दिल्लीला नाम के वास्ते थांबून पुढे सरकायचे होते, कारण वेळापत्रकाप्रमाणे यात्री २६ तारखेलाच दिल्लीहून हरयाणा-पंजाबकडे कूच करणार होते. यात्रेचे दिल्लीमध्ये कसे आगत स्वागत झाले याची सहज चौकशी केली. फारशी अपेक्षा नव्हतीच. कारण राजधानी देहलीला 'जोडो भारत' सारख्या आलतू फालतू विषयात रसही नसावा आणि वेळही नसावा याची खात्री होतीच. झालेही तसेच वर्तमानपत्र आणि टी. व्ही. यानी चांगली प्रसिद्धी दिली तरी सर्वसामान्य माणूस, विशेषतः तरुण पब्लिक यात्रेकडे फारसे फिरकले नाहीत सारे नामदार–खासदार तर आपापल्या मतदारसंघात राष्ट्रीय ऐक्यासाठीच गेले असावेत कारण संसद भवनाच्या आवारात सभा घेऊनही इने–गिने खासदार हजर होते नाही म्हणायला पंतप्रधानांनी चांगली तास सव्वा तास खाजगी भेटीसाठी सवड काढली.

दिल्लीहून लगेच सटकायचा माझा बेत माझ्या मित्रा–मैत्रिणींनी पार धुळवडीस मिळवला. अर्थात एका दिवसाने फार–काही बिघडणार नव्हते; पण एक वांदा झाला. दिल्ली दूरदर्शनवरून रात्री प्रसारित होणाऱ्या समाचार न्यूजमध्ये २७ तारखेच्या रात्री हाहाकार शिवाय दुसरे काहीच नव्हते. इसको लूटा–उसको पिटा–यह जल गया–वह गिर गया. पंजाबमध्ये आदल्या दिवशीच 'होला मोहल्ला' (धुळवड) साजरा झाला होता आणि आनंदपूर साहेबला रक्ताच्या पिचकाऱ्या उडाल्या होत्या. परिणामतः तमाम पब्लिककडून माझी पंजाब यात्रा धोक्यात आली, बातम्याचाच हवाला देऊन मी इमानाने सांगून पाहिले जगातली अशी एखादी तरी जागा दाखवा की मी बिनधास्त जाऊ शकेन, पण सर्वांचा घोशा कायम, आतापर्यंत झालं तेवढं भटकण (आणि मूर्खपणा!) बस्स झाला. आता तरी शहाणे बना. यातला गमतीचा भाग सोडला (!) तरी सार्वत्रिक काळजीचा सूर एवढा सप्तकात पोहोचला की माझं मलाच वाटायला लागलं की मी केशरिया करायला चाललो की काय!

पण नेहमीचाच अनुभव आताही येत होता. रणक्षेत्र जसजसे जवळ येऊ लागले आणि इथे तर प्रत्यक्ष पानिपत–सोनिपत–कुरुक्षेत्र अशी एकसो एक महा रणक्षेत्र–तशी सर्वत्र आणखी आलबेल ! आमची हरयाणा परिवहनची बस झटका आल्या-सारखी अधी मधी थावत होती. पुढे चंडीगड अमृतसरला जाणारे पॅसिंजर आपल्या फार पुढ्यात काय वाढले आहे याची फारशी फिक्र न करता तूर्तालि इमिजियट पुढच्यावर मस्तपैकी ताव मारत होते. पकोडे–छोले–सामोसे झोडत होते. मला बापट सराची आठवण आली. ते नेहमी म्हणतात, अदर्स आर फिलॉसॉफर्स, सरदार्स आर हॅपी. बसच्या खिडकीतून आरपार क्षासमतापर्यंत टेकलेल्या गव्हाच्या शेताकडे बघून मी भारावलेल्या आवाजात म्हटल, ' बहुत ही हरित हरितक्राती (व्वा ! क्या वाक्य जमा है ! )

माझ्या शेजारचा सरदार आणखी एक गलेलठ्ठ समोसा मटकावत आरामात म्हणाला, अज्जि हरयाण्णा क्या और सारा पंजाब क्या, यहाँ एकही कल्चर (Culture) हैं, वो है जी अॅग्रिकल्चरऽ और क्या !

¤

अंबाल्याला पोहोचेपर्यंत माझ्याही मनावरचा ताण जरा कमी झाला होता, पण आता दुसराच भुगा लागला. सकाळी दिल्लीहून निघताना जरा उशीर झाला होता तरी यात्री वाटेत कुठेतरी भेटतील, निदान ते पुढे गेले की नाही याची पक्की खबर मिळेल याची खात्री होती. कारण पुरेपुर सायकलबहादूर–बस–जीप–तीन चाकीचा ( भारत जोडो) काफिला कुठेही लपण शक्यच नव्हत; पण वाटेतले लोक खुशाल सांगायचे आगे है ऽ, पीछे है ऽ, आनेवाले है ऽ आ चुके है. अंबाल्याला पोहोचल्यावर तर कहर झाला. फुटबॉल चौकातल्या रुक्मिणीदेवी हॉलमध्ये सभा आहे म्हणून मी तडक गेलो तर तिथल्या भरदार मिशीवाल्या वॉचमनने माझ्या छातीवरचा ' भारत–छोडो 'चा बिल्ला पाहून मलाच झापलं. तुम्हारे जोडोवाले छोडकर पूछनेके लिए सारी दुनिया यहा आ गयी समोरच वेष्णो धावा होता. स्मार्टशा दिसणाऱ्या तरुण मालकाला विचारल ' साब अपने देखे, हमारे भारत ऽ जोडोवाले–

' –जी हम सब्जी रोटी जानते है ' आणि मग काचेपलिकडे बसलेल्या सरदाराकडे बघत हळू आवाजात म्हणाला, ' हम तो तोडने बैठे हैं. पहले उप्परसे मरोडो फिर जोडो आणि मग आपल्याच विनोदावर भीषण–सुदर हसला !

## मुक्काम अंबाला

अंबाल्याच्या दोन सभा. पहिली जाहीर. दुसरी यात्रिकाची. दोन्ही ठिकाणी पब्लिक अलग-अलग, पण मुख्य वक्ते बाबा.

पहिली अंबाल्याच्या रोटरी क्लबने आयोजित केलेली. आगत-स्वागताचे नेहमीचे सोपस्कार झाले. मग यदुनाथजीचे छोटे, पण मार्मिक निवेदन. ९ एप्रिलला भारत जोडो दिन पाळायचे आवाहन. निवेदन आटोपताच ' जोडो भारत ' च्या जोरदार गीताला सुरुवात –

' जोडो भारत जोडो भारत
नवयुगने ललकारा है
हम युवकोका नारा है –'

मी सभागृहावरून नजर फिरवतो. यात्रेचे युवक सोडून बाकी युवकांची सख्या कमीच दिसते आहे. शीखही कमी आहेत. अंबाला हे पंजाबच्या सरहद्दीवरचे गाव. गावात व इथे अंबाला कॅंटमध्येही शिखांची संख्या बऱ्यापैकी. अशा प्रयत्नामध्ये निदान त्याना तरी आस्था असायला हवी स्वार्थ आणि परमार्थ दोन्हीपोटी पण भाषणामध्येही एकूण सूर सावधानतेचाच.

पण सर्व कसूर बाबांच्या भाषणाने भरून काढली. बाबा तसे समूहातले पट्टीचे वक्ते नाहीत. पण कन्याकुमारी ते अंबालापर्यंत त्यानाही चांगला रियाझ घडला असावा. सुरुवातीलाच त्यानी दिल्लीच्या दगलीत विधवा झालेल्या महिलांच्या भेटीची कहाणी ऐकवली. विधवाचे दुःख मोठे होते. पण सांगणारा परत परत ' शीख विधवाचे दुःख ' असा शब्द वापरत होता. कहाणी ऐकवून बाबानी सभेला सवाल केला ' आपही बता दो बेबाके आँसू को कोई धर्म या जात होती है ? बेबाके आँसू ऽ आँसू होते है. ' या शब्दांनी ठाव घेतला होता. मग दुसरी गोष्ट आनदवनातल्या आधळ्या आनंदची. अंध.-काराच्या दुनियेत डुबलेला आनद. नेत्र-दात्याच्या मदतीने प्रकाशाच्या जगात आला. उगवणारी पहाट–बागडणारी फुलपाखरं– आईबापाचे सुखावलेले चेहरे पाहू लागला. हळूहळू वाचूही लागला आणि प्रकाशाच्या जगात होणारी तोडफोड वर्तमानपत्रात वाचून एक दिवस आतून उन्मळून आला आणि म्हणाला, ' फोडून टाकतो माझे डोळे. प्रकाशाचा शाप भोगण्यापेक्षा, अंधाराचा शाप चालेल –'


सभा सुन्न झाली. प्रत्येकालाच हा अंधार-प्रकाशाचा जीवघेणा खेळ जाणवत होता, पण प्रकाशाचा देवदूत कोण बनणार ! सभेनतर परत एकवार ' जोडो भारत ' चा नारा झाला सुरुवातीपेक्षा बरेच हात एकसाथ वर झाले

संध्याकाळी अंबाल्यातील एक धनिक समाजकार्यकर्ते सुखवंतसिंग याच्याकडे बडाखाना. खाना सर्वार्थाने बडा–मेनूही. आणि गावातील इतर बड्या लोकांबरोबर पंजाबचे महसूलमंत्री उबोळेसिंग स्वागताला प्रत्यक्ष ( हरयाणात ) हजर. उबोळेसिंग हजर म्हणून आत-बाहेर-इथे-तिथे कडक सिक्युरिटी. साधी लाठी-काठी नाही तर स्टेन्गन, लाइट मशिन गन्, रिव्हाल्वर– नुसत्या खिरापतीसारख्या. गणवेशातील आणि मुफ्तीमधलेही पोलीस. खाना बढिया था, पण सारखी भीती. न जाणो कोणाच्या नळीतून गोळी उडेल का. पकोडा जरा कडक लागला, हॅन्ड ग्रेनेड तर नाही ना म्हणून पटकन् तोंडातून काढून खात्री करून घेतली !

रात्रीच्या सभेचा मामला जरा गंभीर होता. मंत्रीमहोदय मेजर उबोळेसिंग साहेबानी सागून पाहिले होते ' आपण आलात, एवढे कष्ट घेतलेत त्यावद्दल खरोखर आभारी आहोत. पण सरळ-सरळ चंडीगड–आनदपूर साहेबाला जायचा विचार सोडून, थोड्या सुखरूप रस्त्याने गेलात तर बरे होईल –'

बाबानी यात्रिकाना सवाल केला–' बोला काय विचार आहे ? ठरवलेल्या मार्गाने आणि तारखाना जाण्याचा माझा निर्धार आहे. कोणाला भीती वाटत असेल, तर न लाजता सागा. पण आपण हिंमत सोडता कामा नये आताच खरा कसोटीचा क्षण जवळ येत आहे, बोला काय करणार –'

सगळ्या बहादूर जवानाचे हात क्षणार्धात



सुवर्णमंदिराच्या खालोखाल महत्त्व या आनंदपूरसाहेब गुरुद्वाराला ! (रेखाचित्र–सुभाष रोठे)

□

वर झाले– ' हम आगे बढेंगे –'

□

रात्री झोपताना एका साथीदाराशी गप्पा मारत बसलो होतो. त्याने उत्साहाने मित्राचे आलेले पत्र दाखवले. पत्रात लिहिले होते –

' फिकीर करू नकोस, तुझ्या जीवाला धोका झाला, तर आम्ही एकाचा बदला दहाने घेऊ ! '

□

पहाटे-पहाटे शिट्टी झाली. मंडळी सराईतपणे फटाफट तैय्यार झाली. माझा वांदा. उठण्याचा नाही, कारण मी सूर्यवंशी असलो तरी आला प्रसंग साजरा करतो. पण आता प्रश्न होता घुमायचे कुठे. कारण तमा मी शेवटी शेवटी आलेला उपरा. सायकलवाले-गाडीवाले–ट्रकवाले–बसवाले या सर्वांच्या जागा फिट्ट झालेल्या. सुदैवाने फर्मान निघाले. पायलट–जीपवर सवार व्हायचे. ' पुढचा प्रवास बिकट आहे, जरा हुशारीने घे –' बावांनी सांगितले आणि मी उगाचच फुशारून गेलो.

पहिला थांबा पंजाब सरहद्दीवरचा. गाड्यांच्या कागद-पत्रांची तपासणी झाली. माझ्या मनात उगाचच शंकेची पाल चुकचुकत होती. आता केवळ हीच कागदपत्रं पण ' पुढे भविष्यात खलिस्तानला जाण्यासाठी व्हिसा-पासपोर्ट लागणार नाही ना ?' मागे बेळगाव-कारवारच्या रणधुमाळीत मी काढलेला ट्रान्सिट-व्हिसा वाया गेल्याचा आनंद अजूनही आहे. तरी पण सांगता येत नाही. आताही मामला गंभीरच होता. सायकलस्वारांना मार्गदर्शन करण्यासाठी यात्रेबरोबर दोन टी. व्ही एस्. गाड्या होत्या पण पंजाबमध्ये स्वयंचलित दुचाकी-तिचाकी वाहनांना बंदी. सरहद्दीवरच्या तगड्या जवानाने खणखणीत बजावले ' जोडो ऽ जोडो सब ठीक, मगर गड्डी ट्रकमे डालने पडेगी कायदेसे –' त्याच्या पिळदार दाढी-मिशांकडे बघून कायदे-भंग करण्याची आमच्या बापाची ताकद झाली नसती.

## नेक एक नही होते

लालडी मंडीतल्या दुर्गादेवी मंदिरात पहिले स्वागत होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघातर्फे लालडी मंडी पंजाबमधले सर्वांत मोठे खेडे. चहुबाजूंनी नाना तऱ्हेच्या अफवा येत होत्या. पण गावात अजून शांतता टिकून होती. अनेक गावकरी मुंबई पुण्यात चाकरी केलेले. आवर्जून तिथल्या सुखद आठवणी सांगत होते. जवान बचनसिंग जवळ उभा राहून ऐकत होता. त्याला सहज विचारले; ' काम क्या करते हो–'

' दुकान लगाया है –'

' कब से ?'

' अभी–अभी '

' उसके पहले ?'

' बंबईमे रे रोडमे काम करता था–'

' फिर ?'

' छोडके आया–'

' क्यू ? बंबईमें तो कुछ नही हुआ–'

' पहले बार कुछ नही हुआ, पर भरवसा नही लगता–'

जवान बचनसिंगचे हे शल्य तर डेराबासीच्या बुढ्या हुकुमसिंगाचे दुःख आणखी काळजाला हात घालणारे.

डेराबासीच्या स्टेट बँक ऑफ इंडियाच्या गच्चीवर स्वागत समारंभ चालला होता– रोटरी क्लबतर्फेच. या रोटरी–लायन्सवाल्यांना सपशेल मानतो आपण. एवढ्या इमानाने देशसेवा–समाजसेवा करतात, पण अध्यक्ष–उपाध्यक्षांची भाषणे, हातोडी आपटणे काही जात नाही. त्यात बुढ्या हुकुमसिंगाने सलामीलाच सुरवात केली, ' मैं जब जर्मन (!) में था, एक दिन इस्टोर्समें गया'

वाटलं वाट लागली. आमचे संयोजक परत परत सांगत होते, चंडीगडला पोहोचेपर्यंत अजून बरीच गावं आहेत. इथल्या कार्यक्रमासाठी फक्त पंधरा मिनिटं आहेत. तुम्ही जेवढे बोलाल, तेवढा बाबा बोलायचा वेळ कमी होईल–'

पण बाबा हुकुमसिंगांना त्याची फिक्र नव्हती. त्यांनी आपली बर्लिन–गाथा पुढे चालू केली. ' मैं एक चीज खरीद रहा था, इतनेमे किसीने आवाज दीया, सत् श्री अकाल '

' मैणू देखा, एक सफेद जर्मनी (!) मेरे तरफ आया होर मैणू खरेदी हुअी चीज देखके पूछा–मालूम है कहा बनाया–

' मैणू पढके बताया–मेड इन जर्मनी–

' फिर वो बोल्या ' ठीक देख्खो. अंदर ठीकसे देखी–मेड इन लुधियाना–इंडिया–'

' अजि तुसी फिरसेही जाओ जर्मनी–रश्या–अमरिका– लुधियानाका नाम गौरसे चलता था–'

आणि मग म्हातारा एकदम तुटून पडला.

स्फुंदत-स्फुंदत म्हणाला 'साडी लुधियानामे यी की होया! (अतिरेक्यांनी आधल्या दिवशी लुधियानामध्ये १४ जणांची पिसाट हत्या केली होती) अब दुनियादी कैसे मुँह बताओ–' म्हाताऱ्याने अक्षरशः सभेच्या काळजाला हात घातला. माझ्या अंगावर सर्रकन काटा आला. लुधियाना इथून केवळ पाच–पंचवीस मैलांवर तिथली दोस्तमंडळी अन्नासाठी दाहीदिशा पांगली होती, तरी लुधियाना जागेवर होते. लुधियानाचा वीत-भर लांबीचा चौडा बझार, डंडीला स्वामीचा मठ, आम्ही रहात असलेल्या कनवाळू कृपाल-सिंगचे गुरुद्वारवजा घर, चाचीजींनी प्रेमाने बळे–बळे खाऊ घातलेले माखनचे डोंगरा-एवढे गोळे–

आणि आता बाबा हुकुमसिंग डोळ्यात पाणी आणून सांगत होता– 'कुछ कोरोसो नहीं दंगदा पता नही. दंगदा की होनेवाला है, भगवान तुम्हे खुश्श रखद–'

¤

बाबानी दोन वाक्यात सभा आटोपली 'अपन सभीको चाहिये भाईचारा. सभी लोग चाहते है, मगर दुखकी बात यह है की, 'नेक आदमी एक नही होते–'

¤

चंडीगड जवळ येऊ लागले तसे अफवांचे पेव फुटले. चंडीगडमध्ये कर्फ्यु आहे. चंडी-गडची नाकेबंदी केली आहे वगैरे साहजिकच वातावरणात जरा तणाव आला. पण गाव दिसू लागले तसा अ. भा. वि. प. च्या स्वागतकाचा ताफाच्या ताफा स्कूटर-मोटर-सायकलवरून सामोरा आला. 'ट्रिब्यून चौकात' स्वागताचा मोठाच्या मोठा बोर्ड लागला होता. चंडीगडच्या आखीव-रेखीव चौका-चौकातून जोरदार नारे देत यात्रा मुक्कामाच्या जागी पोहोचली तेव्हा तर महिलांनी चक्क पंचारतीने ओवाळले आणि पेटी-तबला वगैरे घेऊन 'स्वागत करूया' छाप गीत म्हटले. सध्याकाळचा सांस्कृतिक कार्यक्रम साधारण याच थाटाचा 'आंतर-भारती' कार्यक्रम होता. म्हणजे एखादा गरबा भागडा-रविंद्रो संगीत वगैरे. अर्थात याला विरोध असण्याचं काहीच कारण नव्हत. पण अशा साजूक समारंभातून फार काही साधेल असं वाटत नव्हत.

दुपारी येताना वाटेत एकाने विचारले होतेच, 'भाईसाब, आपने तो बडी सडक पकडके रख्खी है। बडा रस्ता छोडके जरा गावोमे जाके देखो, जो कुछ हो रहा है, वही हो रहा है।' त्याच्या म्हणण्यात तथ्य होतेच पण त्याचा प्रतिवाद करायला तिथलाच दुसरा गावकरी पुढे सरसावला– गावमे क्या खाक रखा है, जो भी हो रहा है यह शहर-वालोने बिगाडा है, जो जोडना–तोडना है वहीसे शुरू करो।

रात्री दरवाजे बंद करण्याच्या वेळी समजलं, फिरायला गेलेले पाच-सहा साथी अजून परत आले नाहीत. मध्यरात्री कोणी-तरी बातमी आणली, गावात फायरिंग झाल दोन ठार. काही वेळाने ठारांची संख्या दोन-वरून पाचवर गेली. गावातला गोळीबार पलिकडल्या चौकात झाला सयोजक काळजीत.

मधल्या काळात लापता साथीदार दर-वाजावरून उड्या मारून आत शांतपणे घोरत पडले होते!

## हराभरा पंजाब

चंडीगड–आनंदपूरसाहिब रस्ता म्हणजे केवळ लाजवाब! दूरवर पसरलेल्या शिवा-लिक पर्वताच्या रांगाचा विस्तीर्ण कॅनव्हास. एका बाजूला क्षितिजाला भिडलेली सोनेरी गव्हाळ शेतं, तर दुसऱ्या बाजूला सतलजचा कधी खळाळ तर कधी शांत वहाणारा भरपूर ऐस-पैस कालवा कालव्यातून वहाणारे हिरवटसर पाणी. कालव्याच्या काठाने सर्वां-गाने बहरलेली कचनारची (कांचन) निळी-जांभळी झाडे. अधूनमधून बोगनवेलीची उधळण माझ्याकडे मीठ–मोहऱ्या असत्या तर या आसमंताची, आसमंतातील कशाला, अख्ख्या हऱ्याभऱ्या पंजाबची दृष्ट काढली असती. कोणा आल्यागेल्याची दृष्ट लागली देव जाणे!

या स्वप्नील दृश्यातून जाग आणली शीख निहंगाच्या एका रांगड्या जथ्याने. एखाद्या वेस्टर्न टेकसास सिनेमात शोभावा असा हा जथ्था. देखणे–तगडे घोडे, त्यापेक्षाही तगडे घोडेस्वार, गर्द निळे कपासा–सरफे, कपासावर लोंबणारी भरपूर लांब दाढी, हातात उंच भाले, कमरेला तलवारी, अधून-मधून एखादा रथवजा गाडा, त्याच्यावर नौबतखाना आम्ही आपले अवसान गोळा करून 'जोडो भारत ऽ' ओरडत होतो. 'सत् श्री अकाल ऽ बोले हो निहाल–' हाता-तले भाले उंचावत त्याचा प्रतिसाद मिळायचा. हा बाबा बकालसिंगाचा जथ्था. बाबा विरात-सिंग, बाबा देहासिंग, बाबा केअरसिंग असे नाना बाबांचे जथ्थे मुळातली ही गुरू गोविंदसिंगाची लाडली फौज. कडवी जान हथेलीपर ले चलनेवाली. सध्याची स्थिती मात्र लाडावलेली. ही फक्कड सेना खाना–पिना–लढना यामध्येच मशगूल. 'ऑपरेशन ब्लू स्टार' नंतर निहंग–बाबा खरकसिंगला हाताशी धरून इंदिरा सरकारने कारसेवा घडवली जखमेवर आणखी मीठ चोळले गेले काम झाल्यावर खरकसिंगला बाजूला फेकला. तो काय लायकीचा होता हा प्रश्न नाही; पण सध्याचा पेटलेला पंजाब म्हणजे इंदिराजींची कृपा अकालींना शह म्हणून जवान जर्नेलसिंग भिंद्रनवालेला हाताशी धर. भिंद्रनवाले डोईजड झाल्यावर तोहरा तड-वडीला पुढे कर शेवटी परिणाम एवढाच झाला भिंद्रनवालेचा भस्मासूर डोक्यावर बसला आणि स्वत बरोबर 'मोहिनी' चाही त्याने घात केला. अकालीही काही मागे नव्हते. एवढ्या आटयापिटयानंतर, बर्नाला सरकार स्थापन झाल्यावरही तोहरा त्याविरुद्ध, फेडरेशन आणि दमदमी टकसाळशी सधान बाधून होते

¤

शिवालिक टेकड्यांच्या पायथ्याशी वसलेले सुंदर आनंदपूर साहिब गाव आणि कच-नारच्या फुलासारखी जांभळट झाक असलेला केशगढ साहिब गुरुद्वारा पहाताना पहिल्या क्षणी विश्वासच बसेना केवळ चार दिवसा-पूर्वीच इथे एवढे महाभारत घडले असेल!

अमृतसरच्या सुवर्णमंदिराच्या खालोखाल महत्त्व आनंदपूरसाहिबच गुरू गोविंदसिंगानी खालसा पंथाची स्थापना या इथेच केली पच पियारांची निवड इथलीच मुगलांची मुगलाई मोडून काढण्यासाठी शिखांच्या या दहाव्या धर्मगुरूने कडव्या खालसा पंथाची स्थापना करून पंच 'का' रा (केस–कंगी–कच्छा–कडा–कृपाण) चा मंत्र दिला. जाती भेद मोडून काढण्यासाठी 'संगत' आणि 'पंगत' वर जोर दिला स्वत चे चार मुले युद्धात मारली गेल्यावरही संग्राम जारी ठेवला. पण गुरू गोविंदसिंग नुमताच बहाद्दर योद्धा नव्हता, तर योद्धा संत होता. मृत्यू

शय्येवर पडलेल्या औरंगजेबाने भेटीची इच्छा दर्शवताच त्याला भेटण्यासाठी स्वतः दक्षिणेत आला. पितृशोकात बुडालेल्या औरंगजेबाच्या मुलांवर हल्ला करण्यास नकारलाच, उलट न्यायबुद्धीने राजपुत्र बहादुर शहाला गादी मिळवून देण्याचा प्रयत्नही केला. अखेर नांदेडला सिरहिंदच्या नवाबाच्या हस्तकाच्या खुनी हल्ल्याला बळी पडेपर्यंत दशमेराजी ( दहावा गुरू ) याच प्रयत्नात होते !

पण मला वाटतं शत्रूंनी अशा संत महात्म्यांचे खून एकदाच पाडले असले तरी त्यांचेच अनुयायी प्रतिदिन दिन–दहाडे त्यांचे खून पाडत असतात. आनंदपूर साहिबचा ताजा इतिहास त्याचा साक्षी आहे.

होळीच्या दुसऱ्या दिवशी इथे ‘ होला–मोहल्ला ’ म्हणजे धुळवडीचा सण साजरा होतो. लाखो शीख जमतात. सुवर्ण मंदिरात दमदमी टकसाळ आणि ऑल इंडिया शीख-स्टुडंट्स फेडरेशन कडून अपमानित आणि पराजित झालेल्या अकाली दलाच्या मुख्यमंत्री बर्नाला सिंगांनी या संधीचा लाभ घेण्याचे ठरवले. फेडरेशनचा नेता मोहकमसिंगही याच मेळाव्यात भाषण करायला अमृतसरहून रवाना झाला. वाटेत त्याला पकडल्यावर फेडरेशन आणि दमदमी टकसाळवाल्यांची भूमिका आणखीनच कडवी झाली. राजकारणी बर्नालांना ( या पंजाबात राजकारणी कोण, धर्मकारणी कोण, राजकारणावर धर्मकारण करणारा कोण आणि धर्मकारणात राजकारण करणारा कोण, गुरूनानक शपथ कळणं कठीण आहे. अर्थात गुरुजींनीच याची सुरुवात केली होती. तेव्हा काळाची गरज असेल, पण त्याचा आजचा नतीजा माहीत असता तर गुरुजींनी ‘ शीख ’ धर्माची दीक्षा दिली नसती! ) मेळाव्यात बोलू देणार नाही अशी त्यांनी धमकी दिली आणि ती प्रत्यक्षात उतरवली. परिणाम ? फक्त १४ ( तेही सरकारी आकडयांनुसार ) ठार, कित्येक घायाळ.

गुरुद्वारात आमचे औपचारिक स्वागत झाले. बाबांना काही भेट–विट अर्पण करण्यात आली. संध्याकाळी कर्फ्यू चालू व्हायच्या आत जेमतेम सभा झाली. लंगरमध्ये पोटभर जेवू-खाऊ घातले गेले; पण पाहुणे आला आहात, या बसा जेवा–खावा आणि चालू लागा, या स्वरूपातले.

खरे अंतरंग संध्याकाळी–रात्री गटागटाने झालेल्या औपचारिक चर्चांमध्ये उघडे झाले. गुरुद्वाराशी संबंधित काही जण अतिरेक्यांच्या नावाने बोटं मोडत असले तरी खरा घुस्सा ‘ विश्वासघाती ’ केंद्र सरकारवर. जवळजवळ प्रत्येकानं आम्हाला सुनावले ‘ जोडो जोडो ’ की बाते वह दिल्लीवालोंको सिखाओ– उन्होंने तो तोडना शुरू किया है। हम कैसे की लोंगोवाल करार मानने के लिए तैय्यार हो जाते, मगर वहाँ भी धोखा खा बैठे। जवानांमधील काही जणांची मनःस्थिती तर आणखीनच कडवी होती. पहले तोडो ऽ फिर जोडो ! ( हसके लेंगे पाकिस्तान – या धर्तीची ) बाहेर रस्त्यावर दिल्लीच्या दंगलग्रस्तांची दुकाने आहेत. त्यांनी भिंद्रनवाले, बियांतसिंगचे फोटो खुले आम विकायला ठेवले आहेत. दंगलीत होरपळलेल्या एका विधवेनं बजावलं, ‘ उद्या पंजाबात घरोघर भगतसिंगाबरोबर बियांतसिंगाचे फोटो लागतील ! ’ हे विष कुठवर भिनत जाणार काही समजत नाही.

□

सूर्य दूर अस्ताला चालला आहे. तिन्ही सांजा दाटल्या आहेत. चार दिवसांपूर्वीच चौदा माणसांचा बळी घेतलेले मैदान समोर पसरले आहे. माझ्यापासून दोन फुटावर पोलिसी गोळीबारात ठार झालेल्यांचे रक्त साकळलेले आहे. कर्फ्यू लागला आहे. तर गुरुद्वारात गुरुवाणीला सुरुवात झाली आहे; पण मन त्यात गुंतत नाहीये.

मनात विचार दाटत आहेत–

‘ मंदिर–मस्जिद–गुरुद्वारोमें
बाट दिया भगवानको
धरती बाटी, अंबर बाटा,
मत बाटो इन्सानको ’

□

( पुढील अंकी चालू )


ग्रामीण भागात
डॉक्टर्स नेण्याचा प्रयत्न
भारतात प्रथम
डॉ. आयडांनी केला.
त्यांच्या त्यागमय
जीवनाची कहाणी.

**डॉ. आयडा स्कडर**

सौ. वीणा गवाणकर

बावीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.

वैराण मुलुखाचे
सुजलाम् सुफलाम् भूमीत
रूपांतर करणारा
थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ
डॉ. कार्व्हर यांचे प्रेरणादायी
चरित्र.

**एक होता कार्व्हर**

सौ. वीणा गवाणकर

तीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.

डोंबिवली : जुनी आणि नवी

# पोळी भाजी केंद्र : सोय, मुक्ती की परावलंबन ?

आजचे डोंबिवलीचे स्वरूप ज्याला ठाऊक आहे, ज्याने हे शहर पाहिले आहे आणि ज्याला पूर्वीचे डोंबिवली हे गाव ठाऊक नाही, त्याला त्या आटोपशीर गावाची कल्पना येणे शक्य नाही आजचा अफाट विस्तार होण्यापूर्वी हे गाव चार पाच विभागांचे बनले होते. डोंबिवली हे नाव बदलून 'पचनगरी,' 'पचनगर' असे नाव द्यावे असेही एका ज्येष्ठ कार्यकर्त्याने ( कै. अण्णा कापरेकर ह्यानी) सुचविले होते. पु भा. भावे ह्याच्या मृत्यूनंतर ते दीर्घकाळ डोंबिवलीत रहात होते म्हणून ह्या गावाचे नाव 'भावे नगर' असे करावे अशी सूचना श्री. गो. शं. हुजुरबाजार ह्यानी दैनिक लोकसत्तात एक पत्र लिहून केली. त्याच्या त्या सूचनेला अनेक डोंबिवलीकरानी आणि डोंबिवली-बाहेरील पत्रलेखकानी कडाडून विरोध केला. अशा ह्या शहराचे लोहमार्गामुळे दोन भाग पडले पूर्व डोंबिवली आणि पश्चिम डोंबिवली. मध्यरेल्वेवरील अनेक उपनगरे पश्चिम भागात भरभराटीला आली आणि पूर्व भाग त्या मानाने मागासलेला राहिला. आजची डोंबिवली दोन्ही अंगानी सुदृढ झाली आहे

डोंबिवली स्थानकावरून पूल उतरून पूर्व बाजूस आल्यानतर पूर्वी एक ते नऊ अशा क्रमांकाच्या गल्ल्यानी बनलेले सुभाषनगर लागे. त्या गल्ल्या ओलांडून जरा पुढे गेल्यानंतर दिसे सारस्वत कॉलनी. सुभाषनगरच्या पाठीमागे पण जरा अंतर चालून गेल्यानतर होते ( आणि आहेही ) टिळकनगर. एका बाजूला रामनगर म्हणून ओळखली जाणारी बाजू आणि पश्चिमेकडील काही मोजक्याच घराची, त्यावेळच्या भाषेत 'लायनीपलीकडील' वस्ती असे डोंबिवली गावाचे स्वरूप होते. हे गाव त्यावेळेस घराचे नकाशे समत करून, आर्किटेक्ट नामक तज्ञाकडून, अभियतानामक विशेषज्ञाकडून बाघले न गेल्यामुळे की काय अत्यत आखीव आणि रेखीव होते. आरोग्याची, रस्त्याची नीट काळजी त्यावेळच्या पचायतीतल्या पंचानी घेतली होती. पचायत असूनसुद्धा नुसत्या पंचायती करण्यापेक्षा गावाचे भले कसे होईल ह्याची चिंता त्याना होती. ह्या साऱ्यापासून जरा वेगळी असणारी पश्चिम बाजूचीच चोळा ( ठाकुर्ली ) पॉवर हाऊसची 'बावन्नचाळ' म्हणून ओळखली जाणारी पॉवर हाऊस कर्मचाऱ्याची-मध्यरेल्वेच्या-वसाहत होती, आहेही.

आज मात्र पूर्व बाजूची डोंबिवली एका बाजूने, टोकाने ठाकुर्लीला जाऊन भिडली आहे, भिडते आहे. त्यामुळे डोंबिवली-ठाकुर्ली असे जोड शहरच तयार झाले आहे, होत आहे. काही वर्षांनी हैदराबाद-सिकंदराबाद, भिवडी-निजामपूर, तरे-ढोकी इ. जोड शहरात आणखी एका जोडीची भर पडेल. त्याचप्रमाणे दुसऱ्या बाजूने डोंबिवली शहर पसरत पसरत दिव्याकडे ( दिवा स्टेशनकडे ) जात आहे. तसे पाहिले तर डोंबिवली ते दिवा हे अतर खूपच आहे लोकलने डोंबिवलीहून दिव्याला पोचायला तब्बल सात मिनिटे लागतात. एवढे अतर कल्याण ते बोरीबदरमधील कोणत्याही दोन स्थानकात नाही काही दिवसानी डोंबिवलीची वाढ दिव्याच्या दिशेने होऊ लागली की डोंबिवली-दिवा ह्या दरम्यान एखादे स्थानक असावे अशी मागणीही येईल आणि डोंबिवली लोकलप्रमाणे ती टाळलीही जाईल. त्यामुळे आजच्या ह्या अस्ताव्यस्त पसरलेल्या डोंबिवली शहरातील एखाद्या प्रश्नाचा, विषयाचा मागोवा घ्यायचा, पाहणी करावयाची ठरविली म्हणजे एक प्रदीर्घ अशी प्रदक्षिणा घालावी लागते. त्यामुळेच ह्या पोळीभाजी केंद्राची पाहणी करण्यासाठी बाहेर पडलो तो श्री. श्रीकांत टोळ ह्याना बरोबर घेऊनच. त्यानाही ह्या विषयात रस आहे आणि मनमुराद भटकण्याची आवडही आहे गप्पा मारीत, शोध घेत फिरू लागलो.

कोणीही नवखा माणूस डोंबिवली स्थानकावर उतरून पूर्व आणि पश्चिम डोंबिवलीची, विशेषत. पूर्व भागाची बारीक नजरेने न्याहाळणी करू लागला तर त्याच्या नजरेत अनेक गोष्टी भरतील. त्याने ऐकलेल्या, वाचलेल्या, डोंबिवलीबद्दल त्याचा प्रथमदर्शनी तरी अपेक्षाभग होईल. शहर बकाल झाले आहे त्याचा निदर्शक असा पसारा स्टेशन-बाहेर आल्यानतर लगेचच नजरेस पडेल. मध्यरेल्वेच्या कार्यक्षम अधिकाऱ्यांची कर्तबगारी नजरेस पडेल. मध्यरेल्वेला नक्त उत्पन्न मिळावे, खूप फायदा व्हावा, उपनगरी वाहतुकीचा तोटा भरून निघावा म्हणून रेल्वेच्या आवारात उभे राहिलेले अनेक स्टॉल्स दिसतील. आवाराबाहेर, रेल्वेहद्दीबाहेर आल्यानतर विविध वस्तू विकणारे, पावभाजी, भेळपुरी इ. च्या गाड्या, केळी विकणारे, इ. सारे त्याचे मनापासून स्वागत करतील. त्या वातावरणात फुलांपासून अनेक प्रकारच्या पदार्थांमुळे निर्माण झाले गंध मिसळलेले त्याला अनुभवावयास मिळतील. ह्या विविधगधी वातावरणात रिक्षाच्या सुस्वर आवाजाचे सगीतही असेल. पुढे चालू लागल्यानतर रस्त्याच्या दुतर्फा, रस्त्यांवरच ठाण माडून बसलेले भाजीवाले ( आणि भटकी गुरे चुकविण्यास विसरू नका नाहीतर डोंबवलीची आठवण जन्मभर राहील ); फरसाण मेवामिठाईची, किराणा मालाची, चप्पल-बुटाची दुकाने, पाव-अंडी, बिस्किटे विक्री दुकाने; इडली, वडे, डोसे ह्याची कायम आणि तात्पुरती दुकाने, उसाची गुऱ्हाळे; चणे, शेंगदाणे, कुरमुरे विकणाऱ्या भडभुजाची (ती सारी उत्तर भारतीयाची मक्तेदारी) दुकाने, बटाटा वडा, भजी, सामोसे विकणारी दुकाने, पाणीपुरी, भेळपुरीची दुकाने; लहानमोठी हॉटेल्स आणि छोटी मोठी पोळी भाजी केन्द्र दिसतील त्यातील पदार्थ आणि दुकानाची एकूण सख्या न मोजलेली बरी एखाद्याला ही सारी दुकाने, स्टॉल्स, केन्द्रं पाहून असे वाटेल की ह्या शहरातील माणसे बाहेरच्या आयत्या पदार्थांवरच जगतात की काय ? ह्या अत्याधुनिक पद्धतीच्या घरातून (त्याची सख्या रोजच्या रोज वाढते आहे. जुन्या चाळी जमीनदोस्त होत आहेत) स्वयंपाकघर असते की नाही ? 'अहो अशा वास्तूना ब्लॉक्स, अपार्टमेंटस् म्हणावयाचे असते. आणि त्यात स्वयपाकघर नसते, त्याला

किचन म्हणावयाचे असते. अशा ह्या किचन-मध्ये काही शिजविले जाते की फक्त तेथे डायनिंग टेबलच असते असे वाटण्याजोगीच ही परिस्थिती लक्षात येते. तसे असावे असे ह्या विविध खाद्यपदार्थांच्या दुकानामुळे आणि तेथील ग्राहकाच्या गर्दीमुळे वाटते. त्यामुळे तूर्त पोळीभाजी केंद्रावरच लक्ष केंद्रीत करावयाचे ठरविले आहे. इतर विषय, पदार्थ खमग आणि चविष्टही आहेत; पण एकाचवेळी कितीना आश्रय द्यायचा? भाषा आणि सस्कृती ह्याचे नाते जसे अतूट असते तसेच नाते खाद्य आणि सस्कृतीचे आहे. नव्हे! नव्हे! ती तर साक्षात् सस्कृतीच आहे, खाद्यसंस्कृती. सस्कृत भाषेत एक सुभाषित आहे. 'यदन्नम् भक्षयेत नित्यम् जायते तादृशी प्रजा दीपो भक्षयते ध्वान्तम् कज्जलम्च प्रसूयते' (आता ह्यापुढे नुसतेच सस्कृत वचन उद्धृत करून चालणार नाही. अर्थ सागितलाच पाहिजे.) 'रोज ज्या तऱ्हेचे अन्न भक्षण केले जाईल, पोटात जाईल त्याप्रमाणे सतती (निकृष्ट वा उत्कृष्ट) निर्माण होईल. त्यासाठी उदाहरण दिले आहे दिव्याचे–तेलाच्या–दिवा काळोख खातो आणि काजळी निर्माण करतो.' त्यामुळे जशी भाषा तसा समाज; जसे शिक्षण तशी भावी पिढी; जसे अन्न तसे नागरिक (एकूण राष्ट्र) निर्माण होतात असे म्हटले तर वावगे ठरू नये.

डोंबिवलीत जितकी पोळी भाजी केंद्रं आहेत तितकी केंद्र कल्याण ते बोरीबंदर आणि चर्चगेट ते विरार ह्या विभागातही नाहीत काहीचे म्हणजे तर असे आहे की अशी केंद्र ह्या विभागात नाहीतच. अगदी गरज असूनही नाहीत. डोंबिवली येथील केंद्राचे सघटनात्मक कार्य पाहणारे (तशी अधिकृत सघटना स्थापन झाली नाही) आणि रामनगर येथील त्रिदल गृह उद्योगाशी सबधित श्री. श्रीकर आपटे म्हणाले, 'डोंबिवलीत आठ शाकाहारी आणि तीन मासाहारी पदार्थ विक्री केंद्रे आहेत. अर्थात ह्या अकराही केंद्रातून पोळी, भाकरी, भाजी ह्या पदार्थांनाच अधिक मागणी आहे. ही इतकी केंद्रं डोंबिवलीतच का आहेत ह्याची अनेक कारणे अनेकानी दिली. मी ह्या सर्व केंद्राना भेटी देऊ शकलो नाही आणि ज्या चार केंद्राच्या मालकाशी–खरे म्हणजे मालकीणबाईंशी– बोललो त्यावरून सगळ्याना भेटण्याची आवश्यकताही वाटली नाही. कारण ह्या चार केंद्रावरचे अनुभव कमीअधिक प्रमाणात सारखेच असल्याचे लक्षात आले आणि सान्याचे सारेच अनुभव अशा लेखात समाविष्ट करता येणे शक्यही नाही मी ज्या चार केंद्राना भेटी दिल्या त्यातील एक केंद्र वगळता तिनही केंद्र स्त्रियानी स्त्रियाच्या मदतीने चालविली आहेत. फडके रस्त्यावरील सौ. कुंदा काळे आणि सौ. जयश्री काळे ह्यानी चालविलेले 'शमी गृह उद्योग,' केळकर पथावरील श्री विलास नरगुदकर ह्याचे 'डोंबिवली महिला उद्योग सचालित क्षुणकाभाकर केंद्र' (ह्या नावावरून कल्पना येणार नाही. हेच ते मसालेदार, तोंडाला पाणी सुटेल अशा मांसाहारी पदार्थांचे केंद्र), टिळक पथावरील सौ. जयश्री कानिटकर (व श्री. बडोपत कानिटकर) ह्यानी चालविलेले 'त्रिमूर्ती गृह उद्योग' आणि रामनगर येथील सौ उर्मिला आपटे ह्याचे 'त्रिदल गृह उद्योग' ही ती चार केंद्र आहेत. ह्या सान्याचे अनेक अनुभव सारखे आहेत आणि विस्तारभयामुळे त्याची प्रत्येकाची नावे प्रत्येकवेळा लिहिता येणार नाही. ज्या ठिकाणी अगदी वेगळा अनुभव ज्याचा असेल तेथेच ते नाव मी वापरीन. ह्या सान्यानी अगदी आपुलकीने आपले अनुभव सागितले. त्यातून आकाराला आला हा लेख.

## बिगबाईटला पर्याय

दूरदर्शनवरील कार्यक्रमांची संख्या आणि वेळ वाढू लागला, दू. द ऽकत घेण्याइतपत ऐपत अनेकाची होऊ लागली; आपल्या गप्पात दू द. वरील कार्यक्रमाना अनन्यसाधारण महत्त्व येऊ लागले. हे कार्यक्रम आपण पाहिलेच पाहिजेत' असे येथील मडळीना वाटू लागले त्यामुळे आयत्या, तयार, चटकन् मिळणाऱ्या पदार्थांची गरज वाढू लागली, मागणी सुरू झाली. नोकरी करणाऱ्या स्त्रियाची संख्या वाढू लागली. एकत्र कुटुंबाऐवजी मियाबिबीचे कुटुंब वेगळे झाले. ते दोघेही नोकरी करणारे दिवसेंदिवस मध्यरेल्वेचा प्रवास अत्यंत त्रासदायक, जिकीरीचा, शरीर आणि मन मरगळवून टाकणारा, आवळून टाकणारा, अनिश्चित, बेभरवशाचा आणि वेळखाऊ होऊ लागला आहे. त्याबरोबर आयत्या खाद्यपदार्थांची आवश्यकता वाटू लागली. 'बिगबाईट' सारखा प्रकार पाढरपेशा मराठी मडळीना पटत नाही, परवडत नाही आणि आवडतही नाही. त्याला तयार पोळीभाजी हाच पर्याय चागला वाटतो. पाश्चात्य देशातून तयार अन्न डबे (टीन फूड) मिळतात त्याच्यावरच त्या माणसाचे पोट अवलबून आहे. हा डबाबंद अन्नप्रकार आपल्या येथे रुजला नाही. पुढेही रुजेल असे वाटत नाही. डोंबिवलीकरानी ह्या केंद्राना उदड आश्रय दिला आहे. त्यात एकटे, खोली घेऊन राहणारे; लॉजवर राहणारे; घरी अडचण आली म्हणून; अकस्मात् पाहुणे आले म्हणून; पत्नीचे आजारपण, माहेरपण, घराला रंग लावला म्हणून, रॉकेल, गॅस संपला म्हणून आणि आपला सर्वात आवडता, सर्वांचा आवडता मित्र–श्री कंटाळा–आला म्हणून इ. विविध कारणामुळे डोंबिवलीकर ह्या केंद्राकडे वळतात. सकाळी उठून किंवा उठायला उशीर झाला तर पोळीभाजी करीत बसण्यापेक्षा रिकामा डबा घेऊन केंद्रावर जावे, दोन–चार पोळ्या व भाजी घ्यावी व आरामात हातात हात घालून गाडी पकडावी. सध्याकाळी घरी यायला उशीर झाला, कामाचा ताण अधिक पडला तर येता येता हव्या तेवढ्या पोळ्या, भाजी, उसळ, दही, लोणचे, भात, आमटी जे लागेल, खावेसे वाटेल ते पॉलिथिनच्या पिशव्यातून भरून घ्यावे आणि घरी जाऊन स्वस्थपणे जेवावे, आरामात ताणून द्यावी किंवा त्या खुळ्या खोक्यापुढे बसावे. अशी छान, झक्क आणि आरामदायी सोय ह्या केंद्रानी केली आहे.

ही 'पोळीभाजी' अशा नावाने ओळखली जाणारी दुकाने असली तरी येथे मिळतात खूप खूप पदार्थ त्या पदार्थांची पाटीवरची नावे वाचली तरी भूक खवळून उठते असे अनेक गिऱ्हाईकाचे मत पडले. ह्या पाहणीत केंद्रसचालक, ग्राहक, ह्या बदलत्या सामाजिक परिस्थितीचा गंभीरपणे विचार करणारे इ अनेकाशी बोललो, केंद्रांवर त्रयस्थ म्हणून उभा राहून गिऱ्हाईकाचे, येणाऱ्याजाणाऱ्याचे बोलणेही ऐकले. अशा ह्या अनेकांच्या अनुभवाचे बोल मला मोलाची मदत करणारे ठरले. फक्त त्या केंद्रावर

काम करणाऱ्या व्यक्तींशी, स्त्रियांशी बोललो नाही. ही त्रुटी केव्हा तरी भरून काढीन. ह्या केंद्रांवर काय मिळते ह्यापेक्षा काय मिळत नाही असाच प्रश्न विचारावा लागेल. ह्या केंद्रांची सुरुवात झाली इ. स. १९८० पासून. सौ. कानिटकरांनी तो मान पटकावला. त्यांनी सुरुवातीला अगदी मोजकेच पदार्थ केले. नंतर मागणी वाढू लागली. तशी पदार्थात भर पडू लागली. 'अहो तुम्ही भात का नाही करीत ? केवळ भातासाठी कुकर लावणे अगदी जीवावर येते बघा.' अशी गोड तक्रार अनेकांनी केली. त्यामुळे भातही शिजविला जाऊ लागला. एखाद्या लग्नघरात जसे वातावरण दिसते तसेच वातावरण ह्या केंद्रांच्या स्वयंपाकघरातून दिसते आणि त्याचप्रमाणे चटणी, कोशिंबीर, पंचामृतापासून सारे पदार्थ इथे तयार होतात आणि मिळतात. सणावाराला, सुट्टीच्या दिवशी त्यात मिष्टान्नांची भर पडते. सकाळचे पदार्थ वेगळे आणि संध्याकाळचे वेगळे. फळभाज्या, पालेभाज्या, विविध प्रकारच्या उसळी आणि आमटयाही इथे मिळतात.

आजच्या शहरातल्या नोकरी करणाऱ्या स्त्रियांना भाकरी करता येत नाही किंवा करण्याचा कंटाळा तरी येत असावा, हे ओळखून ह्या केन्द्रांवर भाकऱ्याही मिळतात. अगदी ज्वारी, बाजरीपासून तांदळापर्यंतच्या सर्व प्रकारच्या. ह्या केंद्रसंचालिकांची आडनावे त्यांची जात, त्यांचे 'स्थ'पण दाखवणारी आहेत. म्हणून की काय ज्या वालांना आजच्या आधुनिक स्त्रीने (विशषतः कोकणातील) घराबाहेरच ठेवले आहे त्या वालांची उसळ, डाळीब्या किंवा चां. का. प्रभूंच्या शब्दांत बिरडे (ढेही चालेल) ह्या केंद्रांवर मिळते. त्यामुळे डोंबिवलीकर गृहिणींची चंगळच चंगळ झाली आहे. त्यामुळेच की काय नवीन जोडपी इथेच रहायला येणे पसंत करतात असे वाटते. शमी गृह उद्योगने एक खास तोंडी लावणे ठेवले आहे. (त्यांच्याकडून 'त्रिदलवाल्यांनी' घ्यावयास सुरुवात केली आहे.) त्या गरमागरम पदार्थाचे नाव आहे 'खरडा'. हा पदार्थ अन्यत्र कोठेच विकत मिळत नाही असे त्यांचे म्हणणे आहे. अगदी नखभर जीभेवर ठेवला तरी सारी रसना जागी होते. 'जास्त प्रमाणात खाल्ला तर मूळव्याध हमखास होईल' असे एका चोखट आणि चावट जिभेच्या गिऱ्हाईकाने सांगितले. सारांश काय जुन्या बायकांच्या शब्दात सांगावयाचे झाले तर पानाच्या डाव्या, उजव्या, समोरच्या बाजूला आणि मध्यभागी जे जे लागते ते ते ह्या केन्द्रांवर मिळते.

### दर्जा उत्कृष्ट

ह्या सर्वांचे सांगणे असेही आहे की हे सारे पदार्थ उत्कृष्ट कच्च्या मालापासून चांगल्या तेलातले वा तुपातले बनविलेले असतात आमच्या पदार्थांचा दर्जा, गुणवत्ता आणि चव ही अगदी घरच्या पदार्थांसारखीच आहे. श्री. कानिटकर तर असेही म्हणाले की आमच्याकडे जसे पदार्थ होतात तसे काही जणांच्या घरीही होत नाहीत हे मी अनुभवावरून सांगतो. हे सारे पदार्थ वजनावर विकले जातात आणि पॉलिथिनच्या लहान मोठ्या पिशव्यांतून दिले जातात. हॉटेलमधून मिळणाऱ्या थाळी, राईस प्लेटच्या तुलनेने इथले खाणे हे स्वस्त आहे आणि चविष्टही आहे, असे अनेकांनी आवर्जून सांगितले. ह्या साऱ्या पदार्थांचे दर देण्याची अजिबात आवश्यकता नाही. एका माणसाला दुपारच्या वा रात्रीच्या जेवणासाठी पाच रुपये खर्च येतो. त्या पैशांत त्याचे पोट चांगलेच भरते आणि अगदी घरातीलच जेवण घेतले ह्याचे समाधानही मिळते. कोणत्याही प्रकारची भेसळ नाही किंवा खाण्याचा सोडा वापरून पदार्थ तयार केला जात नाही.

ह्या शाकाहारी केंद्रांवर मिळणारे पदार्थ कमी अधिक प्रमाणात सारखेच आहेत. श्री. विलास नरगुंदकरांच्या मांसाहारी केन्द्राकडे आता वळायला हरकत नाही. नाही तरी हल्ली शाकाहारी माणसे शाकाहाराचा कटाळा आल्यानंतर मांसाहाराकडे वळतातच ना ? श्री. नरगुंदकर म्हणाले 'मी एकटाच 'कॅटरिंग डिप्लोमा' घेतलेला केंद्र संचालक आहे.' गावाच्या मध्यभागी, स्टेशनजवळ असणाऱ्या ह्या केंद्रावर असलेल्या पाटया वाचल्या आणि वाचता वाचता तयार होणाऱ्या पदार्थांचा दरवळ घेतला की अस्सल खवट्या सैरभैर झाला नाही तरच नवल ? मासळीचे, मटणाचे, कोंबडीचे विविध प्रकार ते करतात. त्यांच्याकडे कोल्हापूरशिवाय इतरत्र न मिळणारा 'पांढरा रस्सा' हा मटणाचा एक खास प्रकार मिळतो. त्या साऱ्याच मांसाहारी पदार्थांची नावे देणे शक्य नाही. त्यांनी चायनीज पदार्थ केले पण त्यांना मागणी नाही म्हणून ते बंद केले. आज सर्वत्र 'चायनीज डिशेस'ना मागणी आहे असे ऐकतो मग डोंबिवलीकर त्या लाटेत कसे अडकले नाहीत ? ह्या मांसाहारी पदार्थांशिवाय त्यांच्याकडे इतर केंद्रांप्रमाणेच शाकाहारी पदार्थही आहेत. त्याशिवाय त्यांनी शाकाहारी आणि मांसाहारी जेवणाची मासिक व्यवस्था—डबे-केली आहे. सर्व जातीतील माणसे ह्या मांसाहार देणाऱ्या केंद्रावर खूप आहेत. त्यामुळेच की काय त्यांनी फडके रस्त्यावरही एक शाखा सुरू केली आहे.

ह्या सर्वांचे अनुभव ऐकल्यानंतर आजच्या समाजाचे दर्शनही घडले. ह्या केंद्रावर काम करणाऱ्या स्त्रिया घरगुती अडचणींमुळे



येतात. नवऱ्याची व्यसने, त्याचा ऐदीपणा, मुलाचा उडाणटप्पूपणा इ. कारणामुळे ह्या स्त्रियावरच घर चालविण्याची जबाबदारी पडते. गिऱ्हाईकाचे विविध नमुने हा तर एक स्वतंत्र लेखाचा विषय होईल इतके विविध आहेत. पण ह्या साऱ्याचे म्हणणे असे आहे की ही गिऱ्हाईके क्वचित अपवाद वगळता वागणुकीला, आर्थिक व्यवहाराला चोख आहेत त्याना चागला मान हवा असतो. स्वस्त्यात कोणत्याही दर्जाचा माल त्याना नको असतो. ज्या विभागात कनिष्ट मध्यमवर्ग राहतो, तिथे महिना अखेरी मंदीचे दिवस असतात शाळाना सुटचा लागल्या की मदी सुरू होते किंवा मागणीत बदल होतो. गावगुडाचा त्रास थोडाफार होतो त्याचप्रमाणे दारू पिऊन येणाऱ्याचीही बडबड ऐकावी लागते शभर रुपयाची नोट देऊन गडबडीचा फायदा घेऊन बनविण्याचा प्रयत्न करणारेही घरंदाईक भुरटे बदमाशही भेटतात. श्री. काळघाना हा अनुभव आला तो श्री. आपटघाना सागितला म्हणून ते जागरूक राहिले आणि शभर रुपये वाचवू शकले. ह्या साऱ्या मध्यमवर्गीय मराठी माणसानी वेळ प्रसगी कर्ज काढून, दागिने गहाण टाकून पैसा उभा केला आणि व्यवसाय सुरू केला. त्या व्यवसायात त्याना यश आले. प्रथम सुरुवात करणारे श्री. बंडोपत कानिटकर आता इतराचे मार्गदर्शक झाले आहेत. नवनवीन केंद्र सुरू होत आहेत त्यामुळे स्पर्धा वाढू लागली आहे. या स्पर्धेला तोड देण्यासाठी दर्जा चागला ठेवावाच लागतो आणि भाववाढही करता येत नाही. त्यातून वाट काढण्यासाठी काही जणानी इतर मार्ग शोधले आहेत. मसाले, हळद, लोणची, पापड घरी तयार करून विकणे. चागली चिंच, माळेचे कादे विकणे इ पण तो आपला आजचा विषय नाही म्हणून त्याचा फक्त उल्लेख करतो.

ही पाहणी करताना काही मजेदार उद्गार ऐकू आले. एका केंद्रासमोर उभा राहिलेला तरुण तो गर्दी पाहून आणि ती *पदार्थांची यादी वाचून म्हणाला*, '××× ह्या बायका भलत्याच आळशी झाल्या आहेत' ह्या केंद्रावरील भातापासून सारे 'पदार्थ पाहून एकजण केंद्रावरील माणसाला म्हणाला 'तुम्ही एवढे सगळे पदार्थ केलेत. आता एकच करा. हे सारे कालवून घास भरविण्यासाठी एखादे काऊटर, टेबल टाका म्हणजे कसे छान होईल.' मी हा किस्सा प्रत्येकाला सागितला. त्यानी मस्त हसून दाद दिली. काही जण म्हणाले 'आम्ही ह्या बायकाना आळशी बनविले नाही. त्याच आपणहून येतात.' श्री. आपटे मात्र म्हणाले की 'ह्या बायका आळशी बनतील तर आम्हाला हवेच आहे.' ही केंद्रे इतक्या झपाट्याने का वाढत आहेत ? डोंबिवलीकर इतका उदार आश्रय का देतात ? 'नवऱ्याला पत्नीचा पगार हवा पण तिला मदत करायला नको' 'आयते अन्न हवे मग पैसे खर्च झाले तरी चालतील.' 'आईच्या हातची चव हे सारे विसरले.' 'माणसे चवीने खाण्याऐवजी पोट भरण्यासाठी खातात ?' अशी अनेक उत्तरे अनेकाकडून ऐकायला मिळाली. 'स्वयपाक घरात डाबली गेलेली स्त्री ह्या केंद्रामुळे थोडीशी मुक्त होत आहे.' स्त्रीमुक्तीचा पुरस्कार करणारा एकजण म्हणाला 'बदलत्या काळातील समस्यापैकी एक परंपरागत समस्या सोडविण्याची ही सोय आहे. त्यामुळे इतर समस्या सोडविण्यासाठी स्त्रिया मोकळ्या होत आहेत' असेही त्याला वाटते. 'विविध उपकरणामुळे, साधनामुळे आपण परावलबी बनलो आहोत. शारीरिक कष्टाची सवय कमी झाली आहे. स्त्रियाच्या अनेक शारीरिक समस्या (पुरुषाच्याही) ह्या परावलबनामुळे निर्माण झाल्या आहेत. स्वयपाक करण्याचेही कष्ट ती घेणार नसेल तर तिला त्याचे शारीरिक, मानसिक आणि भावनिक मोल द्यावे लागेल.' असेही काही जणाना वाटते. 'आई, बहीण, पत्नी ज्या जिव्हाळयाने, प्रेमाने स्वयपाक करते त्याची रूची त्या पदार्थांना येते. त्याला ही माणसे मुकणार. ती आता रुक्ष, व्यवहारी बनणार' असेही एकाने सागितले. शेवटी घर म्हणजे काय ? आपण घरातील साऱ्या खोल्याना 'घर' म्हणत नाही. 'स्वयपाक' 'घर' असते. इंग्रजीत ते असते 'किचन' त्यामुळे असा प्रश्न पडतो की त्यामुळे नेमके काय साधते ? पुढे काय होणार ? आज तरी हे प्रश्न अनुत्तरित आहेत.

— चंद्रशेखर राजे


**राजहंस प्रकाशन**

**कुंपण आणि आकाश**

मंगला गोडबोले

वीस रुपये

बाईचं सुख ? तिला दुःख आहेच कुठे ?
हा युक्तिवाद एकीकडे आणि
आपल्या सांस्कृतिक, सामाजिक संदर्भात
बाईला सुख मिळणं शक्य नाही
ही भूमिका दुसरीकडे.
खरं तर या दोन टोकांमध्येच
स्त्रीजीवनाच्या अमर्याद शक्यता,
सामर्थ्य आणि मर्यादा असण्याची
शक्यता आहे. त्या शोधण्याचा
एक प्रयत्न !

अमेरिकेतून

# १९८५ : शेतकऱ्यांची गंभीर परिस्थिती

वेन्सबरो ह्या जॉर्जिया राज्यातल्या छोट्या गावातल्या न्यायालयाच्या बाहेर एके दिवशी सकाळी ११ वाजता शेतजमिनीचा लिलाव चालला होता. इतक्यात तिथला दूरध्वनी खणाणला– ' श्री. हिल याच्या जमिनीचा लिलाव तावडतोब थांबवा.' लिलाव करणाऱ्याना वाटले की श्री. हिल या शेतकऱ्याने आपली जमीन वाचवण्याकरता कुठून तरी एकदम पैसे उभे केले– हो त्यानी खरोखरच शेवटच्या क्षणी पैसे उभे केले– पण किती अघोरी मार्गाने ! श्री. हिल यानी ११ च्या आधी काही वेळ आपल्या पत्नीला स्वतःचे आयुर्विम्याचे कागदपत्र दिले. नतर ते आपल्या शय्यागृहात गेले आणि आपल्या दोन गुडघ्यामध्ये बदूक धरून ती स्वत.वर उडवली. स्वत.ची प्यारी पिढीजाद जमीन वाचवण्याकरता त्यांनी जीवदान देऊन पैसे उभे केले. सौ. हिल यानी आपल्या मुलाला ताबडतोब लिलावाच्या ठिकाणी दूरध्वनी करायला सांगितले. कारण आयुर्विम्याच्या पैशातून त्यानी आपल्या जमिनीवरच्या कर्जाची परतफेड करण्याचे ठरवले. अशा आणि इतर भयानक बातम्या ( उदा. एका शेतकऱ्याने त्याच्या गावातल्या बँकेच्या व्यवस्थापकाचा खून केला ) कानावर अधून मधून येतात.

१९८५ मध्ये अमेरिकन शेतीजीवन आर्थिकदृष्ट्या काहीसे विस्कळीत झाले आहे. जगातल्या या लोकसख्या, विस्तार आणि समृद्धी या तीनही दृष्टींनी मोठ्या असलेल्या देशात असे का व्हावे ? अमेरिकेतल्या एकूण समृद्धीला जरी स्थिरता असली आणि खरे म्हणजे समृद्धीत दरवर्षी वाढ होत असली तरी या समृद्धीच्या वेगवेगळ्या घटकामध्ये एकप्रकारची अस्थिरता असते. याची कारणे म्हणजे– गतिमान जीवन, तीव्र (कधी कधी जीवघेणी ) स्पर्धा, लोकांच्या वारंवार बदलणाऱ्या गरजा, चवी, मागण्या, स्थानिक आणि आतरराष्ट्रीय राजकारणातील घटना, जगातल्या इतर देशात होणाऱ्या सुधारणा आणि स्वावलबन आणि अर्थव्यवस्थेतील आणि तत्रज्ञानातील बदल.

या सर्वांचे पडसाद अमेरिकन शेतीजीवनावरसुद्धा उमटतात. यामुळेच अमेरिकन शेती दिवसेदिवस तत्रज्ञानावर आणि अर्थकारणावर जास्त जास्त अवलबून राहू लागली आहे. सद्य: परिस्थितीत शेती काम म्हणजे शेतीधदा ( Agriculture VS. Agribusiness ) बनला आहे नवीन तत्रामुळे, शेताच्या अफाट विस्तारामुळे आणि स्पर्धेमुळे शेतकऱ्याना मोठमोठी अवजारे घ्यावी लागतात. काही जण गणकयत्रसुद्धा वापरतात त्याकरता मोठमोठी कर्जे काढावी लागतात. शेतीमधले यश हे शेत्रीतंत्राचे ज्ञान आणि अनुभव या इतकेच शेती हा धदा म्हणून कसा चालवायचा या कौशल्यावर अवलबून राहू लागले आहे.

१९८५ हे साल १९२९ च्या मदीनतर अमेरिकन शेतीजीवनात सर्वात वाईट ठरले आहे. उदाहरणार्थ टेक्सस राज्यातल्या सरकारी कर्ज घेतलेल्या १६००० शेतकऱ्यापैकी सुमारे एक तृतियाश शेतकरी कर्जाचे हप्ते वेळेवर भरू शकले नाहीत. सबध देशात सुमारे ५०००० शेतीउद्योग बद पडण्याची वेळ आली आहे किंवा प्रत्यक्षात बद पडले आहेत. कित्येक अब्ज डॉलर्सची कर्जे तुबली आहेत. शेतीउद्योगावर अवलबून असलेली काही छोटी गावे उजाड होऊ लागली आहेत. दिवाळ निघालेल्या शेतीउद्योगावरचे लोक मोठ्या शहराकडे नोकरीकरता धाव घेत आहेत.

जागतिक अन्नधान्य परिस्थितीच्या दृष्टीने सुद्धा १९८५ हे विचित्र वर्ष म्हणावे लागेल. आफ्रिकेतल्या काही देशात दुष्काळ पण अखिल जगातला धान्यसाठा १९ कोटी टन म्हणजे उच्चाक स्थापित करणारा. रशियाला धान्य विकण्यात आता इतर राष्ट्रे अमेरिकेबरोबर स्पर्धा करतात. पूर्वी धान्य आयात करणारे काही देश आता काही धान्ये निर्यात करू लागले आहेत (उदा. ब्रिटन) दक्षिण आशियातील देश ( उदा भारत ) युरोपीय देश, ऑस्ट्रेलिया, कॅनडा इ स्वत पुरते धान्य पिकवतात किंवा धान्य निर्यात करतात धान्यनिर्यातीमुळे अमेरिकेला देशाच्या एकूण परदेशी चलनाच्या आणि शेतीउद्योगाच्या एकूण उत्पन्नाच्या एक पचमांश भाग मिळतो. धान्यनिर्यातीतली वाढती स्पर्धा आणि आयात करणाऱ्याची कमी होणारी मागणी या सयोगामुळे अमेरिकन शेतीउद्योगाच्या या उत्पन्नात घट होऊ लागली आहे. शेतकऱ्यांची रोख कमाई त्यामुळे कमी झाली आहे. शिवाय १९८५ तले व्याजाचे वाढते दर यामुळे कर्जफेड वेळेवर परत करणे बऱ्याच शेतकऱ्याना शक्य झाले नाही आणि त्यांच्या जमिनी लिलावात निघत आहेत. कामगार संघटनाप्रमाणे शेतकरी सघटना मोठ्या प्रमाणावर नाही. त्यामुळे त्याच्या अशा प्रश्नाची दाद लागत नाही. काही शेतकरी तक्रार करतात की काही राष्ट्रांनी ( उदा. ब्राझिल, मेक्सिको इ.) वेळेवर कर्जफेड केली नाही किंवा मोठमोठे उद्योग डबघाईला आले तर आतरराष्ट्रीय आर्थिक संस्था आणि अमेरिकन सरकार त्याना वाचवण्यासाठी काही योजना आखतात, पण बिचारा वैयक्तिक शेतकरी मात्र कर्जफेड वेळेवर झाली नाही तर सपूर्ण बुडून जातो.

शेतीजीवनातील या गभीर प्रश्नामुळे इथल्या वर्तमानपत्रात मासिकात, दूरदर्शनवर मधूनमधून याबाबत माहिती पुरवण्यात येत आहे. उदाहरणार्थ इथल्या CBS या एका महत्त्वाच्या दूरदर्शन केंद्राने एका सपूर्ण आठवड्यात त्याच्या सध्याकाळच्या राष्ट्रीय बातम्या न्यूयॉर्कऐवजी देशातल्या वेगवेगळ्या शेतीप्रधान गावातून शेतकऱ्याच्या घरातून आणि त्याच्या शेतावरून क्षेपित केल्या आणि त्याच्या प्रश्नाची माहिती करून दिली. जनतेत त्यामुळे शेतकऱ्याबद्दल जास्त सहानुभूती निर्माण झाली आहे नुकत्याच घेतलेल्या जनमानसाच्या एका आढाव्यात ५० टक्के लोकानी शेतकऱ्याना जास्त आर्थिक मदत द्यावी असे मत प्रदर्शित केले अमेरिकन शेतकरी म्हणजे अमेरिकन व्यक्तिमत्त्वातल्या काही उत्तम पैलूचे आगर समजला जातो. उदात्त, उमदा, कष्ट करणारा, कुटुबवत्सल, प्रामाणिक, सदाचारी, नीतीमत्ता सभाळणारा अशी त्याची प्रतिमा अमेरिकनाच्या मनात आहे जेफरसननेसुद्धा एके ठिकाणी लिहिले आहे की, जे भूमीशी सलग्न होऊन कष्ट करतात आणि अन्नधान्य पिकवतात ते

ईश्वराच्या जास्त जवळ असतात. या घेतलेल्या आढाव्यामुळे एक गोष्ट सिद्ध झाली आहे की बहुसंख्य अमेरिकन लोक शहरात रहात असले तरी ग्रामीण भागात रहाणाऱ्या आणि लोकसंख्येच्या फक्त अडीच टक्के असणाऱ्या शेतकऱ्यांच्या समस्यांची त्यांना माहिती आणि जाणीव आहे आणि त्यासंबंधी आपुलकी आहे.

वेस्टफिल्ड, न्यू जर्सी.

मार्च २८, १९८६ डॉ. विजय वि.
आणि जयश्री वि. जोशी

## वेशीबाहेरचे एक पान

सांजचं डबरं भरून आलं तसं पांडानं पाय गळ्यात घेतलं. दिवा लागण्याचा वकूत झाला होता. खोपटात दिवा लावाव असं त्याला वाटलं पण जाग्यावरनं तो हालला नाही.

रोज सांजच्याला मुरगाळून यायचं. घोटभर टाकल्याबिगर त्याचं बस्तान बसायचं नाही. पन्नास मिली तरी नरड्याखाली उतराय पायजे.

आता त्यो कुडाला टेकून बसला. पायाच्या गुणक्या लांब केल्या. वर आढ्याकडं बघितलं अंधार होता. त्याला अजून अंधाराची सवय झाली नव्हती. चाकरी सुटून महिना झालं होतं. पोटाला चिमटा लागला होता आणि नरड्याखाली उतरायला कायच मिळत नव्हतं. बाजाराच्या दिशी बायकूनं हातात काय तरी टिकविली तर पन्नास मिली प्यायचा. त्यावर पुढल्या बाजारपर्यंत थांबायचं.

दिस जात नव्हतं. रात टळत नव्हती. गावात फिरायचा घास नव्हता. मोकाशानं तसा दम दिला होता. 'पांड्या, गावात दिसायचं नाही, दिसलास तर हिकडनं गोळी घालीन तिकडनं बाहीर पडल.' मोकाश्याचा शबूद त्याला बंदुकीच्या गोळीपेक्षा जास्त लागून गेला होता.

त्याला वाटायचं, आता तंद्रीतच जगलो तर जगलो, पर त्यासाठी पैका नाय. पैक्यासाठी त्यानं काय वाटेल ते योजलं–पेरलं पण कायच उगावलं नाही.

त्याला सारं आठवायचं. गबरू मालक मोकाशी. रोज दोन शीसं दारूच. मालकाच रतिप. रोज दोन शीसं दारू आणायला जायचं. दारूवाल्यानं एक ग्लास अगोदर पांडाला भरून द्यायचा. मग शिसं भरून द्यायचा. गेली दहा वरसं हे चाललं होतं. पोटासकट मोकाश्याची चाकरी होती. खायला, प्यायला उणं नव्हतं. मोकाशी कवा एका बाटलीत तर कवा दीड बाटलीत लोळायचा. उरल्याली सगळी ढोसून पांडा मोकाश्याच्या गोठ्यातच पासलायचा. आठ–पंधरा दिसाला मोकाशाला 'पाखरू' लागायचं. त्याची जुळणीबी पांडाकडच होती. असं पांडाचं झकास चाललं होतं. पांडा महार गडी असूनबी त्याचं नाव काढायची कुणाची बिशाद नव्हती.

त्या दिसी मात्र त्यानं शेण खाल्लं गोठ्यातच मालकाला आणल्यालं 'पाखरू' त्यानंच वापरलं. मोकाश्याला हे समजलं– आणि पांडाच राज्य गेलं. वेशीबाहेरचं आपलं वडिलार्जित खोपाट त्यानं गाठलं.

उपारमार. तहानेला दारू पिणारा पांडू आता पाण्याला महाग झाला. आठ दिसात त्यो झडला. अंग सणकून यायचं, संधिवात झाल्यासारखं झालं. ढोसल्याशिवाय त्याला जमना. बायकोचा कोंड्याचा मांडा त्याला रूचना. बायकू लोकाच्या बांधाला आणि ह्यो खोपटाच्या कुडाला. साराच इस्कोट झाला. गेली दहा वरसं बायकूकडं बघितलं नाही. रान चांगलं पण पेरणी केली नाही. रान तसच वाझुंट राहिलं. मुंढं–मुंढं,

सांधवात वाढाय लागली. सांजला तो तळमळायचा. त्याचं पाय गुत्याकडं वळायचं. उगचच खिसा चाचपायचा. रोज कोण पाजणार? उदार किती देणार? तरी पाय वळायचं. कोणतरी वळखीचं दिसतील. त्याच्याबरोबर जाईन. कोण तरी 'घे' म्हणतील, 'पी' म्हणतील. पण तसंही फार वेळा घडलं नाही.

तो त्या दिवशी दारूचा गुत्ता बंद होईपर्यंत थांबला पण घोटभरसुद्धा कुणाकडनं मिळालं नाही. त्याला झपाटल्यासारखं झालं. मनात आलं दारूवाल्याचा खून करावा, त्याचा गुत्ता पेटवावा, त्यो दारूचा फुगा घेऊन पळून जावं, पण त्याच्या हातनं कायच झालं नाही. तो लोढणा बांधल्यासारखा मोकाश्याच्या गोठ्याकडं वळला.

गोठ्याजवळ रातीला मोकाशी पाखराची वाट पाहत होता. पांडा उकरंड्याजवळ दडून बसला. डोस्क्यात काय तरी घुमाय लागलं. मोकाश्याचा नवा गडी खाली मान घालून उभा राहिला. नरडं दाबल्याल्या आवाजात म्हणाला, 'मालक, आज कोणच मिळत नाही.' तसा पांडा भूतासारखं पुढं आला. मुजरा मारत म्हणाला 'मालक, मी आणतो पाखरू पर... एक ग्लासभर आगूदर द्या.' मोकाश्यानं गोठ्याकडं बोट दाखवलं. पांडा, गोठ्यात घुसला. त्यानं बाटलीच तोंडाला लावली .. बाटली संपली, मगच तोंडातनं बाटलीचं तोंड सोडलं. अंगभर गोड कळा आल्या तसा तो बाहेर आला. मोकाशी पेटला होता. खड्या आवाजात म्हणाला, 'जा, कुत्र्याची औलाद, आण जा, कोण बी आण जा... आज कोण बी चालल मला...'

पांडा तंद्रीतच आपल्या घरमालकिणीकडं चालला होता. याशिवाय दुसरं पाखरू त्याला दिसत नव्हतं.

–बापू जाधव
किर्लोस्करवाडी

मराठीतील एक सच्चे आत्मचरित्र

हंसा वाडकर

सांगत्ये ऐका

चौथी आवृत्ती

मूल्य : १४ रुपये

राजहंस प्रकाशन

१०२५ सदाशिव, पुणे ३०

# आपण असे जगतो

वि. ग. कानिटकर

## □ प्रस्थापिताचा द्वेष का होतो ?

एकोणिसाव्या शतकात युरोपात उदारमतवादाचा फैलाव झाला, त्याची परिणती मुक्त स्पर्धेत झाली. यामुळे राष्ट्रे समृद्ध झाली. यंत्रयुगात मानवाने झपाट्याने प्रवेश केला व नेपोलियनपुढे जो आदर्श होता, की 'गुणांना भरपूर वाव मिळाला पाहिजे,' तो प्रत्यक्षात उतरू शकला. या शतकाच्या पहिल्या दोन दशकातच, भारतावर इंग्रजांची सत्ता प्रस्थापित झाली व इंग्रजी सत्तेबरोबर युरोपातील उदारमतवाद्यांच्या झुळूका भारतात प्रवेश करू लागल्या. १८५७ च्या बंडानंतर, इंग्रजी सत्ता स्थिर झाल्यानंतरच्या काळात, म्हणजे १८७० ते १९२० या पन्नास वर्षात भारत परतंत्र असूनही जीवनाच्या विविध क्षेत्रात, अनेक गुणी माणसांनी आपले कर्तृत्व सिद्ध केले. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी इंग्रजांशी शत्रुत्व मांडून बसलेल्या क्रांतिकारक देशभक्तांचा वर्ग वगळता, इतर सर्व क्षेत्रात गुणी माणसांना वाव मिळून आपापल्या क्षेत्रात त्यांनी यश व कीर्ती संपादन केली. १९४७ साली भारताला राजकीय स्वातंत्र्यही इंग्रजांनी दिले, तेव्हा जो स्पर्धामय जीवनाची सामाजिक व आर्थिक घडी इंग्रजांनी दिडशे वर्षे रूढ केली होती, त्यात कसलाही क्रांतिकारक बदल होऊ शकला नाही. कारण स्वातंत्र्यप्राप्तीसाठी देशाचे समग्र जीवन उध्वस्त करणारा सर्वंकश युद्धानुभव, आपल्या वाट्याला आलाच नाही. फाळणी झाल्याने ज्या कत्तली झाल्या, त्या हिंदू–मुसलमान दंग्याची आणि तोपर्यंत अंगवळणी पडलेल्या घाऊक संहाराची फक्त एक मोठी आवृत्ती मानली गेली. ज्या इंग्रजांनी या देशाची दिडशे वर्षे आर्थिक पिळवणूक केली, त्याचा साचत आलेला संताप फाळणीमुळे उद्‌भवलेल्या रूधिराभिषेकात पार धुवून गेला.

यामुळे मुक्त स्पर्धेच्या युगात, ज्या माणसांना परमेश्वराने उपजतच अमाप इच्छाशक्तीचे वरदान दिलेले आहे. याच्या जोडीला त्याच्यापाशी धूर्त शहाणपणा देखिल आहे. त्यांना धनवान होण्याचा मार्ग स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही मुक्तच राहिला. ज्यांना जन्मतःच असे गुण प्राप्त झाले नाहीत, अथवा ज्यांच्यापाशी अभ्यासानेही या गुणाची उपासना करावी असा शहाणपणा नाही, असा समाजाचा मोठा वर्ग अर्थातच निर्धनावस्थेचाच अनुभव घेत राहिला आहे.

'ठेविले अनंते तैसेचि रहावे' या संतोक्तीचा पगडा असल्याने म्हणा, किंवा 'सुख पहाता जवापडे । दुःख पर्वताएवढे ॥' हा न्यायच असल्याची खात्री पटल्याने म्हणा, निर्धनांनी आपली दारिद्र्यावस्था कसलाही प्रत्यक्ष द्वेष, कृतीद्वारे व्यक्त न करता पत्करली. जे सधन आहेत त्यांना निर्धनांचा मोठ्या प्रमाणावर छळ करण्याची गरजच यामुळे निर्माण होत नाही आणि जेव्हा समाजात दृश्य छळ प्रत्ययाला येत नाही, तेव्हा अशा वर्गाला कोणी मोठा त्राताही लाभत नाही. पूर्वी युरोपात शास्त्रीय ज्ञानाशी तेथील चर्चने उभा दावा मांडला. शास्त्रज्ञ हे त्यावेळी उदारमतवादी आणि पुरोगामी होते. आता शास्त्रज्ञांचा कोणी छळ करीत नाही. त्यांना मानसन्मान दिले जातात व सर्वत्र त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त होत असते. परिणाम असा की आता शास्त्रज्ञ हेमुद्धा 'प्रस्थापित' झालेले आहेत ! अणुबाँबविरुद्ध काही जणांनी निदर्शने केली तर त्यांना एक दिवस पकडतात— सन्मानाने वागवून सरकार सोडून देते. पुनः सर्वत्र सामसुम होते. त्यांचा छळ कोणीच करत नाही.

युरोपात कष्ट करून ज्यू जमात जोपर्यंत कशी तरी जगत होती, तोपर्यंत त्यांच्याविषयी विशेष करूणा ख्रिश्चनांच्या मनात नव्हती. सहनीय असा फक्त द्वेष होता. परंतु दुसऱ्या महायुद्धात त्या जमातीचा अनन्वित छळ झाला, आणि त्यांना एकदम अमाप सहानुभूती लाभून इस्त्रायल अस्तित्वात आले ! तात्पर्य मोठ्या प्रमाणावर छळ हा पुष्कळदा प्रगतीला कारण होतो. पण भारतात निर्धनांचा असा मोठ्या प्रमाणावर दिसावा असा छळदेखिल कोणी करत नाही !

निर्धन हा आर्थिकदृष्ट्या गरीब रहातो, कारण तो बराचसा शांत व आळशी वृत्तीचा असतो आणि काहीसा भोळसट मूर्खही असतो. त्याच्याजवळ आंतरिक इच्छाशक्ती अशी नसतेच. त्याला आपली दुःखेदेखील नीट मांडता येत नाहीत. कारण त्यासाठी लागणारा मारक मर्दपणाही त्याच्यापाशी नसतो. निर्धन वर्गातले बहुसंख्य असेच असतात.

आता अशा माणसाने करावे तरी काय ? ज्यांची अर्थप्राप्ती निश्चित आहे, अशी जी काही माणसे तो आसपास पहातो, त्या माणसांना आसपासच्या या दुर्दैवी जीवाविषयी सहानुभूती असू शकत नाही. त्यांच्यादृष्टीने सुख हे मानण्यावर असते व जो दरिद्री आहे, तो देखिल मानसिकदृष्ट्या सुखी असू शकतो, याबद्दल त्याची खात्री असते ! जे खूपच धनवान असतात, त्यांना हा प्रश्न कधी भेडसावीतच नाही की जगातल्या संपत्तीपैकी एवढा मोठा वाटा आपल्याकडेच का ? या आधाराच्या समर्थनार्थ त्याची कारणमीमांसाही तयार असते— की स्पर्धेत जो टिकेल तो धनवान असणारच.

हा कोंडमारा अनुभवणाऱ्या निर्धनाकडे एक बिलंदर माणूस येतो. तो स्वतः त्याच्यातला एक नसतो. पण तो म्हणतो की मी तुमच्यासाठी लढणार आहे ! हा राजकारणी नेता असतो. तो या खेळात स्वतःचे भरपूर हित करून एक दिवस प्रस्थापितात सामील होतो. त्यांना सर्वत्र आबादीआबाद दिसू लागते. निर्धनाचा थवा—निर्धनच रहातो.

कसलाही अंगभूत गुण वा विद्या आत्मसात करणारी शक्ती नसलेल्याने, जन्माला येणे हा या गुणात्मक स्पर्धेच्या युगात एक गुन्हाच आहे. परंतु अशा बहुसंख्य माणसांनाही जगण्याचा हक्क आणि आणि किमान आर्थिक सुरक्षितता कशी देता येईल, हा प्रश्न जोपर्यंत सुटत नाही, तोपर्यंत प्रस्थापितांचा द्वेष करणे एवढाच विरंगुळा त्यांना शक्य आहे.

## □ इतिहास वाचनातून समाधान काय ?

अध्यात्माची वा तत्वज्ञाची पुस्तके वाचुन माणसाला जे आत्मिक समाधान लाभते, याबद्दल सहस्त्र वर्षे लिहिले–बोलले गेलेले आहे. परमेश्वराच्या अनुग्रहाच्या दिशेने मनुष्य वाटचाल करू लागला की, आतापर्यंत

जे राव रंक होऊन गेले, त्या सर्वांविषयी एक प्रकारची तुच्छता भक्त अनुभवतो. तुकाराम सांगतात.

वर्णावी ते थोरी, एका विठ्ठलाची ।
कीर्ति मानवाची सांगो नये ।
उदंडची झाले, जन्मोनिया मेले ।
होऊनिया गेले रावरंक ।।

पण इतिहासाच्या वाचनाने देखिल जे समाधान अनेकांना मिळते त्याचे स्वरूप काय? इतिहासात तर महापुरुषाची कीर्ती व इतरांची अपकीर्ती याशिवाय काहीच सांगितलेले नसते. महापुरुषाच्या व दुष्टाच्या लढायाच्या अनुषंगाने, सामान्य माणसाला जी दुःखे नशिबी आली, जे अत्याचार सहन करावे लागले, जो सर्वनाश पहावा लागला, त्याची वर्णने हे इतिहासाचे आणखी एक उपांग असते आणि तरी इतिहास वाचनाची गोडी आपण अनुभवतो. एक प्रकारचे समाधानही या वाचनातून मिळवतो– हे समाधान कसले असते ?

अगदी पहिल्याप्रथम जेव्हा लहानपणी आपला एखादा दात दुखू लागतो, तेव्हा त्या दुःखाने आपण अर्धमेले होतो. पुढे मोठेपणी जेव्हा एखादा दात दुखू लागतो तेव्हा आपण सावध होतो–उपचाराकडे आधीच वळतो आणि त्याच्याबरोबर आपण हे देखिल धरून चालतो, की हे दुःख तात्पुरते आहे. एक, औषधोपचाराने दात दुखायचा थांबेल किंवा नाहीच दुखायचा थांबला, तर दात काढून टाकू ! हे काही असे दुःख नाही, की ज्याने आपण अर्धमेले व्हावे कारण लहानपणचा अनुभव आपल्याला यावेळी कामी येतो आणि आपण धीर सोडून रडत वगैरे नाही. अशाच तऱ्हेचा काहीसा दिलासा इतिहास वाचून माणसाला मिळत असावा. प्राप्त परिस्थितीत देखिल आपण सतत नाराज असतो. महागाई, स्त्रियांवरील अत्याचार, गुंडाची भीती, भ्रष्टाचार अशा अनेक गोष्टी आपल्याला भेडसावतात व वाटते छेः छेः असे पूर्वी कधीच नव्हते. हा दृष्टिकोन एवढा स्वीकारला की निराश आणि उदास व्हायला होते.

पण प्रत्यक्षात परिस्थिती इतकी हतबल करणारी नाही, हे पूर्वी काय काय घडलेले आहे ते वाचले की लक्षात येते सोमनाथवरील मुसलमानाच्या हल्ल्याची वर्णने, अफझुलखान, औरंगजेबाने महाराष्ट्रात उडवलेला थरकाप, सत्तावनच्या क्रांतीयुद्धात सामान्य माणसावर आलेल्या आपत्ती हे सगळे वाचले की लक्षात येते की सोळाव्या शतकात, सतराव्या शतकात, अठराव्या शतकात, एकोणिसाव्या शतकात जी माणसे हयात होती, त्यांनी जे भोगले आहे, त्यामानाने आपण किती तरी सुखात आहोत ! मरणाजवळ इचाडंचाने ढकलणारी, दुष्काळातील भूक, जुलमी सैतानाचे क्रौर्य, अशा किती तरी आपत्तीपासून आपण मुक्त आहोत.

आता भारतात लोकशाही आहे. आपणच राज्यकर्ते निवडून देतो. निवडून दिलेल्या लोकांविषयी देखिल आपण समाधानी नसतोच. त्यांचे अनेक दुर्गुण, व्यसने, भ्रष्टाचार, सत्तालोभ यांच्या हकिगती मनावर येत रहातात व उद्विग्नता येते. परंतु आपण त्यांना क्रूर आणि जुलमी राजाच्या पंक्तीला बसवत नाही. अडाणी, देशहित न समजणारे, स्वार्थलोलुप अशी त्यांची प्रतिमा आपण आता गृहीत धरून चालतो.

पण शेवटी परिस्थितीशी सर्वांना जमवून घ्यावेच लागणार आहे. निसर्गाकडे दृष्टिक्षेप केला तर दिसते की बदलत्या निसर्गस्थितीशी ज्यांना जमवून घेता आले नाही, ते प्राणी पृथ्वीतलावरून नष्टच झाले. शिक्षणाचा प्रसार, उद्योगधंद्यांची वाढ, त्या अनुषंगाने देशात येणारी सुबत्ता यामुळे सर्वांचेच जीवनमान कालांतराने उंचावले गेल्याशिवाय रहाणार नाही. मतदानातील अज्ञान आणि आतापर्यंत ज्या तऱ्हेच्या माणसांना मते दिली, त्यांनाच मते मिळण्याची परंपरा केव्हा ना केव्हा खंडित झाल्याशिवाय रहाणार नाही. जातीचा अभिमान आणि आपला माणूस ही पारंपारिक भावना अजून तरी सर्वसामान्य माणसाच्या बुद्धिवादी निवडीवर मात करीत आहे असे दिसते. बहुसंख्यांकांना सामाजिक व राजकीय प्रश्नांकडे, बुद्धिवादी दृष्टिकोनापेक्षा, भावनात्मक पारंपारिक ओढा असेल तसे पहाणे सुखकारक वाटते. परंतु जेव्हा याचा परिणाम हा, समाजाची स्थिती अधिक अधिक खालावण्यात होत आहे, याची प्रचिती येईल–आणि हे केव्हा ना केव्हा भविष्यात घडणारच–तेव्हा बहुसंख्यांकांना बुद्धिवादी दृष्टिकोन पत्करून, रोखठोक राज्यकर्ते निवडण्याचे भान झाल्यावाचून राहणार नाही. हे कधी घडेल ? सांगता येणार नाही. घडल्याशिवाय रहाणार नाही हे निश्चित. कारण आजचे राजकारण हा उद्याचा इतिहास असतो आणि इतिहास वाचनातून माणसाला काही समाधान मिळत रहाणारच आहे. □

---

अहो, येता जाता

---

# अंडर ग्राउंड प्रवासात

---

फिरोझ रानडे

लंडनला येऊन आता काही तरी तीन-साडेतीन महिने होत आले होते. रहाण्याची चांगली व्यवस्था झाली होती, शिक्षणाचंही चांगलं जमलं होतं. थोडक्यात म्हणजे माझे लंडनमध्ये चांगले बस्तान बसले होते.

मी लंडनमधल्या उच्चभ्रूंच्या वस्तीत म्हणजे उत्तर–लंडनमध्ये रहात होतो. माझं शिक्षण केन्द्र मध्य–लंडनमध्ये होतं. दररोज सकाळी साधारण साताच्या सुमाराला मी निघून भुयारी आगगाडीने म्हणजे वीजगाडीने मध्य लंडनमध्ये येत असे व त्याच पद्धतीने संध्याकाळी परत जात असे

ह्या भुयारी गाड्यांना वेगवेगळ्या देशात वेगवेगळ्या नावांनी ओळखतात. लंडनमध्ये ही गाडी जमिनीखालून जाते तर तिला चक्क 'अंडरग्राउंड, म्हणतात. पण बाकी युरोपमध्ये अगदी रशिया धरून, 'मेट्रो' म्हणतात. जो पर्यंत मी पॅरिसची 'मेट्रो' पाहिली नव्हती तोपर्यंत लंडनच्या अंडरग्राउंड बद्दल फार कौतुक वाटायचं पण पॅरिसमधली भुयारी पाहिल्यावर लंडनची गाडी काही दशकं तरी मागास आहे हे लक्षात आले.

सकाळी मी जायचो त्यावेळी गाडीला फार गर्दी नसायची. पण गर्दी असो वा नसो साहेब लोक धक्काबुक्की करून कधी गाडीत चढत नाहीत हे माझ्या पहाण्यात आले होते.

बहुतेक लोकांच्या हातात ताजे वर्तमान-

पत्र असे. बसायला जागा मिळाली की बहुतेक जण ते आपल्या तोंडासमोर धरत व वाचत असल्यासारखे दाखवत ह्याचे कारण म्हणजे कोणाकडे टक लावून पहाणे हे सभ्यतेला धरून नाही असे समजतात, म्हणजे असभ्य समजतात. आणि लंडनच्या गाडीतून टक लावून पहाण्यासारख्या इतक्या गोष्टी असत की आवरू–आवरू म्हटल तरी मनाला किती आवरणार ?

तेव्हा वर्तमानपत्राची ढाल करावी व थोडं पहाव, थोडं वाचावं असं धोरण सगळे पाळत व पेपर वाचत असल्यासारखे दाखवत.

भुयारी गाड्यांची विश्रामधामं अगदी स्वच्छ व निटनेटकी असत. फार थंडी असते म्हणून डबे वातानुकूल केलेले असत. एवढेच नव्हे तर काही डबे विडया पिणाऱ्याकरता असत तर काहीत धूम्रपानाला अगदी बंदी असे. तसा उल्लेख प्रत्येक डब्याच्या बाहेर स्पष्टपणे केलेला असे.

पूर्वी म्हणे बायका–मुली उभ्या असल्यातर पुरुष माणस त्यांना बसायला जागा देत. पण हल्ली तस कोणी काही करत नाही हे माझ्या लक्षात आले होते. प्रथम प्रथम मी कोणी स्त्री उभी असली की तिला उठून जागा देत असे. हे साहेब लोक आपण स्वत: तर जागा देतच नसत पण मी देतो आहे हे पाहिल्यावर माझ्याकडे विचित्र नजरेने पहात रहात. तेव्हापासून मी कानाला खडा लावला की कोणालाही उठून जागा द्यायची नाही म्हणून. व सांगायला आनंद वाटतो की लंडनला असेपर्यंत तो कानाचा खडा मी काढला नाही.

आता डिसेंबर महिना सुरू झाला होता. हवेत थंडी असली तरी वातावरण गरम होत चालले होते. ख्रिसमसचा सण जवळ येत चालला होता ना ? सगळीकडे 'सेल'चे लहान मोठे फलक लावले होते. अगदी १० टक्के पासून ५० टक्क्यापर्यंत किंमतीत सूट मिळणार होती. मोठाली दुकाने ख्रिसमसकरता म्हणून खास सजवली गेली होती, खूप रोषणाई व दिव्यांची आरास केली होती.

मी लंडनला पोहोचलो होतो तोच मुळी रात्रीचा. त्यावेळी खास अशी रोषणाई केलेली नव्हती तरी सुद्धा मध्य लंडनमधले रस्ते आणि घरं प्रकाशात अगदी उजळून निघाली होती. त्या रोषणाईच हवाई दर्शन मी घेतलं होत. त्याच वेळी, 'अबब काय ही रोषणाई ? काय ही रंगी–बेरंगी प्रकाशाची उलाढाल !' असे आश्चर्याचे उद्‌गार माझ्या तोंडून निघाले होते. तसेच भाव मी नंतर त्या रस्त्यावरून गेलो त्यावेळी पण होते. आता नेहमी इतकी रोषणाई असते तर ख्रिसमसच्या वेळी किती असेल ह्याचा अंदाजच करणे योग्य.

ख्रिसमसची आणखी एक खास गोष्ट म्हणजे खरेदी ह्या सणाकरता साहेब लोक स्वत करता तर खरेदी करतातच पण मित्र–मैत्रिणीकरता, नातेवाईकांकरता भेट देण्याकरता म्हणून मोठ्या प्रमाणात खरेदी करतात. प्रत्येकाने प्रत्येकाला काही तरी भेट वस्तू दिली पाहिजे, मग ती किती का लहान मोठी असेना. अशी पद्धत आहे. त्याचमुळे हे सेल व ही दुकानांची रोषणाई. सगळीकडे आनंदी आनंदी आतावरण.

मी मात्र ह्या सगळ्यापासून अगदी अलिप्त होतो. धर्माने ख्रिश्चन नसल्यामुळे साहेबाच्या धार्मिक भावनेशी सहभागी होत नव्हतो. त्याचप्रमाणे अजुनी विशेष असे मित्र–मैत्रिणी झाले नसल्यामुळे खरेदीतही मी फार रस घेऊ शकत नव्हतो. मात्र रस्त्यावरच्या दुकानांची रोषणाई बघत होतो, त्याचा आनंद घेत होतो व मनसोक्त खिडकी–खरेदी करत होतो.

एके संध्याकाळी मी असाच खिडकी–खरेदी करून, दमून–भागून, भुयारी गाडीत येऊन बसलो. गाडीत विशेष गर्दी नव्हती. त्यामुळे इकडे–तिकडे पहायला बराच अवसर होता.

दुसऱ्या की तिसऱ्या स्टेशनवर एक तरुण जोडपे चढले. दोघेही उंच–निंच, गोरीपान, रेखीव व सुंदर तर होतीच; पण तारुण्याचा म्हणून जो बहर असतो त्यात होती. काही तरी फार आनंददायक घटना घडली होती. त्या आनंदात सिगरेट पीत–पीत ती दोघं हातात हात घालून रिकाम्या जागेवर येऊन बसली. ती तरुणी हसत–खिदळत त्या तरुणाला काही सांगत होती तोही तिला तसाच प्रतिसाद देत होता.

तेवढ्यात त्यांच्या मागल्याच बाकावर बसलेल्या थोड्या शिष्ट दिसणाऱ्या माणसाने हा धूम्रपान निषिद्ध डबा असल्याचे त्यांच्या ध्यानी आणून दिले.

तशी जाणीव करून दिल्याबरोबर त्यां दोघांनी हातातल्या सिगरेटी तर टाकल्याच; पण त्यांचे चेहरेही पडले. त्याच हसणं निमालं. कोणत्याही गोष्टीवर पाणी पडणं म्हणतात तसं त्यांच्या आनंदावर पाणी पडल होतं. दोघं अगदी हिरमुसली होऊन गेली.

मात्र तो खडूस माणूस मोठ्या आनंदात दिसला.

कसे लोक असतात नाही जगात ? आता हे खरे होते की तो डबा सिगारेट न पिणाऱ्यांसाठी होता व त्यादृष्टीने त्याच म्हणणं कायदेशीर होत; पण कायदेशीर म्हणजे योग्य असं समीकरण नेहमी बरोबर थोडच असत ? काय मिळालं त्याला त्यांचा आनंद हिरावून ?

त्या सिगरेट न पिण्याच्या नियमाइतकाच त्या तरुण जोडप्याचा आनंद महत्त्वाचा नव्हता का? की त्याला त्या दोघांच्या सिगारेट पिण्यापेक्षा त्यांचा आनंद बघवला नव्हता ? कोणाचाही आनंद हिरावून घेऊ नये हा अलिखित नियम नाही आहे का ?

असे किती तरी अलिखित नियम असतात पण दुर्दैवाने लिखित नियमाच वर्चस्व आजकाल वाढत चालल आहे नाही ?

पुढले स्टेशन आले ते दोघं खिन्न मनानं पण घाईघाईने उठले व दाराकडे जाऊ लागले. जाता–जाता त्या मुलीनं त्या माणसाला 'हॅपी–ख्रिसमस' म्हटलं. अर्थात त्या शुभेच्छेला खडूसपणाचा वास येत होता. □

# कळाहांडी... सब सोए हुए हैं।

संजय संगवई

फूलबनीला जाणाऱ्या रस्त्याला लागलं की दशपल्ला गावापास्नंच गर्द झाडीची डोंगरधार लागते. फाल्गुन–चैत्रात महुआ, कडुनिंब, पलाश फुललेले असतात. एखाद्या अष्टमीच्या रात्री या बनातनं जाताना स्वप्ननगरीत असल्यासारखं वाटतं. दूरपर्यंत पसरत गेलेली निःशब्द पहाडी, त्यांच्या कुशीत शांत पहुडलेल्या कोंड, डबर, गोंडांच्या वाड्या, लाल मातीनं सारवलेल्या कुडाच्या भिंती असलेली घरे दिसतात. संधिप्रकाश जपणारे तलाव, रानातल्या अंधारात गडप होणाऱ्या वननद्या, पतझडीमुळं पिवळं पडत जाणारं जंगल भवानी पाटण्यापर्यंत सोबत करतं.

चित्रविचित्र सुळक्यांनी वेढलेलं हे जिल्ह्याचं ठिकाण. जिल्हा कळाहांडी. ओरिसातला सर्वात मागास–कंगाल भाग. उन्हं पसरत जातात तसं कळाहांडीचं नित्य जीवन सुरू होतं, चुरू, जारिंग, सुपेल, रामपूरच्या जंगलातनं चार–पाच दिवसापास्नं खाटखुट करत गोळा केलेली लाकडं मोळ्यांनी किंवा बैल जोड्यांवर लादून भवानी पाटण्याला येतात. कावडीला लाकडाचे भारे अडकवून बारा–पंधरा किलोमीटर लवलवत जाणारे काळे देह डांबरी रस्त्यांवरून जात असतात. एखाद्या सापासारखे त्यांचे मणके, खांद्या-पोटऱ्यांचे स्नायू चळवळत राहतात. बी. विठ्ठल, बी-प्रभाच्या चित्रात दिसणाऱ्या स्त्रिया घोळक्या घोळक्यांनी ये-जा करत असतात. शहराच्या चौकाचौकात त्यांच्यापैकी काही आपला तांदूळ विकतात.

दुपार होते तसं कळाहंडीची कळा जास्तच भयासूर दिसू लागते. पार डोंगरदरीत वसलेल्या गावांपर्यंत पाण्याची आबदा, वर्षातनं एकदाच पीक घेता येणारी भाताची खाचरं, नुस्तीच नांगरून ठेवलेली जमीन.

भवानी पटण्यात उतरल्यावर आठवण झाली ती आमच्या देगलूरची. मराठवाडा-आंध्रऱ्या सीमेवरचं हे तालुक्याचं ठिकाण. धूळ, ऊन, कचकच, बकालपणा, कशीतरी घरे बांधलेली, वाट मिळेल तिथे रस्ते केलेले, जुन्या तुळईच्या कौलारू खोलीशेजारीच सिमेंटचे ठिसूळ बांधकाम, चौकाच्या आसपास बाजार दुकानं, हातगाड्या. आपलं अस्तित्व दाखवण्यापुरती दिव्यातनं वीज सळसळून जाते. बाकी बहुतेक कारभार रोमँटिक घासलेटच्या दिव्यांच्या अंधारात.

भवानीपाटण्याचा थेट हा बाज. गेल्या गेल्या उमाशंकर कर या 'छरहरे शरीर का, उत्साह-उमंग से भरपूर अशा वकिलाला गाठले. पार्टटाईम वकिली, ओव्हरटाईम संकट बातमीदारी असा त्याचा खाक्या.' अंधाऱ्या खोलीत कायद्याची पुस्तकं, केसची कागद अस्ताव्यस्त पडली, समोर चार-पाच जणांशी अष्टावधानी रीतीनं गप्पा मध्येच अस्मादिकांची विचारपूस. मध्येच कोर्टाची भानगड. मूळचा वरच्या जातीचा, खात्यापित्या घरचा हा माणूस इथल्या आदिवासींच्या प्रश्नाशी एकरूप झाला आहे.

आदिवासींच्या केसेस चालवतो. तिथल्या मागासलेपणाचा ट्रॅक ठेवायचा, पी. टी. आय.ला बातम्या पुरवायच्या याचं त्याला व्यसन. दिवसभर भिरभिर करत फिरणारा उमाबाबू रात्री त्याच्या लॉजवर पेंगुळलेल्या अवस्थेत भडाभडा बोलतो. त्यात कळाहांडी, मी, माझा धंदा, इथल राजकारण, ओरिसाचं राजकारण, आदिवासी, अधिकाऱ्यांची खाबुगिरी, त्यावरचा विषाद, संहाय यांचं मिश्रण असतं.

कळाहांडीच्या प्रश्नांकडं राज्यातलं लक्ष वेधण्याचा प्रयत्न करणारा म्हणून इतरत्र त्याच्याबद्दल कौतुक होते. 'अरे, कळाहांडीवर लिखने के लिए कोई भी जावे. करबाबू खुदही उसे लेकर घुमाएगा, देखभाल करेगा.' असं फूलबनीच्या नझीर अख्तर या बुजुर्ग पत्रकारानं सांगितलं. अन् ते खरंच निघालं. हा माणूस सगळं काम सोडून बरोबर हिंडला. हे बघ, ते बघ. असं करत खुद्द माझाच पिट्टा पाडला. हे सगळं कळाहांडीसाठी असं तो म्हणायचा.

कधीकाळी महाभारतातलं इंद्रवन म्हणून प्रसिद्ध असलेल्या या भागात दगडांच्या मोठमोठ्या राशी दिसतात. नवाश्म युगातल्या मानवाची इथं वस्ती होती. योगीमठातल्या डोंगरात त्यानं कोरून ठेवलेली चित्रं अजूनही आहेत. ईस्टर्न घाट्सच्या रांगांमुळं भरपूर जंगल आहे (नव्हे होतं !) नर्ला असुरगढच्या रूपानं इतिहास, कला इथं अजून निःश्वसत आहे. इथं कला–कौशल्याची हांडी म्हणजे क्षेत्र म्हणून हा भाग कळाहांडी (किंवा कॉलॉहांडी, कळॉहांडी !) एकंदर चौदालाख लोकसंख्येपैकी पस्तीस टक्के आदिवासी (४ लाखांवर) असलेल्या या भागात अश्मयुगापेक्षा मोठा वदल झाल्याचं दिसत नाही. आपल्या शिरूर, पारनेर, सोलापूर भागातल्यासारखा उजाड, भकासपणा, डोंगराच्या अंगाला अगदी मावळ–कोकणातल्या प्रमाण प्रचंड जंगलतोड असं कळाहांडीचं वर्णन करावं लागेल.

**भारतातलं दारिद्रय, मागासलेपण तरी काय असतं ते पहायला पंतप्रधान राजीव गांधींनी ओरिसातल्या कळाहांडी जिल्ह्याला गेल्या वर्षी भेट दिली–ते आल्यानं तिथं काही कामंही सुरू झाली. मात्र कळाहांडीचा किंवा भारतातल्या कुठल्याही मागास भागाचा, विकासाचा मार्ग आज वेगळाच आहे. गुंतागुंतीच्या राजकीय व्यवस्थेत विकास आणायचा असेल तर चळवळ, जागृती, राजकीय नेतृत्व यांची आवश्यकता असते. कळाहांडीत तेच प्रातिनिधिक स्वरूपात दिसतं.**

### जवळचा रस्ताही नाही

तस पाहता कळाहांडीतलं दारिद्रय काही अकल्पित नाही. भारतात सगळीकड असल तसच. सकाळ संध्याकाळ बाजाराच्या वेळी धुळीनी माखलेलं, बाजारपेठेच, तालुक्याच किंवा जिल्ह्याचं ठिकाण सोडल की चार–दोन किलोमीटरपासून लहान वाड्या, पाडे, चाय–खारीची दुकान असलेली गावं, वर्षानुवर्षे पाणी–वीज याची थकलेली प्रकरण, गावापर्यंत न पोहोचणारे रस्ते, पावसाच्या पाण्यावर जगणारी शेताडी, वर्षातन एखाद दुसरच पीक, शेतमजूर आदिवासींची ससेहोलपट, रोजगाराची वानवा, वरून येणारा पैसा वरच्यावर गटवणारे अधिकारी हा सर्व प्रकार इथ आहे. मात्र अस असूनही आपल्याकडच्या सर्वात मागासलेल्या दुष्काळी भागापेक्षाही कळाहांडी कळाहीन आहे. याच कारण म्हणजे भारतातल्या प्रत्येक भागात, जे निरनिराळे प्रश्न आहेत, ते सर्व या जिल्ह्यात 'एकसमयावच्छेदे' करून मौजूद आहेत. जसजसं आम्ही फिरायला, बोलायला लागलो तसं उमगत होतं की इथ काय काय नाही. इथ शेती परवडत नाही, पाटबंधारे नाहीत, इथ नवे उद्योग नाहीत, इथ रस्ते, शाळा नाहीत, आदिवासींना पुढं नेण्याचे प्रयत्न नाहीत, इथ आदिवासी–हरिजनांची जागृती–आंदोलन नाही. जंगलाची तोड, सरकारी पैशाची उधळपट्टी, आदिवासींना दमदाटी, लूट, सरकारी अधिकारी, दारूचे गुत्तेदार, जंगलाचे कंत्राटदार यांचं साटलोट, हे झालं नोकरशाहीच्या पातळीवर. त्याहीपुढे राजकीय जागृती, नेतृत्व, त्यानुसार घेतले जाणारे निर्णय यांची वानवा आहे. ओरिसा राज्याच्या विकासामध्ये कळाहांडीला स्थानच दिसत नाही. भारताच्या मागासलेपणाचा हा पूर्ण नमुना आहे.

उमाबाबूंची सगळी धडपड इथल्या प्रशासनाची कुचराई, दिरंगाई व खाबुगिरी उघडी करण्याची. महामहीन राजीवजी यांच्या भेटीनंतर कळाहांडीमध्ये विकासकाम सुरू झालं नाही का ? अस विचारल्यावर तो डोळा भारत म्हणतो, 'हाँ, सुरू झालय. पण तेरा ब्लॉकचा पैसा नवापाड्याकडे वळवण्यात आला आहे.

नो डाऊट, नवापाडा भाग भारतातला कंगाल भाग आहे. पण कळाहांडीतला, पर्यायानं ओरिसातला सर्वात अधारा भाग या भवानी पटण्याच्या डिस्ट्रिक्ट हेडक्वार्टरच्या अगदी नाकाखाली आहे. इकडं कुणाचं लक्ष आहे ? अधिकारी, मंत्री–संत्री रस्त्यानं येतात, पण कारलापाटच्या जंगलातन जाणाऱ्या सत्तर किलोमीटर रस्त्यान केवळ दहा गावच जोडली जातात. आतली सगळी गावं अजूनही पार दूर ! भैया ओरिसात स्वातंत्र्य येऊन पस्तीस वर्षं झाली पण भवानीपटण्याच्या बारा किलोमीटरवरच्या गावात बस, रस्ता, शाळा नाही, तिथं कुटिया कंधाना दोन दिवस उपाशी रहावं लागतं याचा अर्थ काय ?'

याचं प्रत्यक्ष प्रमाणच अनुभवायला मिळत होत. एके दिवशी उन्हाचे सपाटे खात सायकलवरनं खाचखळग्यातनं 'पीडल' नावाच्या गावाला पोचलो. बरोबर जगन्नाथपुरचा सुदर्शन. दुभाष्याच काम करायला. लाजीगढ ब्लॉकमधल्या या गावातली माणसं अजूनही अश्मयुगात होती. कोंड (किंवा कंध) जमातीची इथं वस्ती. यात सपाटीवर राहणारे कुटिया कंध तर डोंगरावरचे डंगराळी कंध.

ही माणसं अंगभर कपडे पेहरू शकत नाहीत. पीडलची बारा कुटिया कंध कुटुंब तशीच. वर्षातन आषाढ, श्रावण, भाद्रपद हे तीनच महिने शेतमजुरीचं काम. बाकी दिवस डोंगरातनं लाकडं विकायची बुकडकामं करायची. त्यात कसं निभावतं म्हटल्यावर रामू मांझी निर्विकारपणं म्हणतो,

'दोन दिवस खायचं, तीन दिवस उपास काढायचे '

इथल मुख्य अन्न भात, पण ते यांच्या नशिबी नाही. केंदू, रागी असल्या अन्नावरच गुजारा. दुधाचा तर प्रश्नच नाही. लहानपणापास्नं खरूज, दमा, डोळ्याचे रोग होतात. डॉक्टर या भागाला फिरकत नाही. शेजारी गुडरी या ग्रामपंचायतीच्या गावी शाळा. पण मास्टरसाहेब महिना महिना गायब असतात. सरकारकडे कोण जाणार ? इथं काही माहितीच नाही.

शेजारच्या गावातील सरलाजी ( तेली ) जमातीची शेती आजूबाजूला होती तीच माणसं महाजनी ( सावकारी ) करतात. त्यांची शेती ही मंडळी कसतात.

गावात कोणी सावकार नाही. सरकारचं कर्ज इतरत्र मिळत असेल इकड येत नाही...पुढे गुडरी, गुट्टीगुडा, सुपेल, गुनपुरा, लाजीगढ, थोमुल रामपूर, कारलापाट, अंधारीगुडा (!) अशा गावात तपशिलाचा फरक सोडता हीच कथा. मासल्यादाखल थोडंसं तपशिलात जाणं ठीक होईल.

कळाहांडीतल्या १८ गटांपैकी लांजीगढ व थोमुल रानपूर ब्लॉक पूर्ण आदिवासी गट आहेत. लाजीगढमध्ये ११ ग्रामपचायतींपैकी सहा पचायतीतली खेडी अडीच–तीन हजार फूट डोगरावर आहेत. त्यात २७७ गावे आहेत सव्वीस हजारावर आदिवासी तिथं आहेत. इथे पायीच जावं लागतं. कोणतीही आरोग्य सेवा इथ नाही. सव्वीस गावात नावाला शाळा आहेत. दोन शाळाना स्वत.चे झोपडे आहे. ऐंशी टक्के आदिवासी असून आश्रमशाळा नाही. यापैकी फक्त एका गावात वीज आली. तीही ओरिसा टाइप. अपवादात्मक वेळा ती अस्तित्वात असते. या डोगराळ भागाच्या विकासासाठी पैसा देत नाहीत. सरकारची 'लॅंपस' ( large Scale Multi Purpose Service ) योजना लाजीगढ भागात तीन खेड्यात आहे. डोगराळी आदिवासीना सब्सिडीचा गहू–तादूळ मिळत नाही. पाण्याची गोष्ट तर दूरच.

## योजना पोचत नाही

थोमुत रामपूरची गोष्टही तीच. २६० गावापैकी एका गावात वीज पोचली आहे. डोगराळ–जगलाच्या भागात कारलापाटचं राखीव जगल आहे. तहसिलदारापास्नं राज्यपालांपर्यंतची मंडळी इथल्या डाकबगल्यात निसर्ग सौंदर्यासाठी येतात. पण येताना या रस्त्यावर काम करणाऱ्या अर्धवस्त्रातल्या बाया पुरुषांकडे, मळकट झिपऱ्या सावरणाऱ्या उपाशी पोरापोरीकडं लक्षच नसतं. रायपूर ब्लॉकमधला हा सत्तर किलोमीटरचा रस्ता आहे. या रस्त्यामुळ कडेची फक्त दहा गावं जोडली गेली आहेत ! आपल्याकडच्या सहकारी ग्राहक भंडारासारखी इथे 'लॅंपस' योजना आहे मात्र त्यातील सगळ्या सोयी सपाटीच्या प्रदेशात त्यातही शहरी ग्राहकाना लागणाऱ्या वस्तू असतात अशा तक्रारी आहेत.

आदिवासीच्या तक्रारी मुख्यत. बी. डी. ओ , तहसीलदार सेटलमेंट ऑफिसर याच्याशी निगडित आहेत. जमीन सुधारणा कायद्याखाली आदिवासीना द्यायची जमीन अजूनही नकाशात दाखवली नाही. त्या जागेवर काहीही पिकत नाही. जमिनी ताव्यात आल्या नाही, तरी गेल्यावर्षी मशागतीसाठी कर्ज दिलं गेल ! तर सेटलमेंट ऑफिसर, एकाग्रामागे 'माण'भर तादूळ, पन्नास रुपये मागतो. आदिवासीना देण्यात येणाऱ्या कर्जामध्येही प्रचड भ्रष्टाचार चालतो. नुकतंच रामपूर ब्लॉकमधल्या एका वरच्या अधिकाऱ्याला ४२ प्रकरणांमध्ये भ्रष्टाचाराबद्दल अटक झाली होती.

आदिवासीच्या अज्ञानामुळे सरकारी योजना त्यांच्यापर्यंत पोचत नाहीत, प्रशासनाची ढिलाई आहे त्याच जोडीला धनदांडग्या लोकांकडून त्यांची पिळवणूक होते. भाटी, बिहारी ठेकेदारांनी दारूचं व्यसन लावलय. त्यांच्या उत्पन्नातला पन्नास टक्के भाग दारूत जातो. या दारूनं विनाश केला आहे हे त्यानाही उमगतय. कळाहांडी आदिवासी संघान वरिष्ठाना जी पत्रं पाठवली त्यात पहिली मागणी ही दारूची ठिकाण हलविण्याची आहे.

आदिवासीचा मुख्य रोख इथल्या प्रशासनावर, अधिकाऱ्याच्या भ्रष्टाचारावर आहे. इथ विकासासाठी बऱ्यापैकी पैसा येतो. मात्र तो खालपर्यंत पोचतच नाही. विधानसभेत खोटी आकडेवारी सांगितली जाते. रस्ते–वाहतूक नाही ही इथली मोठी अडचण. त्यामुळं इथं काहीच पोहोचू शकत नाही. विजेचा प्रकाशही नाही. या कंगालपणाच्या मागे काय असाव ? फक्त प्रशासकीय ढिलाई ?

एका निवात रात्री भवानीपटण्याच्या जिल्हा नियोजन अधिकाऱ्यांबरोबर आम्ही चर्चा करत होतो. मोठा खानदानी, अभिरुचीसपन्न हा माणूस. शास्त्रीय सगीताच्या तबकड्या लावून कळाहाडीच्या गरिबीचा पट माडत होते. इथलं जगल नासवून टाकल जात आहे, पाणी आटत आहे, त्यामुळं शेतीचा बोजवारा उडत आहे याचा विषण्णपण पाढा वाचत होते. म्हणत होते, 'ही जगलतोड थांबवली नाही तर पाच वर्षात इथे इथिओपिया होईल. स्टेडियम, टाऊन हॉल, स्मारक वगैरे बाधण्यासाठी पैसा खर्च करण्याऐवजी लहान पाटबधारे, पाझर तलाव बांधावे अशा सूचना केल्या; पण काही उपयोग नाही मागासलेल्याच्या बाजून जास्त बोलायला लागलो तर ते आपल्याला कम्युनिस्ट–नक्षलवादी असे शिक्के मारतात.' बाबूमोशायासमोर सत्यजित राय याच्या प्रतिद्वद्वीमधला नायक होता !

साहेबाच म्हणणं खरं होतं.

इथला शेतकरीही तेवढाच दरिद्री आहे. त्याला जमीन मालकीची पद्धत कारण आहे.

पंधरा ते वीस टक्के शेतकऱ्याच्या हातात साठ टक्के जमीन आहे. अर्थात जमीन मालकी कोणत्याही एका जातीची नाही. जिल्ह्यात फक्त सहा टक्के जमीन पाण्याखाली आहे. त्यात विहिरीचाही समावेश आहे. उन्हाळ्यात ते प्रमाण ४ टक्क्यावर जात पाच एकरापर्यंत शेती असलेल्या शेतकऱ्याला शेती परवडतच नाही. दुसरं काय करायचं म्हणून तो शेती करतो. असा शेतकरी कुणाला मजुरी देईल ? वर्षातनं फक्त एक पीक काढतात. बागायती असलेले फार तर भाज्या इतर किरकोळ पिक काढतात.

## कुपोषण, दुर्बलता


वस्तुत. कळाहाडी जिल्ह्यात पाटबधारे काढण्यासाठी सर्वात जास्त क्षमता आहे. मात्र ओरिसात सर्वात कमी ओलित इथ आहे. पूर्वेकडच्या कटक, ( पुरी ) गजम, बलसोर जिल्ह्यात तर नजर थकेपर्यंत पाणीच पाणी. कळाहाडीतल्या ५० टक्के जमिनीवर जगल आहे. त्यामुळ तिथ बारमास नद्या आहेत. पण त्याना शेतीच्या कामाला जुपण्याच सुचलेलं नाही. इद्रावतीनदीवरचा प्रकल्प १९४७ पासून चालूच आहे आपल्या चासकमान सारखा. चारवर्षात त्याच्यासाठी फक्त ४ कोटी रुपये खर्च झाले. इथ उद्योगही नाहीत. चार हजारावर 'उद्योग' या जिल्ह्यात नोदले गेले. 'उद्योग' म्हणजे भातसडीच्या पिठाच्या चक्क्या, तोटयात चालणारी सूतगिरणी.

बेकारी असली तरी, इथं कामं करायला बाहेरच्या जिल्ह्यातून, राज्यातून मजूर बोलावले जातात. कुपोषण हा इथला प्रश्न, इथल्या माणसाकडून शारीरिक कामच होत नाहीत म्हणून ताकदीची कामं बाहेरच्या मजुराना बोलावून करावी लागतात ! भुकेल्या पोटाच लक्ष जात जगलावर सुरली–सुपेल, चुरूच्या जगलाची काय वाट लागली ते पाहिलच. रोज दिडशे बैलगाड्यावरन लाकूड बाहेर जातं. त्यात आदिवासीची जगल तोडून 'पोडू' शेती. डोगरच रणरण होतात.

इतकी विषमता दारिद्र्य असूनही कळाहाडी जिल्ह्यात त्याविरुद्ध

कुठेंच आवाज नाही, विकासाची आच नाही. एकही लढाऊ संघटना नाही. विशेषत: ३० ते ३५ टक्के आदिवासी व मागासजातींची संख्या लक्षात घेता बिहार, महाराष्ट्रातल्या प्रमाणं इथंही आदिवासींची श्रमिक संघटना किंवा झारखंड मोर्चा पाहिजे होता. ओरिसातल्याचा संबलपूर, केओंझर, मयूरगंज, कोरापुट जिल्ह्यातही हीच स्थिती आहे. भीषण दारिद्र्य, विषमता, सरकारची लापरवाही, आदिवासींचे शोषण–फसवणूक अनेक वर्षांपासून चालू आहे. बिहारच्या संथाळ व छोटा–नागपूर भागात आदिवासींचे संघटन, पलिकडच्या आंध्रातल्या श्रीकाकुलम् जिल्ह्यात नक्षलवाद्यांची चळवळ व आदिवासींची मोठी संख्या– अशा अनुकूल पार्श्वभूमीवरही कोणतीच डावी संघटना चळवळ या जिल्ह्यात नाही. ज्या ज्या ठिकाणी गेलो, तिथं यासंबंधी विचारता आदिवासी मंडळी नुस्तंच पाहत रहायची. खरं तर गेल्या शतकात व स्वातंत्र्यापूर्वीही कुटिया कंध व डंगराळी कंध या जमातींनी इंग्रजांविरुद्ध व नंतर जमीनदार कुळत्यांविरुद्ध लढा दिला. मात्र हे बंड एवढ्या जोरदारपण चिरडलं गेलं की त्यानंतर हे आदिवासी अतिशय भीरू बनले. भवानीपाटना, केसिंगाच्या बाजारात आजही या आदिवासींना कोणीही दरडावू शकतं, त्यावर हे उलट उत्तरे देत नाहीत. उलट दादा–बाबाच करतात. उमाबापू म्हणाला, 'त्यांच्या एका गालात मारलं, तर दुसरा गाल का सोडला असं विचारण्यापैकी ते झालेत.' शहरांच्या रस्त्यावर कावडीसारखे लाकडांचे भारे घेऊन त्यांचे पोलादी, देह नि:शब्दपणे उन्हातनं जात असतात. एक दिवसाचे दहा रुपये मिळायला चार दिवस जंगलात खाटखुट करावी लागते. त्यातून दोन एक दिवसांचा गुजारा होतो. पुढे काय ? तर ते म्हणतात, 'दोन–तीन दिवस उपाशी राहायचं, एक दोन दिवस खायचं.' डोंगरावरची शेती करणाऱ्यांकडून किंवा सेट्‌लमेंटसाठी संबंधित अधिकारी लाच घेतात. नसता पोलिसात धाडतात. त्याविरुद्ध तुम्ही एक होत नाहीत का ? त्यावर गुनगुरची मंडळी म्हणतात, 'एखादा भांडायला उठतो. मात्र त्यावेळी इतर जण त्याला साथ देण्याऐवजी काढता पायच घेतात.' कंध, उरांव, गोंड ही मंडळी विखुरलेली आहेत. कळाहांडीच्या पहाडांमध्ये डंगराळी कंध, मधल्या भागात व सपाटीवर थोडी फार शेती, मजुरी करणारे कुटिया कंध, आदिवासीतले ब्राह्मण म्हणवणारे उरांव, आदिवासींचे शोषण करणारे मागासजातीतलेच डोंब, छोटे–मोठे जमीनमालक हरिजन असा सगळा प्रकार. अनेक वर्षं दबलेल्या या लोकांना जागृत, संघटित करण्याचं कामही कोणी हाती घेतलं नाही. डाव्या पक्षाचं नाव-निशाण इथं नाही. भुवनेश्वरहून येताना नयागढच्या अलिकडे एक दोन लाल–बावटे दिसले तेवढेच. विरोधी जनता पक्ष हा तर फक्त काँग्रेसविरोधी. काँग्रेसला हरिजन आदिवासींची मतं मिळत असतात, म्हणून कळाहांडीमध्ये जमीनधारक, व्यापारी हा मोठ्या संख्येनं जनतात. म्हणजे विरोधकांकडूनही जागृतीची अपेक्षा नाही.

इतर स्वयंसेवी संस्थांपैकी कळाहांडी आदिवासी संघ, ग्रामीण विकास संस्था वगैरे आहेत. मात्र पंतप्रधानांपासून तहत कलेक्टरांपर्यंत सर्वांना निवेदनं पाठविण्याशिवाय आदिवासी संघाचं दुसरं कोणतंच काम नाही. गेल्या पाच वर्षांत दोन आदिवासी मेळावे घेतले. त्यांनी पाठवलेल्या काही सविस्तर निवेदनांमध्ये दारूची बाधा टाळण्यासाठी उपाय, शिक्षण, आरोग्य, दळणवळण–वाहतूक यांची



दोन–तीन दिवस उपाशी राहायचं, एक–दोन दिवस खायचं

□

शिफारस केली आहे. आदिवासींच्या प्रश्नांसंबंधी संशोधन, शिफारशी करू शकेल अशी मात्र संघटना इथं नाही.

छात्र युवा संघर्ष वाहिनीचे निमंत्रक भक्तचरणदास. भवानीपाटण्यातून आमदार म्हणून निवडून आले. यापूर्वी पाचदा जिंकलेल्या व तीन वेळा कॅबिनेटमंत्री असलेल्या काँग्रेस (आय) उमेदवाराचा त्यांनी पराभव केला आहे. मात्र त्यांचा विजय हा संघर्षवाहिनीचा विजय नाही. त्यांनी जनता पक्षाकडून निवडणूक लढवली. स्वत: मागास असून त्यांना आदिवासी–हरिजनांची मते कमी पडली. विरोधी पक्षाच्या मतांवर ते जिंकले. इथे संघर्ष वाहिनी होतीच कुठं असं जिल्ह्यातले नेते विचारतात. कळाहांडीमध्ये एक सरकारी व तीन खासगी महाविद्यालयं आहेत. इथे कुठून 'छात्र युवा' आला ! बरं' संघर्ष वाहिनीची इथली तुरळक मंडळी संबळपूर, कोरापुटमध्ये आंदोलने करतात. मात्र कळाहांडीमध्ये काहीच नाही. संघर्षवाहिनीने तिथं एकाद्याच मुद्यावर जोर द्यायच्याऐवजी अनेक बाबतीत लक्ष घालायचा प्रयत्न केला. त्यामुळे तिच्या कामाचं स्वरूप विखुरलेलं राहिलं असं वाहिनीचा पूर्वीचा निमंत्रक भारतभूषण म्हणतो.

आदिवासी–हरिजनांखेरीज इतर हितसंबंधी गटांनी तरी संघटित होऊन आवाज उठवावा अशीही स्थिती नाही. या भागात कोणताही गट निश्चित, ध्रुवीकरण झालेला नाही. शेतकऱ्यांमध्ये १५ टक्के वडे शेतकरी एकाच जातीचे नाहीत. हरिजन विखुरलेले आहेत. आदिवासींची ती तशी गत. त्यामुळे कळाहांडीत एकाही गटाची मागणी जोरदारपणे पुढे येत नाही. हितसंबंधी चळवळ, जागृती, आंदोलन सुरू व्हायला तिथल्या समाजाचा एकजिनसीपणा आवश्यक असतो.

## नेतृत्वाची वानवा

उमाशंकरचे वडीलबंधू कळाहांडीतल्या जनता पक्षाचे जुने कार्यकर्ते. इथल्या राजकीय परिस्थितीचा पेच मांडताना ते म्हणाले, 'परंपरेनं आदिवासी–हरिजन काँग्रेसला मत देतात. बहुसंख्य शेतकरी, व्यापारी हा विरोधी पक्षात असतो. त्यामुळं कोंडीच झालेली आहे. सत्ताधारी पक्षाच्या बाजूने असल्याने आदिवासींचा विरोधी आवाजच उठत नाही आणि शेती–व्यापार क्षेत्राचा विकास – विरोधी शक्ती असल्यानं होत नाही. स्थानिक नेतृत्वाची वानवाच आहे.'

महाराष्ट्र, उत्तरप्रदेश, बिहारमध्ये कस का असेना स्थानिक सत्ताधारी, सोसायट्याचे, पंचायतीचे अध्यक्ष, ग्रामीण भागातले पारंपारिक गट आमदार-खासदारांना व सरकारला वेठीस ठेऊ शकतात, तस कळाहांडीला नाही कारण इथला स्थानिक पुढारी (Local elite) तेवढा साधनसंपत्तीने बळजोर नसतो. शुगर लॉबीची जशी हुकूमत असते तशी ओरिसाच्या कटक, बलसोर, पुरी या इरिगेशनवाल्या जिल्ह्यातल्या स्थानिक सत्ताधाऱ्यांची राहते. कळाहांडीत इथल्याच साधनसंपत्तीतून सत्ता निर्माण व्हायचा मार्गच नाही. मोठी बचत, भांडवल, गुंतवणूक होईल असं काहीच नाही. त्यामुळं इथला नेता राज्याच्या राजकारणात dictating terms मध्ये राहू शकत नाही. इथे सारा पैसा भुवनेश्वरहून आणावा लागतो त्यामुळे जो भुवनेश्वरमध्ये, तो कळाहांडीला सत्ताधारी असतो. सत्ताधारी गटाचा वरून आलेली मंडळीच इथलं नेतृत्त्व ठरवत असतात. सत्ता खालच्या पातळीवरून वर जाण्याची प्रक्रिया ही स्थानिक संपन्नतेवर अवलंबून असते. परत पेच आला !

...एका रात्री उशिरापर्यंत गप्पा करत होतो. बल्बच्या मंद प्रकाश उजेडात उमाशंकरचं बोलणं एखाद्या लांबून ऐकू येणाऱ्या किमच्या आवाजातल्या करुण गाण्यासारखं वाटत होतं. हे सगळं एक दुष्टचक्र आहे. हे नाही म्हणून, ते नाही, त्यामुळं पुढचं नाही, म्हणून पहिलं नाही– Back to square one अशी अवस्था होत होती. 'यह vicious circle कहाँ टूटेगा कुछ पता नही ! दस सालसे मैं यहाँ हूँ– वकिलीकडं दुर्लक्ष करून इथला बातमीदारीचा धंदा करत आहे. त्याचे महिन्याला दोनशे रुपये मिळतात. दहा वर्षं झाली मिळालं काय ? नर सत्ताधाऱ्यांच्या काळ्या यादीत गेलो. हे विरोधक तेवढ्यापुरतं माझ्या बातम्यांचा उपयोग करतात. संपलं. इथं कुणीही लक्ष द्यायला तयार नाही. दहा वर्षं व्यर्थ गेली. काही होत नाही आमच्यासारख्या तोकड्या पत्रकाराकडून ! पुढच्या वर्षी सगळं-सगळं सोडून देणार आहे मी. बस आपली वकिली, बायका-दोन पोरं. त्याना नीट ठेवायचं !' उमाबाबूची कसमस जाणवत असतानाही आम्ही आपलं थोपवत होतो. म्हटलं, 'उमा, कळाहांडीच्याबाबत तूच एक जागरूक आहेस, असं कटक भुवनेश्वरपासून ऐकत आलोय. तू आहेस म्हणून इथे काही तरी अज्ञात रीतीचं दुखणं आहे हे बाहेर कळत.' जिल्हा नियोजन अधिकारीही मान्य करत होता, की अज्ञानाचं, दिलाईचं इथलं दुष्टचक्र तोडण्याचा प्रयत्न फक्त पत्रकाराकडून झाला. आणि त्यातला आघाडीवरचा उमाशंकर या रात्री असं बोलत आहे !

असलं दुष्टचक्र हे कशा पद्धतीनं भेदायचं यावर इथल्या सर्वच जाणकार मंडळींचं एकमत होतं. मागास भागातल्या विकासाची आता एक दिशा ठरत जाणार आहे. त्या मर्यादेतच विकास साधला जाणार आहे. हे कळाहांडीच्याबाबत सतत जाणवत होतं.

## शेतीतूनच विकास शक्य

इथल्या विकासासाठी शेतीचा स्तर उंचावणं हाच एकमेव उपाय आहे. जिल्ह्यात केवळ सहा टक्के जमीन पाण्याखाली आहे. त्यातही ८० टक्के शेतकऱ्याकडे पाच एकरापेक्षा कमी शेती आहे. अशा वेळी जादा उत्पादन किंवा योग्य रोजगार पुरवणार कोठून ? शेतीला पाणीपुरवठा करण्याचं काम या जिल्ह्यात फार सोपं आहे. जिल्हा नियोजन अधिकाऱ्याच्या सांगण्यानुसार इथल्या डोंगराळ भागातून बारामास वाहणाऱ्या नद्या-नाले आहेत वंशधारा, तेल, उदती, संडा, सुंदर, जोंक, राहुल अशा अनेक नद्या आहेत. खेरीज इंद्रावती प्रकल्पाच रखडखडू चाललेल गाडं आहे !

कळाहांडीमध्ये उद्योगाच्या वाढीला मुळीच वाव नाही. एक तर इथं कोणत्याही तऱ्हेचा कच्चा माल, खनिज नाही. बॉक्साईटचे साठे आहेत. मात्र कोरापुट व संबलपूर जिल्ह्यात यापूर्वीच दोन ॲल्युमिनियम कारखाने उभारले आहेत त्यामुळे कळाहांडीत कशाला असा त्या अधिकाऱ्याचा सवाल होता.

म्हणून शेती-विकासातूनच तिथे समृद्धी येईल. रोजगार निर्माण होईल, शेतीशी निगडीत व्यापार, उद्योग व इतर व्यवसाय वाढतील असा त्याचा होरा होता. एखाद्या भागात विकासासाठी जो मार्ग उपलब्ध असेल, त्या मार्गानेच तो साधला जावा. शेती सुधारल्याने विकास होत असेल तर निष्कारण उद्योगाचा का अट्टाहास धरावा असं ते म्हणाले.

इथले जमीन-हवामान व्यवस्था पाहता मोठा भांडवली उद्योग निघू शकेल असं इथं काही नाही. केसिंगा शेजारी सोनपूरच्या सूत गिरणीला दर वर्षी एक कोटीचा तोटा होत आहे. तीच स्थिती इतर छोट्या कारखान्यांची. त्याऐवजी शेतीवर आधारित उद्योग-व्यापार फायदेशीर ठरतो. कॉफी, चहा, रबर उत्पादनाचे प्रयोग यशस्वी झाले आहेत.

## इथिओपिया होईल !

मात्र शेती-विकासाचा प्रश्न हा इथल्या वनराईशी निगडित आहे. सध्याची प्रचंड झाडतोड पाहता, येत्या पाच वर्षात कळाहांडीचा इथिओपिया होईल न होईल. मात्र इथले बारमास झरे-नद्या आटून जातील. इंद्रावती सोडल्यास इतर मोठा प्रकल्प इथं नाही. अशा वेळी या नद्यावर लहान पाटबंधारे बांधणं उपयुक्त आहे

इथल्या वैशिष्ट्यामुळं, घटकामुळं, शेती, पाटबंधारे जंगलांमुळे कळाहांडीचा विकास होईल. उगाच पठिक व्याख्येनुसार परिणामशून्य उद्योगधंदे इथं रजवाड्याच्या फंदात पडू नये, असं नियोजन अधिकाऱ्याचं म्हणणं होतं. मागास भागाच्या विकासाविषयी एक निश्चित सूत्र त्यात होतं. राजकीय-आर्थिक वास्तवानुसार हा विकासाचा मार्ग होता.

पूर्ण ओरिसाच्या संदर्भात कळाहांडीचं काय स्थान आहे. इथलं बळ किती आहे, त्यानुसार त्याला महत्त्व किती द्यायचं ते ठरतं. एखाद्या राजकीय व्यवस्थेत, त्यातल्या घटकाचं स्थान संपूर्ण व्यवस्थेच्या संदर्भात ठरत असतं कळाहांडी, बोलंगी, फूलबानी या मागासलेल्या भागाचा विकास हा केवळ त्या जिल्ह्याच्या दृष्टिकोनातून बघता येत नाही म्हणजे असं की, कळाहांडीत बॉक्साईटचे साठे, कापूस उत्पादन आहे. म्हणून तिथं ते उद्योग काढलेच पाहिजेत का ? तर ओरिसा राज्याचा विचार करता तसे काढून तोटाच होईल. शेजारच्या कोरापुट, संबलपूर जिल्ह्यात असे कारखाने आहेत, पुन्हा कळाहांडीत कशाला ? कळाहांडीच्या विकासाला शेती, पाटबंधारे, जंगल याचाच मार्ग सध्याच्या चौकटीत खुला आहे. या व्यापक राज्यीय संदर्भात कळाहांडीच्या विकासाची दिशाही आपोआपच ठरत जाते.

## विकासाचे ताणेबाणे

आहे त्या स्थितीत, जसं जमवून घेता येईल तसा विकास साधायचा असतो. हा विकास अनेक बाजूंनी, शर्तींनी बांधलेला असतो. हा त्याचा मार्ग हा तडजोडींचा, अनेक वेळा मुळाला मुरड घालण्याचा असतो विकासाची अशी चमत्कारिक ( ऑकवर्ड ) संकल्पना खरं तर अनिष्टच आहे यामुळे आपण 'जैसे थे' वादी शक्तींशी मिळवून घेतो. विकासाच्या क्रांतिवादी, संपूर्ण परिवर्तनवादी कल्पनेला तिलांजली देतो असं वाटेनाही. प्रस्थापित राजकारणाच्या चौकटीत हा विकास साधायचा असतो. कळाहांडीच्या विकासाचा नैसर्गिक मार्ग हाच आहे. शेती, जंगल, पाण्याचे स्त्रोत्र यांच्या विकासातनच तिथला विकास आहे. एकदम क्रांतिकारी विकासाची, नव्या आर्थिक व्यवस्थेची गोष्ट बोलणं ही भारतातल्या बहुसंख्य भागात एक ढोंगबाजी होऊन बसते. प्रस्थापित राजकीय-शासकीय व्यवस्थेमुळे विकासाचा मार्गही कसा अपरिहार्यपणे मर्यादित होत जातो तेही इथं दिसतं.

राज्य-किंवा राष्ट्र यांच्या भाषेत बोलत असताना आर्थिक-राजकीय ताणाबाण्याची वीज नेहमी लक्षात घ्यावी लागते. राजकीय केंद्रीकरण होत असताना, खालच्या लहान विभागाच्या विकासाचे मार्ग हे केंद्रस्थानातल्या विचार प्रवाहावर, प्राधान्यावर अवलंबून असतात भारतातल्या सामाजिक-राजकीय कारणासाठी इथे शक्तीशाली केंद्राचा स्वीकार केला आहे. अशा वेळी विकेंद्रीकरणाचा नारा लावणं म्हणजे एकजिनसी, सर्वंकष पुरोगामी प्रगतीला हानीकारक ठरेल. संतुलन, समता, न्याय हवा असेल तर केंद्र स्थानीची बळकट सत्ताच अपेक्षित असते. त्या सत्तेच्या चौकटीतच स्थानिक विकास साधायचा असतो. विकेंद्रीकरणाचे मार्ग हे राजकीय पातळीवरच सध्या तरी राहू शकतात. साधनाचं, सत्तेचं वाटप करणाऱ्या केंद्र स्थानातल्या ( मग ती ओरिसा सरकार, किंवा दिल्ली सरकार असो ) सत्तेवर प्रभाव पाडून संपत्ती-प्राधान्य खेचायचं असतं.

अशा स्थितीत कळाहांडीसारख्या खाचच्या थरावर विकास खेचून आणण्यासाठी, इथलं समर्थ नेतृत्व उभं राहिलं पाहिजे. ते देखिल इथल्याच साधनसंपत्तीवर. राज्य किंवा केंद्र सरकारमधील सत्ताधान्यावर दबाव टाकेल अशी स्थानिक सत्ताधारी मंडळी निर्माण होणं जरुरीच आहे. केंद्रीकरण-विकेंद्रीकरणाचा प्रश्न फक्त प्रशासकीय कायदा-घटना या पातळीवर मर्यादित नसतो. तो राजकीय डावपेचातून रेटावा लागतो.

इथला Elite बळकट होण्यासाठी शेतीतल्या समृद्धीतून आलेले नेतृत्व पाहिजे ! पुन्हा बिचारं दुष्टचक्र.

ओरिसा राज्यातल्या राजकारणात, अर्थकारणात कितपत महत्त्व आहे त्यावर कळाहांडीचं वजन अवलंबून आहे. तसं पाहता ओरिसा आधीच मागास प्रांत. तो एकजिनसीही नाही. पूर्वीच्या बंगाल, मद्रास प्रेसिडेन्सीतले सुभे एकत्र करून हे राज्य निर्माण केलं कुठलं विशिष्ट ध्रुवीकरण, सत्ताधारी समाज, असं निश्चितीकरण इथं नाही. त्यामुळं इथला विकास-सत्ता गुंतागुंतीचा राहणार फक्त प्रादेशिक असमतोलाची रडकथा इथेही आहे कटक, पुरी, बलसोर, गंजम या चार जिल्ह्यांमधून आर्थिक व राजकीय सत्ता निर्माण होते. पश्चिम महाराष्ट्र-मुंबईची महाराष्ट्रात जी कथा तीच या चार किनारपट्टीवरील जिल्ह्यांची. त्यांच्या तुलनेत पश्चिमेकडचे जिल्हे कमजोर आहेत

राजातल्या राजकीय डाव-प्रतिडावाच्या, दबावगटाच्या राजकारणात कळाहांडीला स्थानच नाही. या जिल्ह्यात एकूण आठ आमदार. कळाहांडी, बोलगीर व फूलबनी जिल्ह्याचे मिळून २१ आमदार आणि एकट्या कटक जिल्ह्यात २८ आमदार आहेत. त्यामुळं कळाहांडीचे लोक प्रतिनिधी नाराज झाले काय किंवा बरोबर राहिले काय, किनारपट्टीवरच्या नेतृत्त्वाला त्याच सोयरसुतक नाही. इफेक्टिव्ह प्रेशर का निर्माण होत नाही त्याचं हे आणखी एक कारण.

स्वातंत्र्यापूर्वी हे संस्थान होतं. नव्हा राज्यात इथले राजेच खासदार झाले. त्यांची मुलंच आमदार आहेत. उदित नारायण प्रताप सिंगदेव हे अजून आमदार आहेत. इथले राजे हे माजी केंद्रीयमंत्री कामाख्यप्रसाद सिंगदेव यांचे सासरे अशी इथल्या राजकारणातील राजे-राजवाड्यांची चलती. त्यांनी नंतर स्वतंत्र पक्षाचं राजकारण चालवलं. हरिजन-आदिवासींच्या मतांचा आधार घेऊन कॉंग्रेसविरोधी फळी उभी केली. राज्यात कॉंग्रेस सत्ताधारी, कळाहांडीत पारंपारिक राजकारणाला विरोध करणारी. असं भारतात सर्वत्र आढळणार संस्थानी राज्यातलं चित्र ओरिसा-कळाहांडीच्या बाबतीतही झालं. कॉंग्रेसनं राजे-नोकरशहा जमीनदार यांच्या विरोधात हरिजन-आदिवासी अल्पसंख्याना आपल्याकडं खेचलं. त्यामुळं राज्याच्या संदर्भात इथल्या हरिजन-आदिवासींचा विरोधी संघर्षात्मक असा आवाजच आला नाही. आदिवासींचं नेतृत्व उभं राहिलं नाही. वर्गाच्या पायावर संघटन झालं नाही, की कुठल्या एका गटाचं सातत्यानं नेतृत्व उभं राहिलं नाही. नेतृत्वाची उणीव हे या भागाच्या मागासलेपणाचं 'गमक' आहे. मातीतून पुढे येणार स्थानिक नेतृत्व नाही.

## चळवळीचा हस्तक्षेप आवश्यक

विकास व नेतृत्व यांचा पूरक संबंध असताना मग इथं विकास कुणी आणायचा ? आहे त्या राजकीय व्यवस्थेतून इथं विकासाचा मार्ग येणं, नेतृत्व तयार होणं कठीण आहे. अशावेळी प्रस्थापित राजकीय (दुष्ट) चक्राच्या बाहेरच्या घटकाचा हस्तक्षेप ( Intervention) आवश्यक ठरतो. तो राजीव गांधींच्या रूपानं ओरिसाबाहेरच्या शक्तीचा असेल किंवा राजकीय चक्राबाहेरच्या एखाद्या आंदोलनाचा चळवळीचा राहील.

राजीव गांधींच्या भेटीच्या रूपानं अधिक लक्ष, अधिक पैसा, गतिमानता येईलही. मात्र केंद्रातली सत्ता ही या भागात स्वतंत्रपणे, स्वतः होऊन, पूर्णपणे काम करणार नाही. ओरिसातल्या प्रस्थापित राजकीय चक्रातूनच इथं विकासाचे प्रयत्न होतील.

विकासासाठी तिथले मूलभूत प्रश्न निश्चित व्हावे लागतात. त्यासाठी कोणाला हवं, कोणाकडून काढायचं याचे निकष तयार व्हावे लागतात

अशा मूलभूत प्रश्नांना सत्ताधाऱ्याच्या हस्तक्षेपातनं उत्तरं नसतात. त्यासाठी गरज असते ती जागृत चळवळीची.

जन आंदोलन, चळवळ याची आवश्यकता ही अगदी व्यावहारिक कारणासाठी असते त्याला रोमँटिक, स्वप्नाळू, ध्येयवादी भाग सोडला तर आंदोलनातून विकासाचे मुद्दे (issues) ठरत जातात. प्रतिद्वंद्वी गट स्पष्ट होतात. हितसंबंधाचं निश्चित स्वरूप प्रकट होतं.

ेयामुळ खरा विकास कोणत्या मार्गानं न्यायचा, कोणाला गरज आहे अशासारखे मुद्दे स्पष्ट होतात.

दुसरं, चळवळीतून राजकीय शक्ती– राजकीय नेतृत्व पुढं येतं. आंदोलन, चळवळीमुळं सख्यात्मक शक्ती दिसते चळवळ करणाऱ्या गटाला Bargaining power (सौदाशक्ती) मिळते. त्यामुळ राजकीय व्यवस्थेवर त्याचा दबाव पडतो, त्याची दखल घेतली जाते. त्या गटातूनच नेतृत्व पुढं येत राहतं. महाराष्ट्रात गेल्या पाच वर्षात शेतकरी संघटनेचा इतिहास किंवा त्यापूर्वी दलित चळवळ पाहिली तर याची प्रचीती येते. आतापर्यंत दुर्लक्षित झालेले पुणे—नाशिक–धुळे, वऱ्हाड, मराठवाड्याचे भाग, धरण, हमी किंमत याचे प्रश्न यांचा राजकीय धोरणावरचा, प्रस्थापित राजकारणातला प्रभाव वाढला आहे. दलित शक्तीचीही तीच गत आहे.

चळवळीत फायदा वगैरे घेऊन येणारा नवा नेतावर्ग (Elite) हा अशा विकासाच्या कामासाठी आपल्या गटाचा प्रभाव वापरू शकतो. नवं नेतृत्व प्रस्थापिताच्या मांडीला मांडी लावून बसलेही आणि त्यातच त्याच सामर्थ्य आहे. तो स्वतःच्या गटाच्या सामर्थ्याविर Dictating terms मध्ये राहू शकतो. प्रस्थापित राजकारणालाही चळवळीने दिशा मिळते.

त्याहूनही जागृती विकासाच्या अपेक्षा–आकांक्षा रुजतात एकदा अशा अपेक्षा रुजल्या की मग सघर्ष, समझोते, सहकार्य अशा विविध मार्गांनं विकास आणता येतो. आपल्याकडे मराठवाडा विकास आंदोलन याचे उदाहरण आहे.

कळाहांडीच्या विकासात सर्वात मोठी धोंड म्हणजे जागृतीचा अभाव त्यामुळं पुढली कोणतीच गोष्ट तिथ नाही. इथला आदिवासी, गरीब शेतकरी काही मागत नाही, मागण्यासाठी एकत्र येत नाही, नच दिल तर ओरडत नाही, आपल बळही दाखवू शकत नाही. सध्याच्या राजकीय व्यवस्थेत प्रत्येक घटक विकासाचा वाटा आपल्याकडे खेचण्याचा प्रयत्न करत असतो. या विकासाच्या, साधनसंपत्तीच्या वाटपाचा निर्णय म्हणजे राजकारण. या निर्णयशक्तीवर दबाव आणण्यात कळाहांडी आजपर्यंत अयशस्वी ठरली. बहुतेक मागास भागातल्याप्रमाणं तिथ सगळंच धूसर, गुंतागुतीचे चित्र आहे. या चित्राला अर्थ देण्यासाठी, स्पष्ट कल्पना पुढे आणण्यासाठी चळवळीचाची, जागृती करणाऱ्याची तिथ आवश्यकता आहे. चळवळ, जाणीव–जागृती ही केवळ अमूर्त गोष्ट नाही. त्यातन काही हातात लागत असल तरच त्याला अर्थ असतो.

कारलापाटच्या घनदाट जगलात साजवण्यापर्यंत रस्त्याची काम चाललेली असतात. साल, सागवान, पलाश, याच्या गर्दीतन ताब्याच्या रगाची, शार्प चेहऱ्याची, चमकदार डोळ्याची उघडी कंधाची पोर–बाया काम करतात. येणाऱ्या–जाणाऱ्या बस–जीपकडे अजूनही कुतूहलानं पाहतात सूर्य डुबायला झाल्यावर उच झाडाच्या मधल्या रस्त्यातन त्याच्या शहरातून परतणाऱ्या बायका खुसुर–पुसुर बोलत पहाडीतल्या झापावर निघून जातात. अधार पोटाशी घेऊन वाहणाऱ्या सगडा, इद्रावती नद्याची सगत घेऊन हीं माणस रोज जगतात अजूनही भेदरलेली काकुळतीन जगणारी. दिवस उजाडल्यावर चोरून–मारून लाकड तोडायच्या शोधात राहतात. आपण कस जगायला पाहिजे ते सागणारे आवाज इथ पाहिजेत; पण माणस येतात ती त्याचा 'अभ्यास' करायला, वनसौंदर्य निरखायला किंवा त्याच्या स्त्रियाचे अर्धवस्त्रातले फोटो काढायला !

कळाहांडीची कळाहीनता आहे ती इथल्या सज्ञाशून्यतेमुळे. उमाशंकर एखाद्या प्रायोगिक सिनेमातल्या नटाला शोभेल असे हात फेकून उपहास, सताप वगैरेंनी म्हणतो,

'सब सोए हुए है यहाँ, सब पोलिटिशियन्स, अफसरलोग, ये आदिवासी, हरजन—और हम इंटेलेक्चुअल कहलानेवाले भी. सब सुस्त पडे है, बस,... ऊपर करके, साले पडे है।' □

# राज्य ' कंपनी सरकारचे '

प्रि. खं. कुलकर्णी

**प्र**त्येकाला कधी ना कधी असा अनुभव आलेला असतो. एक विशिष्ट प्रकारच्या घटना पाठोपाठ घडतात आणि 'इजा बिजा तिजा' हा समज सार्थ ठरतो. 'कंपनी' या शब्दाने माझा असाच पाठपुरावा केला. आपले आयुष्य जास्त सुखी करण्यासाठी, दूरदर्शनवर अनेक योजना नेहमीच सांगितल्या जातात. त्यापैकी एक प्रथम कानावरून गेली. टेलिफोनच्या वागण्याचा अनुभव सर्वांना आहेच. ती व्यवस्था सुधारण्यासाठी असे घोषित झाले की मुंबई आणि दुसऱ्या कोठल्या तरी शहरासाठी टेलिफोन व्यवस्था एका कंपनीकडे देण्याचा सरकारचा इरादा आहे. त्यानंतर एक-दोन दिवसातच पुण्यातील कॉर्पोरेशनच्या एका उद्यानावर 'व्यवस्थापन कंपनीकडे' अशी पाटी अंधुक उजेडात पाहिली. या दोन पाठोपाठच्या घटनानी 'कंपनी' या शब्दात काय जादू आहे हा विचार मनात घोळत राहिला. खरे तर हा शब्द आपला नव्हे. मग आम्हाला याविषयी आकर्षण व आदर का? असे काही उलट सुलट विचार डोक्यात घोळत राहिले. त्यानतर लगेच रविवारी सत्यजित रे याचा 'शतरंज के खिलाडी' हा चित्रपट दूरदर्शनवर पाहिला. नवाब आणि कंपनी या द्वंद्वात कंपनी कंपनी सरकारने जी सहज मात केली ती पाहिली आणि कंपनी या शब्दाच्या आदराचे मूळ कोठे आहे याचा उमज पडला.

पण या शब्दाने, पाठ सोडली नाही. त्यानतर सकाळ चाळता चाळता 'घाशीराम कोतवाल' नाटकाची जाहिरात नजरेखालून गेली. शाळेत असताना आमच्या इतिहासाच्या सरानी, 'नाना फडणीस यानी कंपनी सरकारच्या मालकमसाहेबाची अनेक कारस्थाने कशी खुबीने मोडून काढली त्याचे केलेले रसभरित वर्णन आठवले. दोन पिढ्यात आपले पुनर्मूल्यमापन नवीन पद्धतीने झालेले पाहून नानाच्या आत्म्याला काय वाटले असेल हा विचारही मनात तरळून गेला आणि हे सर्व चमत्कारिक मिश्रण मनात घोळत राहिले.

थोरल्या माधवरावाचा अत्यसमय, त्या समयीचे त्याचे विचार, व्यथा याचे हृद्य चित्रण अनेक समर्थ लेखकानी केले आहे. घाशीराम कोतवाल रगभूमीवर रगल्यानतर नानाच्या शेवटच्या क्षणाच्या विचाराना

स्पर्श करायला कोण लेखक मिळणार? नानाची ती अतृप्त इच्छाच जणू माझ्या स्वप्नसृष्टीला कारणीभूत झाली. दुसऱ्या बाजीरावाच्या कैदेत. मृत्युशय्येवर ते मला दिसले. अनेक वर्षे एकांतवास घडला असावा कारण मला पाहून त्याच्या चेहऱ्यावर स्मिताची रेषा उमटली. त्यांनी खुणेनेच मला जवळ बोलवून घेतले. काही क्षण तसेच गेले. नानाच खोल स्वरात बोलू लागले.

"ऐक, माझे अखेरचे शब्द, अखेरच्या व्यथा. माझ्या डोळ्यासमोर तरळत आहे ते *अंधुक भविष्य. थोरल्या महाराजानी* लावलेले हे स्वराज्याचे रोप थोरल्या बाजीराव श्रीमंतानी वाढविले. आसेतु हिमाचल, हा हिंदवी देश पुनः एक व्हावा हे दोघांचे स्वप्न साध्य झाले नाही हे बीज तरी जिवंत राहावे यासाठी आटोकाट प्रयत्न मी माझ्या शक्तीप्रमाणे केला. पण श्री गजाननाची इच्छा वेगळीच दिसते. ही दौलत बाजीरावाच्या हातात गेल्यानंतर मराठेशाहीचे काय होणार हे दिसतेच आहे मला. मला बेचैन करतो आहे तो दुसरा विचार. आसेतु हिमाचल एक हिंदवी राज्य तर राहूद्याच पण हे सर्व सरदार दरकदार या देशाचे असंख्य तुकडे तर करणार नाहीत ना! हाच विचार मला शेवटच्या क्षणी चैन पडू देत नाही. पण माझ्या दृष्टीला एकच आशा दिसते आहे. ती म्हणजे गोऱ्या साहेबाची कानी. धाकट्या बाजीरावाचा या कंपनीपुढे पाड लागणार नाही. हिंदवी स्वराज्य म्हणून नसला तरी हा देश कंपनी सरकारच्या एकछत्री अमलाखाली येईल. यातूनच पुढे काही चागले निपेल एवढीच आशा मला अंतकाळी दिसत आहे.' *नानासारख्या स्वराज्याच्या* धुरिणालासुद्धा कंपनी व्यवस्थापनाचे महत्त्व जाणवले, तर हा विचार चमकून गेला आणि अर्धवट जागृतीचा आणि स्वप्नाचा दुसरा भाग सुरू झाला.

न चि. केळकरानी हा प्रसंग एका कथेत रंगवला आहे. चौथ्या शतकात, इंग्लड हे रोमच्या साम्राज्याने जिंकिले होते. रोमन साम्राज्यावरच परचक्र आले म्हणून, रोमन सैन्य, इंग्लड सोडून परत गेले. केळकराच्या कथेप्रमाणे ब्रिटिश गोरे हिंदुस्तान सोडून तसेच एक दिवशी मायदेशी परतले. नानांच्या स्वप्नाप्रमाणे खरोखरच आसेतु हिमाचल प्रदेश कंपनी सरकारने एकत्र आणला. तो आपल्या स्वाधीन करून, ब्रिटिश गोरे साहेब बोटी भरून परत जात आहेत असे कथेतील दृष्य तरळले. असाही चमत्कारिक विचार चमकला; समजा हिंदुस्थानचा कारभार ब्रिटिश पार्लमेंटने आपल्याकडे घेण्याऐवजी कंपनी सरकारकडेच राहू दिला असता तर हिंदुस्तान असा सोडावा लागला असता का?

हा कालखंड संपला आणि देशाचा राज्यकारभार *आपण पाहू लागलो.* कंपनी व्यवस्थापनाचे महत्त्व न ओळखलेल्या आपल्या राज्यकर्त्यांनी देशाचे छोटे छोटे तुकडे हरवायला सुरुवात केली. 'काठीला सोने बांधून खुशाल जावे' हा लोकांचा जुना विश्वास जाऊन, गळ्यातील मंगळसूत्र सुद्धा गमावण्याचा काळ आला.

आपल्या हाती राज्यकारभार आल्यानंतर कोठे चुकले हे चाळीस वर्षानंतर आपल्या ध्यानात येत आहे ही सुदैवाची गोष्ट आहे. ब्रिटिश राज्यकर्त्यांवर एकच जबाबदारी होती. ती म्हणजे देशाचा कारभार सुव्यवस्थित ठेवणे सर्व प्रांताला एक गोरा गव्हर्नर व जिल्ह्यागणिक एक गोरा कलेक्टर इतक्या माफक सरंजामावर देशाचा राज्यकारभार सुरळीत राखला होता. आपल्या राज्यकर्त्यांना दोन वेगळ्या प्रकारच्या जबाबदाऱ्याना तोड द्यावे लागते. लोकभिमुखता यासाठी सभा, समेलने, कोनशिला समारंभ, विवाहसमारंभ या सर्वांना उपस्थिती. हा जनता संपर्क पुढील निवडणुकीसाठी आवश्यकच असतो. प्रत्यक्ष कारभार चालवणे म्हणजे बैठक मारून फाइली पाहणे, कामकाज व्यवस्थित होते का हे पाहणे इ. या दुहेरी *जबाबदारीमुळे राज्य*कर्त्यांवर खूपच ताण पडतो व राज्यकारभाराचे व्यवस्थापन नीट होत नाही अशी जनतेची तक्रार वारंवार ऐकावी लागते.

मनात घोळत असलेल्या समस्यांवर स्वप्नातून एखादा उपाय सुचतो तसे काहीसे झाले. देशाच्या कारभाराचे दोन भाग पाडले तर! राज्यकारभाराचा जो कटकटीचा भाग म्हणजे दररोज वेळेवर उपस्थिती, फाईली पाहणे, एकंदर कामाचा निपटा यासाठी जे व्यवस्थापन लागते ते देशातील निरनिराळ्या नामवंत कंपन्यांकडे सोपवावे. यामुळे निवडून आलेल्या राज्यकर्त्यांना स्वतःची प्रतिमा सांभाळण्यासाठी लागणाऱ्या सर्व कार्यक्रमांना पूर्ण वेळ देता येईल. आता देशी कंपनीकडे व्यवस्थापनाचे काम आले की ती कंपनी एखादा परदेशी 'मल्टिनॅशनलचे' कोलॅबोरेशन घेणारच. जशी हाय टेक्नालॉजी आपण मुक्तपणे परदेशातून आणतो तसे राज्यकारभार करण्याचे तंत्र आणण्यात काय चूक आहे? आता आपण महाराष्ट्रापुरतेच पाहिले तर अधिकउणे ३० जिल्ह्यांसाठी ६०–७० परदेशी व्यवस्थापक लागतील. कारण एवढ्याच गोऱ्या ब्रिटिशांनी आपला कारभार तदुरुस्त राखला होता.

तेव्हा ही कंपनी व्यवस्थापनाची जी किमया आपल्याला सापडत आहे त्याचा व्यापक उपयोग सर्व देशाचा कारभार चालविण्यासाठी जर केला तर आपले अनेक प्रश्न चुटकीसारखे सुटतील. हे सर्व विचार क्षणार्धात येऊन गेले आणि जे दिसले ते केळकरानी रंगविलेल्या दृश्याच्या उलट. ब्रिटिश गोरे साहेब जहाजातून गेले ते काही परतले नाहीत. हिंदुस्थान सोडल्यापासून त्यांची जागतिक पत फारच खाली गेली. आता आता विमानातून उतरताना दिसले ते पिवळे साहेब. हिंदी *व्यवस्थान कंपन्यांचे* 'फोरेन कोलॅबोरेटर' म्हणून

आणि हे विलक्षण स्वप्न संपले या स्वप्नमालिकेतून आपल्या अनेक प्रश्नांचे संपूर्ण निराकरण झाले असेच मला वाटले. काही कुशंकेखोर म्हणतील की यामुळे आपल्या देशाच्या स्वातंत्र्याचा संकोच होतो तसे मुळीच नाही. हे लोक येतील ते आपले पाहुणे नोकर म्हणून. राज्यकर्त्यांची कटकटीची कामे सांभाळण्यासाठीच. यामुळे खालीलप्रमाणे तिहेरी फायदे होतील.

राज्यकर्त्यांना प्रतिमा निर्माण करण्याच्या कार्यक्रमांना पूर्ण वेळ देता येईल. सरकारी नोकर हे कंपनीचे अधिकारी होतील व व्यवस्थापनासाठी आवश्यक असलेल्या फोरेन गाड्या व पंचतारांकित हॉटेल यांचा मुक्तपणे वापर करता येतील या सुधारणातून जनतेची काही गाऱ्हाणी शिल्लक राहिलीच तर त्यांचे पाप राज्यकर्त्यांना चिकटणार नाही. फोरेन कोलॅबोरेशन बदलले म्हणजे झाले.

तेव्हा आणखी कोणत्या सरकारी खात्याचे कंपनीकरण होते हे आपण यापुढे उत्कंठेने दूरदर्शनवर पाहूया. □

पुस्तके

भक्तिमान अंतःकरणाने लिहिलेला एक नवा चरित्र ग्रंथ

# राम गणेश गडकरी

म. श्री. दीक्षित

कै. राम गणेश गडकरी यांचं प्रत्यक्ष चौतीस वर्षांचं जीवन जितकं शोकात्म, तितकंच त्यांचं मरणोत्तर वाङ्मयीन जीवन भाग्यशाली म्हटलं पाहिजे. कै. गडकरी यांची जन्मशताब्दी महाराष्ट्रात शासकीय आणि बिनशासकीय पातळीवर नुकतीच अनेक ठिकाणी दिमखाने साजरी झाली. तीही त्यांच्या विद्यमान वृद्ध द्वितीय पत्नी रमाबाई यांच्या साक्षीने आणि त्यांच्या यथोचित सत्काराने. २६ मे १८८५ रोजी गुजरातेत नवसारी येथे जन्मलेले गडकरी, विदर्भात सावनेर येथे आपल्या थोरल्या वकील बंधूंच्या घरी २३ जानेवारी १९१९ रोजी वारले. पुण्याच्या वास्तव्यात त्यांना क्षयरोगाने पछाडले होते व अखेर हेच दुखणे विकोपाला जाऊन महाराष्ट्राच्या या श्रेष्ठ नाटककाराचा, प्रमत्त प्रेमकवीचा आणि थोर विनोदी लेखकाचा अंत झाला.

कै. गडकऱ्यांची वाङ्मयीन कीर्ती नि लोकप्रियता गेल्या साठ–पासष्ट वर्षात एकसारखी इतकी वाढत गेली आहे की, त्यांच्या वाङ्मयीन अवताराविषयी आता नव्याने लिहिण्याबोलण्यासारखं महत्त्वाचं काही उरलेलं नाही. किर्लोस्कर, देवल, खाडिलकर, कोल्हटकर या नाटककारांसंबंधी किंवा केशवसुत, बालकवी, तांबे या कवींविषयी जेवढं लिहिलं गेलं नाही तेवढं, किंबहुना अधिकच. गडकऱ्यांसंबंधी लिहिलं गेलं आहे. फरक एवढाच की, वरील सर्वांपेक्षा गडकऱ्यांचं व्यक्तीजीवन वेगळं, विचित्र, किंबहुना दुर्दैवी होतं. शोकांतिकेत जमा होणाऱ्या त्यांच्या जीवनातील काही वादस्थळं अद्यापही सतत चर्चाविषय होऊन बसली आहेत.

गडकऱ्यांच्या जीवनातील आजवरच्या उदंड प्रकाशित साहित्यावरून काही महत्त्वाची वादस्थळं पुढीलप्रमाणे सांगता येतातः- गडकरी नेमके जन्मले कुठे ? त्यांचा खरोखरीच प्रेमभंग झाला होता काय ? असल्यास का ? त्यांच्या प्रेयसी कोण ? त्या एक, दोन की अनेक ? त्यांच्या कवितेतून आणि नाटकांमधून त्यांचं व्यक्तिगत जीवन कितपत प्रतिबिंबित होतं ? नट, नाटककार, मित्र, आप्त आणि नाटककंपन्या यांच्याशी त्यांचे संबंध कसे होते ? त्यांची आर्थिक स्थिती, व्यसनाधीनता, वैवाहिक जीवन, लैंगिक विकृती, गुरुशिष्यसंबंध इत्यादींसंबंधी काही साधार ठामपणे सांगता येतं का ? गडकऱ्यांसंबंधी आजवर जे जे लिहिलं गेलं आहे त्यात सत्यासत्यता किती ?

वास्तविक या वादळस्थळांचा गंभीरपणे विचार करावा इतकी विवाद्यता त्या वादस्थळांत राहिली आहे का हा सुद्धा एक वादाचा प्रश्न होऊ शकेल. कारण या वादस्थळांसंबंधीच्या उलटसुलट बाजूंची अनेक लेखकांनी आपापल्या लेखांमधून नि ग्रंथांमधून अगदी पाखडून पाखडून चर्चा केलेली आहे व आपापल्या परी निष्कर्ष काढून ठेवले आहेत. पण तरीही गडकरी या विषयाची मोहिनी मराठी रसिकांना अद्यापी इतकी आहे की, त्या त्या वादस्थळांचा वा विषयांचा पिच्छा पुरविण्याचा मोह अनेकांना अधूनमधून होत राहतो, आणि काही तरी नव्याने सांगून गडकऱ्यांविषयीचा आपल्या मनीचा उत्कट भक्तिभाव व्यक्त केल्यावाचून त्यांना राहवत नाही. पत्रपंडित श्री. माधव गडकरी यांचा 'राम गणेश गडकरी' हा नवा ग्रंथ म्हणजे एकापरी राम गणेश नामक मूर्तीच्या जडणघडणीचं घासूनपुसून घडविलेलं नवं दर्शन आहे.

## चिकित्सेची जोड

ग्रंथारंभीच्या 'मनोगता'त माधवरावांनी आपल्या नव्या गडकरी चरित्राचे स्वरूप नि मर्यादा स्पष्ट केल्या आहेत. गडकऱ्यांचे व्यक्तीविषयक चरित्रच त्यांना या ग्रंथात मुख्यतः अभिप्रेत आहे. 'साहित्यसमीक्षेचा विषय पूर्णपणे बाजूला ठेवला आहे, कारण एकीकडे ती भरपूर झालेली आहे, अजूनही चालू आहे' असं त्यांनी मोकळेपणे सांगून टाकल्यामुळे वाङ्मयसमीक्षेच्या अंगाने त्यांच्या या ग्रंथाची आलोचना करण्याचे फारसे कारण उरत नाही. गडकऱ्यांना 'प्रतिभासम्राट, शेक्सपियर' अशी विशेषणे अधूनमधून लावण्यास मात्र लेखक विसरत नाही आणि याचं कारण उघड आहे. थोरल्या गडकऱ्यांविषयी या धाकट्या गडकऱ्यांचे मनी विलक्षण भक्तिभाव आहे व तो पुष्कळसा डोळस आहे. गडकरी शताब्दीचा वर्षभर जो सोहळा साजरा झाला त्याचे सर्वाधिक श्रेय माधवरावांना द्यावे लागेल. चरित्रात वाङ्मयीन समीक्षा केलेली नाही असं जरी माधवरावांनी म्हटलं असलं तरी गडकऱ्यांची प्रेमकविता आणि नाटके यामधून भरपूर बुचकळ्या मारून त्यांनी चरित्रनायकाच्या भावजीवनाचा शोध घेण्याचा यत्न केला आहे. प्रस्तुत चरित्र त्यांचे मनी अनेक वर्षे घोळत होते. ते लिहिण्यासाठी त्यांनी केलेली भ्रमंती, संबंधितांच्या घेतलेल्या गाठीभेटी आणि केलेलं अफाट वाचन ही सर्व कौतुकास्पद कामगिरी आहे. उदंड परिश्रम आणि चरित्रविषयाशी तादात्म्यता हे दोन गुण प्रस्तुत ग्रंथाच्या प्रत्येक प्रकरणातून जाणवतात. कै. गडकरी यांच्या संबंधीची निवडक छायाचित्रे, चरित्रपट, संदर्भात्मक साहित्याच्या विस्तृत सूच्या, नामसूची इत्यादी पूरक मजकुराची जोड दिल्यामुळे या ग्रंथाला एखाद्या शोधप्रबंधाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. या ग्रंथात राम गणेशांच्या व्यक्तीजीवनाच्या विविध अंगांचे केवळ वास्तव दर्शन घडत नाही, तर ते होत असताना पूर्वसूरींच्या लेखनाची रोचक चिकित्साही

वाचायला मिळते. थोडक्यात, वर्णनात्मक आणि विवेचनात्मक असे दुहेरी रूप या चरित्रग्रंथाला आलेल आहे आणि म्हणूनच चोखदळ वाचकाच्या दृष्टीने तो वाचनीय उतरला आहे. आचार्य अत्रे, वि. स. खांडेकर आणि डॉ. रा. श वाळिंबे या तीन व्यासंगी गडकरी भक्ताच्या 'अर्पण पत्रिके' द्वारे माधवरावानी ऋणानिर्देश केला हेही औचित्याला धरून झाले.

ग्रंथाची एकूण सोळा प्रकरणे असून त्यात गडकऱ्यांच्या जन्मस्थलापासून मरणोत्तर प्रदीर्घ काळात घडलेल्या अनेक भाग्यकारक घटनांची अभ्यासपूर्ण चर्चा केलेली आहे. गडकऱ्यांचं व्यक्तिगत भावजीवन, सासारिक जीवन आणि वाङ्मयीन जीवन—या तिन्हीच वर्णन करून काही ठाम निष्कर्षाप्रत येऊन ठेवण्याचा या ग्रथात लेखकाचा प्रामाणिक नि परिश्रमपूर्वक यत्न दिसतो. गडकऱ्यांचा जन्म गुजरातेतील नवसारीचा, गणदेवीचा नव्हे, हे लेखकाने घासूनपुसून बनविलेले मत आता सर्वमान्य होण्यासारखे आहे. मात्र त्यासाठी *'टेलदास म्हणजे तात्या टोपे' असल्या एका* भाकडकथेचा आधार देण्याची मुळीच आवश्यकता नव्हती. तात्या टोपेची अखेरची अधिकृत हकिकत डॉ. सेनकृत १८५७ या ग्रंथावरून किंवा प्रस्तुत लेखकाच्या 'तात्या टोपे' या चरित्राधारे माधवरावांना सहज कळण्याजोगी होती.

'पुण्यनगरीतील गडकरी, १३६ कसबा, पुणे; सीताबाई आणि रमाबाई, काव्य नाटकातून दिसणारे गडकरी, नाते गुरुशिष्याचे आणि सावनेरची अखेर' अशी काही प्रकरणे अत्यंत वाचनीय उतरली आहेत. जाणकार मराठी वाचकांना गडकऱ्यांचे सारे चरित्र माहीत असल्यामुळे या प्रकरणाचा इथे तपशिल देण्यात फारसे स्वारस्य नाही. गडकऱ्यांच्या दोघी बायकांची सहानुभूतीपूर्वक लिहिलेली तपशिलवार करूणकथा खरोखरी हृदयस्पर्शी आहे. पृष्ठ १७१ वरील राम गणेशाच्या अखेरच्या सावनेर प्रवासाची हकिकत *वाचताना डोळे पाणवतात.* भाषाशैलीचे दृष्टीने हे सारेच प्रकरण सरस उतरले आहे. याच प्रकरणात लेखकाने गडकऱ्यांच्या दोघा बंधूच्या नि आप्तांच्या वर्तनाविषयी जी धारदार तळमळीची टीका केली आहे ती चटका लावून जाते. श्रीपाद कृष्णाचे मनी आपले शिष्य गडकरी यांचे विषयी सुप्त मत्सर होता, या ग्रंथकाराच्या निष्कर्षात पुष्कळ तथ्य आहे. असे काही गुरू–शिष्य पूर्वी होते, आजही काही आहेत. साहित्यक्षेत्रात मत्सर हा रोग सनातन आहे. या चरित्राचे आणखी एक वैशिष्ट्य असे की, गडकऱ्यांचे मद्यपान, विडीचे व्यसन, समलिंगी सभोगाची सवय इत्यादी प्रश्नांचीही त्यात निर्भीड, पण संयत चर्चा केलेली आढळते.

## निराधार प्रेमप्रकरण

राम गणेशाचे संपूर्ण, सविस्तर आणि साधार चर्चात्मक चरित्र लिहिल्याबद्दल माधवरावांचे अभिनंदन करताना त्यांच्या या ग्रंथातील एका निराधार आणि अभिरूची सुटलेल्या एका हकिकतीविषयी मात्र थोडे विस्ताराने लिहिले पाहिजे.

ही नव्याने उकरून काढलेली हकिकत म्हणजे गडकऱ्यांच्या दुसऱ्या प्रेयसीविषयी, म्हणजेच सागलीच्या दिवंगत राणी सरस्वतीबाई *यांच्यासबंधीची. प्रेयसी या नात्याने* या राणीसाहेबांचे पानभर चित्रही ग्रंथात दिलेले आहे. आश्चर्य असे की गडकरी आणि सरस्वतीबाई (सर मोरोपंत जोशी यांच्या द्वि. कन्या कमलाबाई) यांच्यातील प्रेमाचे या ग्रंथात ज्या ज्या ठिकाणी चर्वण केले गेले आहे ते निराधार आहे असे खुद्द ग्रंथकारच पाचसात वेळा तरी लिहितो आणि उभयताचे सबंध जुळवणारा पुरावा म्हणून मात्र माडखोलकर, वरेरकर आणि गुर्जर यांच्याकडून तिसऱ्याच एका व्यक्तीने ऐकलेल्या उद्गाराचा पुरावा उद्धृत करतो प्रियकर—प्रेयसी म्हणून संबोधावे असे गडकरी आणि कमलाबाई यांचे संबंध होते काय? याला ऐकीव (?) पुराव्याखेरीज कसलाही पुरावा नाही.

सर मोरोपंत जोशी यांचे चरित्र आणि आठवणी ग्रथित करणारा एक अधिकृत संपादित ग्रंथ (स–हिंगवे, १९४०) उपलब्ध आहे. त्यात मोरोपंतांच्या सर्व पुत्रांची आणि कन्यांची जीवनचरित्रे तारीखवार दिलेली आहेत. त्यातील कमलाबाईंचा फर्गसन *कॉलेजतील दीड-दोन वर्षांचा काळ आणि* त्यांच्यानंतर विवाह—या दोन घटनांचा गडकऱ्यांच्या तत्कालीन जीवनाशी कसलाच ताळमेळ बसत नाही. टिळक युगात एखाद्या देखण्या, श्रीमंत, उच्चवर्णीय सुशिक्षित स्त्रीवर गडकऱ्यांसारख्या एखाद्या उदयोन्मुख गरीब कवीने वा नाटककाराने एकतर्फी प्रेम केले असण्याची शक्यता आहे. पण अशा एकतर्फी प्रेमातील प्रेयसीचं छायाचित्र देऊन त्याच्या काल्पनिक वा काव्यात्म प्रेमाची चरित्रकारानी चर्वणा करायची म्हटले तर प्रत्येक चरित्रात अशी प्रेमपुराणे लिहिता येतील. मला वाटते की, उत्कट प्रेमकविता लिहिण्यास प्रत्यक्षात प्रेम करावेच लागते असल्या भाबड्या कल्पनेला बळी पडल्यामुळे माधवरावांचे हातून या निराधार प्रेमप्रकरणाची कथा अकारण लिहिली गेली असावी. कमलाबाई जोशीवर प्रेमाचा वर्षाव करून तिच्या प्राप्तीची आकांक्षा बाळगण्याइतके १९१० मधील अप्रसिद्ध, त्यातून/ पहिल्या बायकोने टाकलेले गडकरी भाबडे असतील काय ? हाही विचार करायला हवा. त्यातून माडखोलकर–वरेरकर यांच्या सवयी ज्यांना ज्ञात आहेत ते तरी असल्या प्रीतीच्या हट*योगावर विश्वास ठेवणार नाहीत. असो, या* प्रकरणासबंधी तपशिलाने पुष्कळ लिहिता येईल; पण जे मुळातच निराधार त्यासबंधी अधिक लिहिणे सद्भिरुचीला सोडून होईल. अगदी अलीकडे भीमराव कुलकर्णी यांनी महा. टाइम्समध्ये या दुसऱ्या प्रेमासबंधी लिहिणाऱ्यांचा चांगला समाचार घेतला आहे.

प्रस्तुत चटकदार, वाचनीय अशा अभ्यासपूर्ण चरित्रात शेवटी जी संदर्भसूची आणि नामसूची दिलेली आहे तीत कालानुक्रम आणि वर्णानुक्रम नीट पाळलेला नाही. संदर्भसूचीत काही महत्त्वाचे लेखन वगळले गेले आहे. उदा. 'माझी भूमिका' (बोडस) यांच्या पुस्तकाचा उल्लेख नाही. निवडक छायाचित्रात त्यांचे चित्र देणे आवश्यक होते. हिराबाई पेडणेकर आणि त्यांचे पती (?) नेने या उभयतांचे चित्र छापण्याची आवश्यकता होती का ? कै पा. दा. गुणे यांच्या मा. मनोरंजनातील (१९१५) 'प्रेमसंन्यास' वरील विस्तृत परीक्षण लेखाचा उल्लेख नाही. फेब्रुवारी १९१७ च्या मनोरंजनात ना. के. बेहेरे यांची 'गोविंदाग्रजास' ही एक दीर्घ कविता प्रसिद्ध झाली होती व आश्चर्य म्हणजे तीत गडकऱ्यांना जडलेल्या-

व्याधीचाही उल्लेख आहे. सूचीकाराच्या नजरेतून ही कविता सुटायला नको होती. माहितीच्या काही चुका दर्शविणेही प्राप्त आहे. पृ. ४१ 'ज्या न्यू. इ. स्कूलमध्ये...ती टिळक संस्थापित शाळा १० वर्षांची झाली होती' ऐवजी '२० वर्षांची' झाली होती असे हवे. पुढे 'केसरी वृत्तपत्राचे वय ९ वर्षांचे झाले' तिथे १९ हवे. पृ. ४२ वर वसतव्याख्यानमाला १८८० मध्ये सुरू झाली. असे विधान आहे. माला १८७५ साली सुरू झाली आहे. असो. अशा किरकोळ चुका वा उणिवा दर्शवून प्रस्तुत चरित्रग्रथाचे अवमूल्यन करण्याचा सुतराम हेतू नाही. गडकरीलिखित समग्र गद्यपद्यात्मक वाङ्मयाचे आणि त्यांचेसबधी लिहिलेल्या गेलेल्या प्रचड साहित्याचे आलोचन करून माधव गडकरी यानी राम गणेशाचे जे नवे करुणगंभीर दर्शन भक्तिमान अत.करणाने घडविले आहे ते गडकरी शताब्दी सोहळा सपल्याची जणू भैरवीच म्हटली पाहिजे.

¤

राम गणेश गडकरी
ले. माधव गडकरी,
श्री विद्या प्रकाशन, पुणे ३०.
पृ. डेमी : ३४३, मूल्य ८५ रु.

# शरद जोशी

## विचारांची ओळख

सर्व प्रश्नाची उत्तरे देणारा 'सर्वव्यापी कार्यक्रम' लोकापुढे ठेवणे हे सध्या राजकीय पक्षाना अपरिहार्यच वाटू लागले.आहे. आरोग्यासारख्या प्रश्नापासून ते आतरराष्ट्रीय समस्यांपर्यंत सर्व विषयामध्ये राजकीय पक्षाचा सचार असतो आणि त्यातून अर्थातच हे लोक मताचे-सत्ताकारणाचे गणित माडत असतात· पण हे फक्त पक्षांच्याच बाबतीत होते असे नाही, समाजाचे पुढारीपण स्वीकारायचे तर एक सर्वंकष विचारधारा लोकापुढे ठेवली पाहिजे असेच स्वातंत्र्य पूर्वकाळातही नेत्याना वाटत राहिले आहे.

स्वातंत्र्य चळवळीचे ज्यांना अग्रेसर पुढारी म्हटले जाते त्या गांधीजीनी मानवी जीवनाच्या सर्व पैलूवर, वैयक्तिक आणि सामाजिक जीवनावर आपले विचार माडले मग ते ग्राम स्वराज्याबद्दलचे विचार असतील, साध्या राहणीबाबतचे असतील किंवा औद्योगिकरणावरचे असतील. नेहरू तर बोलूनचालून राजकीय नेतेच होते. परतु अशा विचारधारेमुळे वास्तवाचे अधिष्ठान सुटण्याचीच जास्त शक्यता असते सर्व समस्याचा वेध घेण्याच्या प्रयत्नात कुठल्याच प्रश्नाबाबत प्रत्यक्षात काहीच हाती लागत नाही. निदान स्वातत्र्यपूर्व काळातील नेत्यानी विविध विचार माडून राजकीय सामाजिक जागृतीचे काम तरी केले. पण सध्या पुढाऱ्याचे पेवच फुटले आहे गोलमोल बोलणाऱ्या आणि भरमसाठ 'कलमे' लोकांपुढे ठेवून जनतेला फसविणाऱ्याचीच आज चलती आहे. कोणत्याही विषयावर तर्कशुद्ध भूमिका माडण्याची त्याची छाती नसतेच पण लोकहिताची भाषा करणारेसुद्धा लोकहितापेक्षा लोकप्रिय (Popular) धोरणाच्याच जास्त पाठीमागे असतात

'मी सर्व प्रश्नाची सर्व उत्तरे सागणार नाही' असे सागणारा नेता एखादाच असतो. पण अशाच नेत्याकडून सामाजिक जीवनात निश्चित असे योगदान मिळत असते. महाराष्ट्रात शेतकरी चळवळ सघटित करू पाहणारे शरद जोशी ह्या सदरात मोडतात. एखाद्या प्रश्नाचे सम्यक आकलन करून घेणे आणि ते प्रभावीपणे लोकापुढे माडणे हे शरद जोशीसारखेच नेते करू शकतात, त्यामुळे अशा नेत्याचे विचार व्यापक प्रमाणात लोकापर्यंत पोहोचवणे आवश्यक ठरते. शरद जोशी याचे तत्त्वज्ञान, शेतकऱ्याचे सघटन करण्याची भूमिका आणि त्यातून दिसणारे त्याचे वेगळेपण अरविंद वामन कुलकर्णी यानी एका छोटया पुस्तिकेद्वारे वाचकासमोर ठेवले आहे.

जोशीचे वेगळेपण ठसविण्यासाठीच म्हणून की काय 'भारतीय अर्थवादाचा क्रियाशील जनक' असे नाव लेखकाने पुस्तकास दिले आहे. 'शेतमालाला योग्य भाव देण्यातूनच या देशातील दारिद्रय नष्ट होऊ शकेल' हे विचारसूत्र जोशी आग्रहाने माडत आहेत. त्यामुळेच शेतीमालाला उत्पादनखर्चानुसार रास्तभाव मिळविण्याच्या आर्थिक ध्येयातून शेतकरी सघटनेची त्यानी स्थापना केली.

शरद जोशीची मागणी नेमक्या कशा स्वरूपाची आहे आणि त्यामागे कोणते आर्थिक तत्त्वज्ञान आहे हे लेखकाने अत्यंत सोप्या भाषेत पुस्तकात माडले आहे ते करताना श्री जोशीच्या विविध ठिकाणच्या भाषणामधील आणि लेखातील उतारे त्यांनी समर्पकरीत्या उद्धृत केले आहेत. भारतीय दारिद्रयाचा प्रश्न शेतीमालाच्या रास्त भावाशी कसा निगडित आहे? या महत्त्वाच्या प्रश्नावर जोशीनी दिलेले उत्तर या पुस्तकात आले आहे. ते म्हणतात, 'शेतीमालाला भाव मिळाल्यामुळे शेती हा व्यवसाय म्हणून किफायतशीर होतो. शेतमजुराला योग्य ते राहणीमान मिळू शकते, दीर्घकाळात भारतात ग्रामीण भागाला योग्य अशा तऱ्हेचे औद्योगिकरण होईल आणि 'इडिया' मध्ये निर्माण करण्यात आलेल्या औद्योगिक सत्तेची उत्पादनक्षमता आणि कार्यक्षमता वाढावी अशा तऱ्हेची मागणी ग्रामीण भागात तयार होईल.'

आर्थिक सद्यस्थितीचे जोशीनी केलेले विश्लेषण भारतातील दारिद्र्याच्या प्रश्नाचा नेमका वेध घेणारे आहे असे लेखकाला वाटते. त्याच्या सघटनेने माडलेल्या नव्या विचाराबद्दल जे खडन–मडन झाले त्यातूनच त्या विचारांचा सैद्धान्तिक कस अधिक तावून सुलाखून निघाला आहे, तो विचार अधिक स्पष्ट झाला आहे म्हणूनच हे वादविवादही या पुस्तकात मुद्दाम देण्यात आले आहेत. एन. डी. पाटील, चारुदत्त अच्युत दाभोलकर (महाराष्ट्रातील 'दुष्काळ व त्यावरील उपाय योजना' ग्रंथाचे लेखक) डॉ. वि. म. दाडेकर याचे विचार इथे या सदर्भात उल्लेखिले आहेत या तिघाचेही शरद जोशीशी काही मुद्याबाबत एकमत तर काही मुद्याबाबत मतभेद आहेत, या विचारवतांनी केलेली टीका काय किंवा 'शहरी ग्राहकांच्या जीवावर उठलेला श्रीमत शेतकऱ्यांचा पुढारी' 'देशात अशाती निर्माण करण्यासाठी नेमलेला सी. आय. ए चा एजट' या शिव्या काय अशा विरोधातही लाखोंच्या सख्येने शेतकरी त्यांच्याभोवती जमतो आहे. जात, भाषा, पक्ष, प्रात इ भेद विसरून तो सघटनेत सामील होतो आहे. राजकीय पक्षाना आणि पुढाऱ्यानाही आता शेतमालाच्या रास्त

भावाची मागणी करीतच ग्रामीण जनतेपुढे जावे लागते आहे.

शरद जोशीचे विचार आणि संघटना या दोन्हीचे हे यश आहे असे म्हणावे लागेल.

पण या यशामुळेच एक धोका संभवतो. चळवळीला काहीसा जोम आला, विचारातील सत्यता झपाट्याने लोकापर्यंत पोहोचू लागली की आपल्या सूत्रामुळेच देशाचे सर्व प्रश्न सुटतील असे सागण्याचा मोहही होतो. या संदर्भात उदाहरणच द्यायचे झाले तर याच पुस्तकात विज्ञान चळवळीच्या कार्यकर्त्यांना शरद जोशीनी लिहिलेल्या पत्राचा साराश देण्यात आला आहे. त्यात ते म्हणतात. 'अनिश्चितता आणि अज्ञान यातून (अंध) श्रद्धा तयार होते. पण हा काळोख केवळ विचाराचा प्रचाराने वा शिक्षणाने दूर होईल, असे समजणे चूक होईल. तसे असते तर असख्य बाबा महाराजांसमोर, स्नातक, शास्त्रज्ञाची, उद्योजकाची गर्दी दिसली नसती.. शेतकऱ्याविषयी बोलायचे तर त्याच्या सर्व श्रद्धा शेतीच्या परिस्थितीवर अवलबून आहेत. ज्या दिवशी उत्पादनखर्च भरून निघण्याची शाश्वती मिळेल, त्या दिवशी या प्रचड ताकदीला विज्ञाननिष्ठा शिकविण्याची गरज राहणार नाही.'

वास्तविक अधश्रद्धा निर्मूलनाच्या कार्यावरही दावा सागण्याचे काही कारण नाही पण जोशी 'रास्त भावा'च्या चष्म्यातूनच सर्व गोष्टीकडे पाहून इच्छितात. त्यामुळेच पजाबमधला आजचा उग्र. प्रश्नसुद्धा तिथल्या किसानांच्या आर्थिक समस्येतून उभा राहिला आहे असे ते सागतात. अगदी ऐतिहासिक घटनाचे विश्लेषण करतानाही इतर घटकांचा विचार करायला ते तयार होत नाहीत. वरील उताऱ्यात अनिश्चितता आणि अज्ञान यामुळे अधश्रद्धा तयार होते असे ते म्हणतात. स्नातक, शास्त्रज्ञ, उद्योजक यांच्याही जीवनात जर ती असेल तर आर्थिकदृष्ट्या शेतकऱ्याना या लोकाबरोबर आणले, शेतमालाला रास्त भाव दिला म्हणून त्याच्यात विज्ञाननिष्ठा निर्माण होईल हे म्हणणे विसगत वाटते. शेतमालाला योग्य भाव ह्या सूत्रावरमुद्धा डोळस श्रद्धा असावी, अधश्रद्धा नको.

अर्थात सर्वसामान्यांना शेतकरी सघटनेचे विचार समजावेत या उद्देशाने हे छोटेखानी पुस्तक लिहिलेले असल्याने त्यात विश्लेषणाचा भाग आलेला नाही. पण शेतकरी सघटना ही महाराष्ट्रातील एक प्रभावी राजकीय–सामाजिक शक्ती आहे याची पूर्ण अनभिज्ञ असलेल्याना जाणीव होण्यासाठी अशा पुस्तकाचा चागला उपयोग होऊ शकतो.

—निरंजन आगाशे

शरद जोशी
भारतीय अर्थवादाचा क्रियाशील जनक
ले. अरविंद वामन कुलकर्णी
शेतकरी प्रकाशन (९), अलिबाग
पृष्ठे : ५२, मूल्य : दहा रुपये

रंगभूमी

# दुसरा नाट्यसमीक्षक मेळावा

वि. भा. देशपांडे

१९८४ च्या डिसेंबर ३ आणि ४ तारखाना महाराष्ट्रातील नाट्यसमीक्षकांचा पहिला मेळावा पुण्यातल्या ॲक्टिव्ह थिएटर्स या नाट्यसस्थेने आयोजित केला होता तो मेळावा अनेक अर्थांनी स्मरणीय झाला. त्या मेळाव्याचे भव्य आयोजन, समारंभाचे दिमाखदार स्वरूप, रंगभूमीतील प्रतिष्ठित कलाकाराची उपस्थिती, त्यातल्या काहीनी केलेली वादग्रस्त विधाने, मेळाव्यात वाचले गेलेले निबंध– झालेल्या चर्चा याचे त्वरित निघालेले पुस्तक आदी अनेक कारणानी हा मेळावा दीर्घकाळ स्मरणात राहणारा ठरला.

या मेळाव्यातून पुण्यातले काही समीक्षक एकत्रित आले. त्यानी पुणे नाट्यसमीक्षक सघ स्थापन करून काही कार्यक्रम घडवले. उदाहरणार्थ, 'वाडा चिरेबदी' 'सविता दामोदर पराजपे' 'बेइमान' आणि 'विनोदी नाटके' यावर सबधित कलाकारासमवेत चर्चा झाल्या. सर्व कार्यक्रमाना प्रेक्षक–श्रोते यानी दिलेला प्रतिसाद हा रंगभूमीच्या नोंदीत दखल घेण्याजोगा ठरला.

वर्ष–सव्वा वर्ष झाल्यावर काही समीक्षकाना वाटू लागले की, आपण सर्वांनी पुन्हा एकत्रित भेटणे आवश्यक आहे. काही व्यक्ती आणि सस्थांशी बोलणी केली. पुसदच्या नाट्यसमेलनात आम्ही समीक्षकानी नाट्यपरिषदेच्या कार्याध्यक्षाना मेळावा भरविण्यासबधी विनती केली त्यांनी ती मान्य केली. रविवार ६ एप्रिलला नाट्यपरिषदेने पुरदरे हॉलमध्ये मेळावा आयोजित करून प्रत्यक्षात घडवून आणला.

हा मेळावा पहिल्या मेळाव्याच्या पद्धतीचा नव्हता. तसा तो अपेक्षितही नव्हता. कारण पहिल्या मेळाव्याचे स्वरूप जाणूनबुजून समारभाचे प्राधान्याने ठेवले होते. यावेळी मात्र समीक्षकानी एकत्रित भेटणे, काही योजना, उपक्रम, कार्यक्रम यांच्या संदर्भात विचारविनिमय करणे एवढ्याच मर्यादित अर्थाने अपेक्षित होते. त्यामुळेच यावेळी एक दिवस सकाळी १० ते सायकाळी ५ पर्यंत भेटून दिवसभर विविध मुद्द्यावर बोलायचे असे ठरले होते. त्याप्रमाणे मेळाव्याचे कामकाज झाले. नाट्यपरिषदेच्या आर्थिक मर्यादा असल्याने निमत्रित समीक्षकांच्या सख्येवरही बधन होते. साहजिकच पुणे–मुबईमधील बहुतेक समीक्षक उपस्थित होते. नागपूर, जळगाव, पैठण अशा गावाहून काही जण आले होते. एका अर्थाने मेळावा आटोपशीर आणि अनौपचारिक झाला.

या मेळाव्यात अनेक महत्त्वाचे मुद्दे चर्चिले गेले. त्यामध्ये महत्त्वाचा भाग म्हणजे वृत्तपत्र नियतकालिके यातून येणाऱ्या समीक्षेची गुणवत्ता कशी वाढवता येईल याच मुद्द्यापासून आरभ झाला. रसग्रहणात्मक आणि काही प्रमाणात नवनिर्मितीच्या जवळपास जाणारे लेखन हे कधीही प्रशिक्षणाच्या स्तरावर नेता येत नाही. आले तरी त्याच्या मर्यादा असतात हे सर्वांनाच माहीत असते. म्हणूनच समीक्षा ही शिकवून येणारी गोष्ट नसेल तर त्याला पूरक म्हणून काय करता येईल याचा विस्ताराने विचार झाला. त्यामध्ये काही गोष्टी करता येतील यावर भर दिला गेला. उदाहरणार्थ नाट्यप्रयोगाच्या तंत्रविशेषांची माहिती करून देणारी काही शिबिरे घेता येतील त्यात सगीत, प्रकाश,

नेपथ्य आदीच्या मूलभूत गोष्टींचा परिचय करून देणे शक्य होईल. नाटकाच्या तालमी सुरू झाल्यापासून प्रयोगापर्यंतचा प्रवास समीक्षकाला पाहता येईल. समीक्षकाला प्रोत्साहित करण्यासाठी दरवर्षी उत्तम समीक्षकाला पारितोषिक देता येईल. शक्य झाल्यास वर्षातील उत्तम समीक्षणाचा सग्रह काढता येईल. इ.

यालाच पूरक म्हणून एक कल्पना पुढे आली. ती म्हणजे भारतातील विविध प्रातात अनेक प्रकारचे नाट्योत्सव होतात ते पाहण्याची व्यवस्था व्हावी या मुद्याच्या सदर्भात शासनाच्या वतीने प्रा. कमलाकर सोनटक्के यांनी आश्वासन दिले की 'या दृष्टीने शासकीय स्तरावर जे जे करणे शक्य आहे ते मी करण्याचा यत्न करीन.' दिल्ली, कलकत्ता, भोपाळ, कर्नाटक, उदेपूर अशा अनेक ठिकाणी नाट्योत्सव घडतात. विविध भाषातील नाटके पाहण्यानेही समीक्षक खूप गोष्टी शिकू शकतात हे मी स्वतः अनेक नाट्योत्सव पाहून सागू शकतो.

परप्रातातील नाटके पाहून नुसते भागणार नाही, तर त्याना आपल्या रगभूमीविषयीची माहिती हिंदी-इग्रजी भाषेतील पुस्तिकाच्या द्वारा करवून देणे अगत्याचे आहे. पूर्वी असा प्रयत्न छोट्या प्रमाणात झाला होता. पण त्याला त्याहीपेक्षा अधिक व्यापक स्वरूप देण आवश्यक आहे. ज्ञानेश्वर नाडकर्णी यानी या सबधातली जबाबदारी घेण्याचे मान्य केले. त्यानी इग्रजी भाषेतून मराठी नाटक आणि रंगभूमीच्याच्या सदर्भात विपुल लेखन केलेले आहे. त्यानी अमराठी माणसासाठी रगभूमीविषयी लिहिणे याला निश्चितच अर्थ आहे.

रगभूमीविषयीची माहिती, निरीक्षणे, इतिहास आदी गोष्टी लिखितरूपात व्यक्त करणे ही जशी काही प्रमाणातली समीक्षकाची जबाबदारी आहे तशीच रगभूमीविषयक एखादे वार्षिक, नियतकालिक काढण्यास मदत करणे ही पण आहे यावर अनेकाचे अनुकूल मत आहे. या मुद्यावर बरीच चर्चा झाली. त्यातून एक गोष्ट मान्य झाली की, रगभूमीविषयक वार्षिक काढावे. आत्तापर्यंत मुबई मराठी साहित्य सघ, नाट्यपरिषद, भरतशास्त्राचे लोक आदीनी काही प्रयत्न करून पाहिलेले आहेत. आर्थिक स्तरावर त्याना अपयश आलेले आहे. ते का आले याचा शोध घेऊन त्यातून मार्ग काढणे आवश्यक आहे. तसा विचार गाभीर्याने या मेळाव्यात झाला.

मेळाव्यात अनेक मुद्दे चर्चेला आले. त्या सर्वांचा उहापोह इथे करण्याची आवश्यकता नाही. पण असे लक्षात आले की, अनेक गोष्टी करण्यासारख्या आहेत. शासन आणि नाट्यपरिषद यानी त्यातली काही गोष्टींची जबाबदारी उचलावी. पण नुसते असे म्हणून चालणार नाही. त्यासाठी समीक्षकानी आपण हून काही गोष्टीचा पुढाकार घ्यायला हवा. दोन पावले पुढे येऊन परिषद-शासन याच्याशी सहकार्य करायला हवे या विचारातूनच समीक्षक सघ व्यापक स्वरूपात स्थापन करावा का असा प्रश्न आला. पुण्यात काही समीक्षकानी एकत्रित येऊन नाट्यसमीक्षक सघ स्थापन केला. त्याचे स्वागत या मेळाव्यात मोठ्या प्रमाणात झाले. पण जेव्हा सघाचे काम व्यापक स्वरूपात करण्याची कल्पना सभेसमोर आली तेव्हा मुबईकर समीक्षकानी एकमुखाने विरोध केला. त्या विरोधी सुरात पुण्याच्या एका समीक्षकाने सूर मिसळला. मुबईवाल्याचे म्हणणे असे की अशा सघाची आवश्यकता निदान मुबईत तरी नाही, पुण्याची गोष्ट निराळी आहे. यावर खूप लिहिण्या-बोलण्यासारखे आहे. खरे तर सघ किंवा सघटना स्तरावर समीक्षकानी एकत्रित यावे इतकी त्याची सख्या आहे का ? असा प्रश्न कोणालाही निरुत्तर करणारा आहे. कारण तशी मोठी सख्या नाही आणि कधीही असणार नाही. कोणत्याही कलाक्षेत्रातले समीक्षक सख्येने तिथल्या कलावतापेक्षा कमीच रहाणार. प्रश्न आहे तो असा की, मराठी नाट्यसमीक्षेच्या गुणवत्तेवर जे आरोप-प्रत्यारोप होतात त्यातले जर काही कमी करायचे असतील, समीक्षा नेमक्या दिशेला, वजनाने न्याय्य्यी असेल तर सघटित स्वरूपात सातत्याने काही प्रयत्न व्हायला हवेत. त्यासाठी एखादे व्यासपीठ हवे. कदाचित काहीना हे मनोमन पटत असेलही, पण पुढच्या साऱ्याच गोष्टीचा व्याप टाळण्यासाठी ते नकार देत असतील. या चर्चेत एक-दोघाची भूमिका वरून दिसायला तात्त्विक-आदर्शाची वाटली तरी आतून असणारा विरोध वैयक्तिक किंवा एकूणच मूळ कामाला नकारात्मक असावा असे वाटून गेले.

समीक्षक सघ स्थापन झाला नाही म्हणून तूर्त बिघडत नाही पुण्यातला समीक्षक सघ आपले काम चालू ठेवीलच. तसेच या मेळाव्यात ज्या काही महत्त्वाच्या गोष्टींचा विचार झाला त्यातल्या काहीचा यथाशक्ती पाठपुरावा करील. त्यातच अशा मेळाव्याचे फलित असते.

काही नाही म्हटले तरी नाट्यसमीक्षक दोन वर्षांत दोनदा एकत्रित आले. दुसऱ्या वेळी नाट्यपरिषदेने पुढाकार घेऊन ही गोष्ट केली हे अभिनदनीय आहे. यात परिषदेला जसे धन्यवाद आहेत तसेच परिषदेने समीक्षकाचा एका अर्थाने गौरव केला असेच म्हणावे लागेल. या मेळाव्यात माधव मनोहर, ज्ञानेश्वर नाडकर्णी, कमलाकर नाडकर्णी, पद्माकर कुलकर्णी आदी समीक्षक होते, तसेच रगभूमीशी विविध स्तरावर सबधित असलेले महत्त्वाचे लोकही उपस्थित होते. उदा दामू केंकरे, दाजी भाटवडेकर, कमलाकर सोनटक्के, अरुण काकडे, अनत काणे, प्रभाकर पणशीकर इत्यादी. नागपूर, पैठण, जळगाव येथूनही एकेक प्रतिनिधी आले होते. नाट्यपरिषदेने या मेळाव्याचे सूत्र पकडून अधिक कार्यरत व्हावे अशी अपेक्षा. अर्थात समीक्षकानी अभिवचन दिल्याप्रमाणे आपले सहकार्य आहे हेही सिद्ध करावे. □

चित्रपट

# बाळबोध वळणाचा

# आप के साथ

**जे.** ओमप्रकाश हे नाव तस हिंदी चित्रपटसृष्टीतल बऱ्यापैकी परिचित आणि यशस्वी नाव. पण त्याच्या चित्रपटांकडे एक नजर टाकली तर त्याची नाव 'अ'पासून सुरू होतात. याशिवाय त्याच्यात काहीही वैशिष्ट्य नाही. त्या त्या वेळचे चार-दोन प्रसिद्ध कलाकार घ्यायचे बरीचशी कौटुंबिक, प्रेमाचा त्रिकोण किंवा चौकोन असलेली कथा घ्यायची, थोडे भावनात्मक प्रसग टाकायचे आणि चित्रपट सादर करायचा.

हीच पद्धत वापरून ओमप्रकाशनी 'आशा', 'अर्पण', 'आखिर क्यूं' असे अनेक चित्रपट बनवले. त्याच पठडीतला त्यांचा ताजा चित्रपट 'आप के साथ.'

चित्रपटक्षेत्रात प्रत्येक चित्रपटाबरोबर सुधारणा होत गेलेले दिग्दर्शक खूप आहेत. चित्रपटासारख्या माध्यमाचा त्यानी कुशलतेनं उपयोग करून घेतलेला दिसतो. ओमप्रकाश याच्या बाबतीत मात्र हाताळणीत सफाईदारपणा येण याशिवाय काहीही सुधारणा झाल्याच, परिपक्वता आल्याचं दिसत नाही.

'आप के साथ' चा नायक आहे विमल. (अनिलकपूर) हा एक खुशालचेंडू तरुण. घरची भरपूर श्रीमंती. आई-वडील लहानपणीच वारलेले. त्यामुळे दादाजींनी (उत्पल दत्त) केलेल्या लाडामुळे हे बाळ नसत्या उद्योगात आपला वेळ घालवत असत आणि खास हिंदी चित्रपटातले दादाजी असल्याने तेही आपल्या या नातवाला प्रेमळपणे प्रोत्साहन देत असतात. अर्थात विमल खुशालचेंडू असला तरी मनान चागला असणं हे ओघानच आलच. घरच्या व्यवसायाचा सगळा भार साभाळणाऱ्या आपल्या शात, अबोल भावावर, अशोकवर (विनोद मेहरा) त्याच कमालीच प्रेम असत.

अशोकच गंगा (स्मिता पाटील) या खेड्यात रहाणाऱ्या तरुणीवर प्रेम असत. पण तिन आपल्याला नाटक करून फसवल असं कळल्यावर तो तिच्याशी सबध तोडून टाकतो. सतत दु:खी रहाणाऱ्या अशोकला पुन्हा एकदा माणसात आणाव म्हणून दादाजी त्याच्या लग्नाचा बेत आखतात आणि त्या हेतून दीपा (रती अग्निहोत्री) या अनाथ तरुणीला घरची देखभाल करण्यासाठी आणतात. दीपा आपल्या प्रेमळपणान सगळ्याना जिंकून घेते, घराला शिस्त लावते. दरम्यान विमल आणि ती एकमेकांच्या प्रेमात पडतात.

दादाजीना याची कल्पना नसते. त्यामुळं ते अशोक आणि दीपाच लग्न ठरवतात. विमल आधुनिक युगातला लक्ष्मण वगैरे असल्यान 'भैय्या के सुख के लिए' आपल्या प्रेमाला तिलाजली देण्याचं ठरवतो. पण दु:खित मन.स्थितीत बाहेर पडलेला असताना त्याच्या गाडीला अपघात होतो.

लेखकानं जमवलेला योगायोग तरी किती विलक्षण! त्याला ओळखते आणि वाचवते ती नेमकी गंगाच. चित्रपटातली सगळी पात्रं स्वभावानं चागलीच असल्यानं गंगाही त्याच्याच रागेतली असणार हे ओघानंच आलं. अशोकला तिन फसवलेल नसतच मुळी. गावचा चौधरी (अमरीश पुरी) तिच्याशी लग्न करू इच्छित असतो ते केलं नाही तर तिच्या भावाला आणि अशोकला मारायची धमकी त्यानं दिलेली असते. त्यामुळंच ती हे करते. नतर तिच चौधरीशी लग्न होतं. पण लगेचच ती तिथून पळून येते. मुबईत तिला तिच्याच गावची आणखी एक तरुणी (अरुणा इराणी) भेटते. जी कोठीवर रहात असते. ती गगाला आसरा देते

विमलला हे कळल्यावर त्याला आनद होतो मनातली अडचण दूर होईल म्हणून आणि भावाचंही भल होईल म्हणून. यथावकाश सगळे गैरसमज दूर होतात. गगाचं अशोकशी झालेल लग्न दाखवताना तिचं पहिल लग्न झाल आणि घटस्फोट मिळालेला नाही याचा मात्र दिग्दर्शकाला विसर पडतो. अर्थात एवढा महान चित्रपट बनवताना अशा लहान-सहान गोष्टीच विस्मरण होणं साहजिक आहे.

अतिशय बाळबोध स्वरूपाची ही कथा सचिन भौमिकनी लिहिली आहे. त्याग, बधुप्रेम, आदर्शवाद या सगळ्या चक्रात फिरताना तिला आपली नेमकी दिशाही सापडेनाशी होते. सवाद डॉ. राही मासूम रझाचे आहेत.

जे. ओमप्रकाशनी चित्रपट सरधोपट पद्धतीन घेतला आहे. त्याच्या एकाच ठराविक साच्याचे चित्रपट बघण्याचा खरा तर कटाळा आलाय. कोटुंबिक चित्रपट म्हणायचं आणि लोकाना हव म्हणून नाच, मारामाऱ्याही त्यात कुठ तरी बसवायच्या हा त्याचा प्रयत्न केविलवाणा वाटतो.

चित्राला सगीत लक्ष्मीकांत-प्यारेलालचे आहे. शब्बीरकुमार आणि अनुराधाच्या आवाजातलं 'टायटलसाँग' तेवढ त्यानी बरं दिलय. बाकी सगळा आनंदच आहे.

अनिल कपूरसारखा गुणी कलावत चित्रपटात अक्षरशः वाया गेलाय. विमलच्या भूमिकेत फारसं काही करण्यासारखं नसल्यानं त्यानं चक्क 'टाईमपास' केलाय. रती अग्निहोत्री दिसते चागली. विनोद मेहराचा गभीर अशोक आणि उत्पल दत्तचा दादाजी व्यवस्थित आहेत. स्मिता पाटील मात्र अवतरते मध्यंतरानंतर आणि त्यानतरही तिला फारस काम नाहीच आहे. ती दिसतेही वाईट. कलात्मक आणि व्यावसायिक चित्रपटाचा तोल साभाळण्यासाठी इतक्या सुमार चित्रपटात इतकी सुमार भूमिका तिनं स्वीकारली आहे की 'उबरठा', 'भूमिका' सारख्या चित्रपटातली स्मिता ती हीच ह्यावर विश्वासच बसत नाही.

— सीमा कुलकर्णी

## सांस्कृतिक नागपूर

पृष्ठ २ वरून

हे निर्माते साबण निर्मितीकडे वळतील.' असाही टोमणा त्यानी जाता जाता मारला. मराठी रंगभूमीच्या सध्याच्या अवनत स्थितीला नट, नाटककार, निर्माते, प्रेक्षक सर्वच जबाबदार आहेत असा मुद्दा त्यानी आग्रहाने माडला. मागल्या उन्हाळ्यात मॅजेस्टिक गप्पा-गोष्टीमध्ये किंवा मागल्या महिन्यामध्ये मुबई मराठी ग्रथ सग्रहालय या ठिकाणी डॉक्टरांनी जी भाषणे दिली त्यामध्ये डॉक्टरानी व्यक्त केलेले विचार आता सर्वांनाच माहीत झाल्यामुळे त्याची पुनरुक्ती मी ह्या ठिकाणी करीत नाही. परतु भाषणाच्या ओघात डॉक्टरानी नाटकांविषयी आणि प्रेक्षकाविषयी जे किस्से सांगितले ते मात्र लक्षात घेण्यासारखे आहेत. अनेक वर्षांच्या सस्कारामुळे आणि परपरेमुळे पाश्चिमात्य देशातील नाटकाचा प्रेक्षक कसा तयार झालेला असतो आणि तो नाट्यानुभव किती जबाबदारीने आणि गंभीरतेने घेत असतो हा मुद्दा सागताना डॉक्टरसाहेब म्हणाले, 'मी लडनला एका प्रसिद्ध थिएटरात प्रसिद्ध नट गिलगुड याचे ॲथोल्लो पहाण्याकरिता गेलो. त्यावेळी एका प्रवेशात गिलगुड याना एक वाक्य काही केल्या आठवेना ते वाक्य सलग म्हणण्याचा गिलगुडने तीनदा प्रयत्न केला. त्यावेळी त्या पाच मजली थिएटरातील शेकडो प्रेक्षक आपला श्वास रोखून गिलगुड-

कडे पहात होते. ज्यावेळी ते वाक्य सलगपणे गिलगुडणे म्हटले त्यावेळी प्रेक्षकानी एकदमच सुटकेचा निश्वास सोडला. ही घटना मी माझ्या डोळयानी प्रत्यक्ष पाहिल्याने त्याने मी थरारून गेलो.' डॉक्टरानी पुढे सागितले 'एक प्रवेश होऊन दुसरा प्रवेश सुरू होताना स्टेजवर पाव सेकद अधार व्हावयाचा. तेवढया वेळात थिएटरमधील सर्व प्रेक्षक पाय लाबविणे, एकमेकाशी बोलणे, कान खाजविणे, शिकरणे इत्यादी प्रकार करावयाचे. परतु स्टेजवर उजेड झाला की थिएटरमध्ये सपूर्ण शातता असावयाची ! टाचणी पडेल तरी ती ऐकू येईल इतकी निस्तब्धत थिएटरात निर्माण होई !'

समोर मिस्कीलपणे पहात डॉक्टर पुढे म्हणाले, 'नाही तर आपल्याकडे अगदी समोरच्या खुर्चीवर बसलेले प्रेक्षक पोटॅटो चिप्स सतत खातात त्याचा जो कुरंम कुरंम आवाज होतो त्यामुळे नटाची एकतानता बिघडते हे त्याच्या गावीही नसते.' डॉक्टरानी दुसरा एक किस्सा सागितला. एकदा मी लडनला अलवर्ट हॉलमध्ये मेनुहिनचा जलसा ऐकण्याला गेलो. मधे मला एक हरकत इतकी आवडली की मला भान न राहून मी थोडया मोठ्यानेच 'वाहवा' असे म्हणालो ! त्यावेळी काय सागू तुम्हाला– त्या हॉलमध्ये दोन हजार प्रेक्षक तरी असतील. त्याच्या माना सरर्कन माझ्याकडे वळल्या आणि ते सर्वच माझ्याकडे निषेधाने पाहू लागले. त्यांच्या नजराना भाल्याची टोके बसविली असती तर माझा मुडदा तिथेच पडला असता इतका त्या नजरेत विखार होता !' नाटक म्हणजे डोळयांनी पहावयाचा आणि कानानी ऐकावयाचा एक यज्ञ आहे असे कालीदासाचे सुभाषित सांगून डॉक्टर पुढे म्हणाले, 'मी नेहमी ह्या सुभाषिताला एक जास्तीचे वाक्य जोडतो ते म्हणजे ह्या यज्ञातील समिधा म्हणजे स्टेजवरील नट आहोत हे.' नटाने वैश्विक काळाची लय साधण्याचा सतत प्रयत्न केला पाहिजे असे सांगताना डॉक्टरानी कुमार गधर्वांचे उदाहरण दिले. एकदा एका सिनेमात गाण्याचे चित्रिकरण आणि रेकॉर्डिग एकदमच करावयाचे होते. तेव्हा डॉक्टरानी कुमाराना सांगितले की तुमचे गाणे जास्तीत जास्त ३ मिनिटे किंवा ३॥। मिनिटामध्ये बसले पाहिजे. आणि त्यात तुमच्या गाण्याची खरी प्रतिभा उतरली पाहिजे. कुमार म्हणाले ठीक आहे. वेळेवर गोधळ नको म्हणून आम्ही त्याची अगोदर ट्रायल घेतली. कुमारानी ते गाणे सपविले ३ मिनिटे ५० सेकदात. दुसऱ्यादा ट्रायल घेतली. वेळ बरोबर ३ मिनिटे ५० सेकद. प्रत्यक्षात ज्यावेळी कुमारानी हे गाणे सादर केले त्याला वेळ लागला ३ मिनिटे ५० सेकद. प्रतिभावंत वैश्विक काळाची लय अशी साधत असतात.

डॉक्टराच्या ह्या भाषणाना दोन्ही दिवस धनवटे रग मदिर दुथडी भरून वहात होते. मला मात्र एकच अडचण वारवार येत होती. डॉक्टराच्या स्टेजवरील आवाजाची जात एव्हढी वेगळी आहे की तो आवाजच ऐकत रहावा असे मला वाटत होते. परंतु त्यामुळे मूळ विचाराकडे दुर्लक्ष होत होते. ह्या आवाजामुळेच डॉक्टर मराठी रगभूमीवरील एकमेव 'नटसम्राट' ठरले. धनवटे रगमदिरातील त्याच्या दोन भाषणात त्याच्या सखोल विचाराबरोबरच त्याच्या अभिनयाचाही साक्षात्कार नागपूरकराना घडला.

## ☐ सुन्न करणारा अनुभव !

महेश एलकुचवार नागपूरचेच नाटककार. मुबईच्या छबीलदास नाटकगृहात पाच दहा प्रेक्षकासमोर नाटके काय करता, जरा नागपूरला नाटके करा असे मी त्याना विनोदाने नेहमीच म्हणत आलो ! त्याचे नाटक तर नाही परतु त्याच्या एकाकिकेवर आधारीत 'होळी' हा सिनेमा पहाण्याचा योग नागपूरकराना नुकताच आला. ह्या वर्षीच्या होळीच्या तिसऱ्या दिवशी येथल्या 'सिने-मॉंटेज' ह्या संस्थेने प्रायोगिक सिनेमातर्गत त्याचा 'होळी' हा सिनेमा येथल्या रसिकाना दाखविला. विद्यार्थ्यांच्या होस्टेलमध्ये पहाता पहाता 'होळी' कशी पेटते आणि प्राचार्यांना आपली नावे सागितली यावरून एका विद्यार्थ्याचे रॅगिंग कसे होते आणि त्यात मानहानी होऊन तो विद्यार्थी आत्महत्या कशी करून घेतो ह्या सर्व घटना इतक्या सहजपणे पडद्यावर दाखविल्या जातात की आपण सिनेमा पहात आहोत असे आपल्याला वाटतच नाही ! क्रूर रॅगिंग आणि आत्महत्या ह्याचा जबरदस्त Impact घेऊनच प्रेक्षक बाहेर पडतो.

## ☐ पटेल कमिशन !

नागपूरात सध्या आणखी एका विषयावर गरमागरम चर्चा चालू आहे तो विषय म्हणजे पटेल कमिशन ! नागपूर विद्यापिठाने पाचव्या आणि सहाव्या पचवार्षिक योजनेतील अनेक विषयातील रिडर्स, प्रोफेसर्स आणि लेक्चरर्स करिता २७ जुलै १९८४ रोजी एक मोठी जाहिरात दिली. त्यातील ४७ रिडर्स आणि प्रोफेसर्सच्या जागा विद्यापिठाने मुलाखती घेऊन भरल्या. पलीकडे ह्या निवडीबद्दल अनेक सघटनानी आणि व्यक्तीनी तक्रारी केल्याने विद्यापिठाने सहाव्या पचवार्षिक योजनेतील सर्वच्या सर्व जागा आरक्षित म्हणून जाहीर केल्या. विद्यापिठाच्या ह्या निवडीबाबत, आरक्षण धोरणाबाबत आणि तथाकथित भ्रष्टाचाराबाबत कुलपतीकडे अनेक तक्रारी गेल्या म्हणून त्यावेळचे कुलपती कोनाप्रभाकरराव यांनी हायकोर्ट न्यायाधीश श्री. पटेल ह्याच्या अध्यक्षतेखाली एक चौकशी समिती नेमली व त्या चौकशी समितीने सध्या विद्यापिठाची ह्या नेमणूकाबद्दल चौकशी चालू केलेली आहे. जस्टिस पटेल ह्या प्रकरणाची पूर्ण चौकशी करून जो काही निर्णय द्यावयाचा तो देतीलच; परतु हायकोर्टात उघडपणे चौकशीला प्रारभ झाल्याने विद्यापिठातील सर्व प्राध्यापक, अधिकारी याची एकच गर्दी सुनावणी ऐकण्याकरिता होत आहे ! त्यातच विद्यापिठाचे वकील ॲडव्होकेट मनोहर तर विरुद्ध पक्षाचे वकील ॲडव्होकेट अरविंद बोवाडे– दोघेंही अतिशय नामांकित त्यामुळे दोघा मल्लामध्ये ही लढाई आहे असे लोक बोलतात ! कोना प्रभाकरराव ह्यानी मुबई विद्यापीठात तसा प्रकार केला त्यामुळे त्यांनी दिलेला चौकशीचा निर्णय मानावयाचा काय असे अनेक प्रश्न लोक विचारीत आहेत. कमिशनची नेमणूक कायद्याप्रमाणे आहे काय ? चौकशीची पद्धती कशी असावी ? निवेदने कोणाची स्वीकारायची ? इत्यादी अनेक गुतागुतीचे प्रश्न निर्माण झालेले आहेत ह्या सर्व जंजाळातून पटेल कमिशनला मार्ग काढावयाचा आहे व यातील सत्य शोधून काढावयाचे आहे. जस्टिस पटेल यथावकाश यातून मार्ग काढतीलच, परंतु आजतरी नागपूरात पटेल–चौकशी हा गरम गरम चर्चेचा विषय झालेला आहे !

–शरच्चंद्र

- **योद्धा शेतकरी** / विजय परुळकर / ३६ रुपये
- **डॉ. आयडा स्कडर** / वीणा गवाणकर / २२
- **एक होता कार्व्हर** / सौ. वीणा गवाणकर / ३०
- **श्रीग्रामायन** / श्री. ग. माजगावकर / २५
- **बलसागर** / श्री. ग. माजगावकर / ३०
- **निर्माणपर्व** / श्री. ग. माजगावकर / ४०
- **पूर्णत्वाचे प्रवासी** / प्रा. शरद कुलकर्णी / ५०
- **आंबेडकर भारत** / बाबुराव बागुल / २०
- **लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी** / पु. ल. इनामदार / २०
- **निलगिरीची शेती** / विनायक पाटील / १५
- **अब्राहम लिंकन, फाळणी टाळणारा महापुरुष** / वि. ग. कानिटकर / १५०
- **नाझी भस्मासुराचा उदयास्त** / वि. ग. कानिटकर / १४०
- **विज्ञानेश्वरी** / डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर / २०
- **तुम्हाला विज्ञानयुगात जगायचंय** / डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर / २०
- **मानसकन्या** / प्रा. मनोहर राईलकर / २०
- **सांगत्ये ऐका** / हंसा वाडकर / १४
- **शतपावली** / रवींद्र पिंगे / १६
- **रूपवती भार्या शत्रुः ?** / अॅड. माधव कानिटकर / २५
- **सबला** / माधव शिरवळकर / १२
- **काही दिवस श्यामचे काही दिवस राधाचे** / फिरोझ रानडे / २५
- **फिडेल ' चे आणि क्रांती** / अरुण साधू / २२
- **मला निसटलंच पाहिजे** / श्रीकांत लागू / २२
- **लेक वालेसा** / डॉ. श्रीकांत मुंदरगी / २२

राजहंस प्रकाशित

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०
दूरध्वनी : ४४ ३४ ५९

C/o. श्री. वा. र. गोडे
४१ भवानीशंकर रोड
जोशी वाडी]
चितळे पथ कॉर्नर, दादर (प.)
मुंबई ४०० ०२८
दूरध्वनी : ४२२ ५४ ५५
४२२ ३९ ०१

- **माध्यमिक शाळेतील विद्यार्थी** / श्री. ब. गोगटे, म. न. पलसाने / १०
- **कथा ही गणिताची** / ल. वा. गुर्जर / ६०
- **महाराष्ट्रातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे प्रश्न** / म. न. पलसाने, श्री. अ. पाटणकर, वि. मा. कुलकर्णी, सुमन करंदीकर / ३५
- **गुजरातेतील मराठी राजवट** / वि. गो. खोबरेकर / १५
- **तीर्थरूप आक्का** / शारदाबाई आपटे / ५
- **सहा साहसे** / दा. सी. देसाई / १६
- **परसूच्या पशुकथा** / वसंत सबनीस / १२
- **चार्ल्स डार्विन** / भा. रा. बापट / ३२
- **कुंपण आणि आकाश** / मंगला गोडबोले / २०
- **वयात येताना** / मंगला गोडबोले, डॉ. वैजयंती खानबिलकर / २५
- **वाट चुकलेली माणसं** / शिरीष सहस्रबुद्धे / ४०
- **नाट्यपंढरी** / गो. रा. जोशी । २०
- **ऊर्जा प्रश्न : आशा उद्याच्या** / प्रि. खं. कुलकर्णी / २५
- **कल्पान्त** / प्रा. मनोहर राईलकर / ३५
- **या कॉम्प्युटरमध्ये बडलंय काय ?** / **राजीव साने** / ३०
- **लघुउद्योग मार्गदर्शक** / शिरीष सहस्रबुद्धे / ६५
- **राजहंस गीत संग्रह** / सौ. कमल प्रभुणे, सौ. विद्या बापट, डॉ. सौ. ललिता गुप्ते / १०
- **बखर कांग्रेसची** / शिरीष सहस्रबुद्धे / ९०
- **लांडगा आला रे ऽ आला** / जगदीश गोडबोले / ३०
- **झुळूक** / मंगला गोडबोले / २५
- **तेंडुलकरांची नाटके** / डॉ. चंद्रशेखर बर्वे / ३०
- **भ्रम आणि निरास** / डॉ. नरेंद्र दाभोळकर / ३०
- **सेंट्रल एक्साइज आणि लघुउद्योग** / शिरीष सहस्रबुद्धे / २४

**MANOOS WEEKLY** (Licensed to post without prepayment of postage No–11) Regd. No. PNCW–28